VOLUME 6 ISSUE 10 OCTOBER 2021

*Progressive Education Society's*

**Modern College of Arts, Science and Commerce ( Autonomous )**

**Shivajinagar, Pune-411005. Maharashtra**

# MODLIB *E-Bulletin of Library and Information Centre*




**Published by :** Dr. Rajendra S. Zunjarrao, Principal, MCASC (Autonomous) , Shivajinagar, Pune-05.

**Editor :** Dr. Shantashree Sengupta, Librarian.

**Editorial Assistant :** Mrs. Sarika Sable

**E-mail:** librarian@moderncollegepune.edu.in

***'MODLIB'*** : E-Bulletin of Library and Information Centre of Progressive Education Society's Modern College of Arts, Science and Commerce (Autonomous), Shivajinagar, Pune-5.

Frequency: Monthly

Mode of Publication: Online

Issue: October 2021

***Disclaimer: The Publisher and Editorial Team of this Issue of Library E-Bulletin are not responsible for the views expressed in the Articles.***

***Cover Page Image Courtesy: लोकसत्ता, ७.१०.२०२१, पृ.क्र.७***

# Table of Contents


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 1 | Article by Hon'ble Prof.Dr.Gajanan Ekbote<br>- तिसरा डोस किती आवश्यक | 6 |
| 2 | Article by Hon'ble Prof.Dr.Gajanan Ekbote<br>- कोरोना लसींचा प्रभाव आणि तिसरा डोस | 7 |
| 3 | Legacy of Progressive Education Society, Pune-5 | 8 - 10 |
| 4 | Work of Appreciation by Prof. Mrs. Jyotsna Ekbote | |
| | *-"ती" ची यशोगाथा नगरसेविका प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे* | 11 |
| | - *शिवाजीनगरला नवदुर्गांचा सन्मान* | 12 |
| | - *महापालिकेचा एव्हिएशन गॅलरी प्रकल्प लवकरच नागरिकांसाठी खुला* | 13 - 14 |
| | - *COVID-19 Vaccination Drive 25th October 2021 to 2nd November 2021* | 15 - 16 |
| | - *निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ* | 17 - 20 |
| 5 | ग्रेट भेट | 21 |
| 6 | Inauguration of new infrastructure of P.E.Society, Pune-5 | 22 - 29 |
| 7 | सर्वोत्कृष्ट कवितेचा सन्मान : Principal Dr. Rajendra Zunjarrao | 30 |
| 8 | Inaugural Function of Anthology of Marathi Poems 'फुलोरा 'by<br>Principal Dr. Rajendra Zunjarrao | 31 - 33 |
| 9 | Events conducted by NSS and NCC in October 2021 | |
| | - *Blood Donation Camp* | 35 - 36 |
| | - *Cleanliness Drive* | 37 - 38 |
| | - *Tree Plantation* | 39 |
| | - *Attending Programme of Victory Flame Arrival at SPPU, Pune* | 40 |

# Table of Contents


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 10 | Events conducted in the Library during October 2021 | |
| | *- Mahatma Gandhi Jayanti and Lal Bahadur Shastri Jayanti* | 41 - 42 |
| | *- Display of New Books* | 43 - 46 |
| | *- National Webinar on "Cultivating Reading Habits among students in digital era : Role of Libraries and Librarians" on 16th October 2021* | 47 - 55 |
| | *- Maharshi Valmiki Jayanti* | 56 |
| | *- Indira Gandhi Punyatithi and Sardar Vallabhbhai Patel Jayanti* | 57 |
| 11 | Event conducted by Department of Botany "आयुष आपके द्वार" | 58 |
| 12 | Activities conducted by Institutions Innovation Cell: Impact Lecture Series | 60 |
| 13 | Poster Competition and Rangoli Competition by Art Circle | 62 |
| 14 | Culfest Arohan 19 Prize Distribution Program , Business Administration Campus, Modern College, Pune-5 | 63 |
| 15 | Faculty Members invited as Resource Persons during October 2021 | |
| | *- Dr. Vaijayantimala Jadhav, Department of Marathi* | 65 |
| | *- Dr. Shantashree Sengupta, Librarian* | 66 |
| | *- Dr. Manisha Mandhare, Junior College* | 67 - 68 |
| | *- Prof. Sameer Nerlekar, Department of Animation* | 69 |
| 16 | Webinars attended by faculty members: Dr. Prabhakar Varade | 71 - 72 |
| 17 | Modern Achievements | |
| | *- Dr. Prerna Ubale, Head, Department of Hindi* | 74 - 77 |
| | *- Prof. Rashmi Kadam, Department of Psychology* | 78 |

# *Table of Contents*


| Sr.No. | Title | Page No.s |
|---|---|---|
| 17 | Modern Achievements (contd…) | |
| | - *Sunny Mankar, Student* | 79 |
| | - *Dr. Prabhakar Varade, Department of Electronics* | 80 |
| | - *Dr. Manisha Mandhare, Junior College* | 81 |
| 18 | Newly added and Books received in Gratis during October 2021 | 83 |
| 19 | Newspaper Clippings | |
| | - *Related to Progressive Education Society* | 85 |
| | - *Related to MCASC, Pune-5* | 86 - 95 |
| | - *Education* | 96 - 133 |
| | - *Research* | 134 - 136 |
| | - *Miscellaneous* | 137 - 138 |
| 20 | Upcoming Events | 139 |

# News Paper Clippings : Article by Honorable Prof.Dr.Gajanan Ekbote Sir, Chairman, Progressive Education Society, Pune 5

आदरणीय *प्रा. डॉ. गजानन एकबोटे सर (कार्याध्यक्ष, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे)* यांचा दैनिक सामना मधील कोरोना लसींचा प्रभाव आणि तिसरा डोस या विषयावरील लेख. दैनिक सामना या वृत्तपत्राच्या सर्व आवृत्तींमध्ये प्रकाशित

सामना

**प्रा. डॉ. गजानन रमाकांत एकबोटे**

## कोरोना लसींचा प्रभाव आणि तिसरा डोस

**लसीचे दोन डोस घेणे हे रुग्णालयात दाखल होण्यापासून अत्यंत संरक्षणात्मक आहे हे सिद्ध झाले आहे. तिसऱ्या डोसचा मुख्य फायदा संसर्गाविरुद्ध प्रभावीपणा सुधारण्यात असेल. सध्याच्या उपलब्ध माहितीनुसार तिसरा डोस प्रतिपिंडांच्या पातळीत सुधारणा करतो आणि तिसऱ्या डोसनंतर रोगप्रतिकारक शक्ती वाढवतो. त्यामुळे काही देशांमध्ये 'हाय रिस्क' रुग्णांना तिसरा डोस देण्यात येण्याची योजना आखली जात आहे. असे असले तरी, विचार करण्यासाठी इतर प्रश्न आहेत. सध्याची लस अद्याप मूळ 'वुहान स्ट्रेन'वर आधारित असल्याने दीर्घकालीन प्रभाविता ही एक चिंता आहे. जर दोन डोसनंतर प्रतिकारशक्ती कमी झाली तर तिसरा डोस किती काळ प्रभावी राहील? तिसरा डोस संभाव्य नवीन रूपांपासून (variants) संरक्षण करेल का, असे प्रश्न उरतातच.**

हिंदुस्थानात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेचा जोर आता कमी झाला आहे. लसीकरणातही १०० कोटींचा टप्पा गाठल्याचे सरकारने जाहीर केले आहे. तरीही चीनसह काही देशांमध्ये कोरोनाच्या साथीने पुन्हा उचल खाल्ली आहे. ही नक्कीच गंभीरपणे विचार करण्यासारखी स्थिती आहे. या पार्श्वभूमीवर कोरोना लसीचा प्रभाव (इफेक्टिव्हनेस) आणि या लसींच्या तिसऱ्या डोसची गरज व परिणाम याचा विचार करणे अपरिहार्य ठरते.

कोविड संसर्गावर लसीचा प्रभाव समजण्यासाठी (Vaccine Effectiveness) इस्रायल, इंग्लंड आणि अमेरिका या देशांकडून काढलेल्या निष्कर्षांनुसार खालीलप्रमाणे माहिती मिळाली आहे.

**लसीच्या प्रभावितेवर टक्केवारी माहिती :-**

**लसीच्या प्रभावितेवरील अलीकडील माहिती**

| | | | लसीचा प्रभाव लक्षणात्मक रोग (Symptomatic Diesease) | | लसीचा प्रभाव हॉस्पिटलायझेशन (Hospitalisation) | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| देश | मुख्य लस | ३१ ऑगस्ट २०२१ रोजी पूर्ण लसीकरण झालेली लोकसंख्या | आरंभिक (VE)% जाने. २०२१ ते १६ मे २०२१ | सध्याची Latest (VE)१७ मे २०२१ नंतर डेल्टा प्रकार आल्यानंतर लसीचा प्रभाव | आरंभिक १२ जाने. ते ४ जून २०२१ | सध्याची | अभ्यासाच्या तारखा |
| इस्रायल | mRNA | ६०.६% | ९५%[1] | ४०.५% | ८९%[1] | ८८.०% | २० जून २१-१७ जुलै २१ |
| अमेरिका | mRNA | ५३.०% | ९०%[2] | ४५% - ८०% | ९०%[2] | ७५%-९०% | आरंभिक : मार्च २१ सध्याची : जुलै २१ |
| इंग्लंड | AstraZeneca | ६४.४% | ९७%[2] | ७१-८४% | ९२%[2] | ९४% | दोन भिन्न अभ्यास |

वरील आकडेवारी दर्शवते की, संक्रमणापासून संरक्षण (लक्षणात्मक कोविडविरुद्ध प्रभावितेने दाखवल्याप्रमाणे) कमी झाले आहे, पण रुग्णालयात दाखल न होण्याचे प्रमाण वाढले आहे. इस्रायलच्या अभ्यासानुसार असेही दिसून आले आहे की, २०२१ च्या सुरुवातीला लसीकरण केलेल्या व्यक्तींना त्यानंतर लसीकरण केलेल्या लोकांच्या तुलनेत संसर्ग होण्याची कमी शक्यता दिसत होती.

**ही धोक्याची घंटा आहे का?**

नाही. कारण कोविड रुग्ण रुग्णालयात दाखल झाल्यामुळे बरे होण्याचे प्रमाण जास्त आहे. तद्वतच, सार्वजनिक लसीकरण कार्यक्रमाने लोकसंख्येला संसर्ग, प्रसारण आणि हॉस्पिटलायझेशन (आणि त्यानंतरच्या मृत्यू) पासून संरक्षित केले आहे. आरंभीच्या लसीच्या कार्यक्षमतेच्या आकडेवारीमध्ये संसर्ग आणि हॉस्पिटलायझेशनविरुद्ध उच्च कार्यक्षमता दिसून आली. संक्रमणापासून संरक्षण कमी झाले असले तरीही, हॉस्पिटलायझेशनच्या विरुद्ध लस अजूनही फायदेशीर आणि संरक्षणात्मक आहे. उपलब्ध माहिती असे दर्शविते की, लसीकरणामुळे रुग्णालयात दाखल होण्यापासून संरक्षण मिळते. इंग्लंडमधील रोगांचा अलीकडील अभ्यास याला दुजोरा देतो.

मानवी रोगप्रतिकारक प्रणाली अतिशय गुंतागुंतीची आहे. रोगप्रतिकारक प्रणाली रोग निर्माण करणाऱ्या घटकांपासून संरक्षण करते. खाली दिलेले स्पष्टीकरण ही एक मूलभूत रूपरेषा आहे. यामधील सगळ्याच गोष्टी शरीरात तंतोतंत घडत नाहीत.

जेव्हा विषाणू शरीराला 'संक्रमित' करतो, तो प्रामुख्याने दोन ठिकाणी आढळतो. एक म्हणजे रक्ताभिसरण प्रणाली, जी हा विषाणू शरीरामध्ये फिरण्यासाठी वापरतो. दुसरे म्हणजे विविध पेशी ज्यामध्ये विषाणू प्रवेश (invasion of tissues) करतो आणि या पेशींना गुणाकार (multiplication) करण्यासाठी वापरतो. या दोन ठिकाणी विषाणूचा सामना करण्यासाठी दोन मुख्य रोगप्रतिकारक यंत्रणा आहेत. एक म्हणजे प्रतिपिंडे आहे. प्रतिपिंडे विषाणूच्या प्रथिनांच्या पृष्ठभागावर अडकतात, ज्यामुळे ते आपल्या पेशींवर आक्रमण करण्यास प्रतिबंध करते. पुढे, ते विषाणूला नष्ट करतात. अशा प्रकारे, प्रतिपिंडे संरक्षणाची पहिली पायरी मानली जाऊ शकतात. परंतु विषाणूंनी पेशींमध्ये प्रवेश केल्यावर प्रतिपिंडे प्रभावहीन बनतात. या टप्प्यावर, रोगप्रतिकारक शक्ती ही योग्य ठरते.

रोगप्रतिकारक शक्तीचे Killer T Cell असे योग्य नामकरण झालेले आहे. या पेशी आपल्या शरीरातील स्वतःच्या पेशींना लक्ष्य करतात. ज्या या विषाणूंना आश्रय देतात आणि ज्यामध्ये विषाणूची प्रतिकृती निर्माण होते. T Cell अशा नष्ट करतात, त्यामुळे त्यांच्यातील विषाणू नष्ट होतो. आपल्या शरीराच्या पेशींमध्ये एकदा का विषाणूने प्रवेश केला की रोग होतो. जरी प्रतिपिंडांचा प्रतिसाद कमकुवत असेल तरी एक T Cell गंभीर रोगापासून संरक्षण करू शकते.

'T' पेशी विषाणू असलेल्या पेशींवर हल्ला करून त्यांना नष्ट करतात. लसीकरणामुळे निर्माण झालेली रोगप्रतिकारक शक्ती काळानुसार आणि विषाणूच्या बदलत्या प्रकारानुसार प्रतिसाद देते. प्रतिपिंडांचा प्रभाव कालांतराने कमी होतो. गरजेनुसार प्रतिपिंडे तयार करण्यासाठी शरीरामध्ये 'स्मरणशक्ती' असली तरी या प्रक्रियेला वेळ लागू शकतो. प्रतिपिंडांच्या कमकुवत आणि उशिरा प्रतिसादामुळे संसर्ग होऊ शकतो (लक्षणात्मक कोविड), परंतु जर T Cell प्रतिसाद योग्य असेल तर व्यक्ती गंभीर रोगापासून संरक्षित राहते.

याव्यतिरिक्त रोगाच्या एका प्रकारासाठी तयार झालेल्या रोगप्रतिकारक शक्तीला नवीन प्रकाराचा सामना करावा लागल्यास लसीची प्रभावीता कमी होऊ शकते. येथेही दोन उपचार पद्धतींच्या प्रतिसादातील फरक महत्त्वपूर्ण आहेत. प्रतिपिंडे प्रामुख्याने विषाणूच्या पृष्ठभागावरील प्रथिनांवर (प्रामुख्याने आकार किंवा थ्री डी कॉन्फिगरेशन) वर प्रतिक्रिया देतात. त्यामुळे या पृष्ठभागाच्या प्रथिनांमधील बदल प्रतिपिंड प्रतिसादाची प्रभावीता कमी करतात.

T Cell विषाणूंच्या पृष्ठभागावरील अनेक प्रथिनांना प्रतिसाद देतात. त्याचप्रमाणे विषाणूंच्या पृष्ठभागांवरील अनेक भागांवर हल्ला करतात. T Cell विस्तृत समूहाला प्रतिसाद देत असल्याने पृष्ठभागावरील प्रथिने नियंत्रित असलेल्या विशिष्ट भागावर प्रतिसाद देणाऱ्या प्रतिपिंडांच्या तुलनेत T Cell अधिक प्रतिरोधक असू शकतात.

T Cell प्रतिसादाची प्रभाविता हॉस्पिटलायझेशन विरुद्ध संरक्षण स्पष्ट करते. सध्या हे स्पष्टीकरण रोगप्रतिकारक प्रणालीच्या कार्याच्या सामान्य तत्त्वांवर आधारित निष्कर्ष आहे. काही व्यक्तींच्या केलेल्या अभ्यासावरून असे दिसून आले की, विषाणूंच्या बदलत्या स्वरूपासाठी T Cell प्रतिसाद प्रभावी आहे. वरील निष्कर्षांची पुष्टी करण्यासाठी अधिक संशोधन आवश्यक आहे.

यावरून असे लक्षात येते की, प्रतिपिंडे म्हणजे उपलब्ध संरक्षणात्मक संसाधनांची पूर्णता नाही. T Cell मोजमापांच्या तुलनेत प्रतिपिंडे चाचण्या करणे, मोठ्या प्रमाणावर मोजणे सोपे आहे. व्यक्तींनी मात्र अशा चाचण्यांवर अवलंबून राहू नये. लसीकरण करणे आणि कोविडसंदर्भात सर्व नियम पाळून तसे वर्तन करणे हे सर्वोत्तम आहे.

**तिसरा डोस मदत करेल का?**

लसीकरणाचे दोन्ही डोस घेतल्यामुळे रुग्णाला रुग्णालयात दाखल होण्यापासून वाचवते. साधन मर्यादित परिस्थितीत, पहिल्या व दुसरा डोस दिल्यानंतर तिसरा डोस देणे म्हणजे आधीच जीवन रक्षक कवच घातलेल्या व्यक्तींना अजून एक जीवनावश्यक कवच (लाईफ जॅकेट) देण्यासारखे आहे. ज्यांना जीवनरक्षक कवच मिळालेच नाही, अशा व्यक्तींना जीवनरक्षक कवच देणे आवश्यक आहे. त्यामुळे सामाजिक बांधिलकी स्पष्ट करता येईल. याशिवाय असे म्हणता येईल की, लसीचा प्रभाव कोरोना संक्रमणाबाबतीत कमी होत आहे, परंतु लस घेतल्याने रुग्णांना रुग्णालयात दाखल होण्याचे प्रमाण कमी होत आहे, असे संशोधनाअंती दिसून येत आहे. त्यामुळे आपल्या देशात प्रत्येक व्यक्तींचे पूर्ण लसीकरण होणे आवश्यक आहे. तिसरी मात्रा 'हाय रिस्क' रुग्णांनी घ्यावी, याबद्दल सर्व शास्त्रज्ञांचे एक मत आहे.

हिंदुस्थानात बहुसंख्य लोकसंख्येला पूर्णपणे लसीकरण केले गेले नाही आणि म्हणून त्यांना रुग्णालयात दाखल व्हावे लागते. शिवाय हिंदुस्थानी लोकसंख्येमध्ये दोन-डोसच्या प्रभावितेमध्ये संभाव्य घट आणि तिसऱ्या डोसच्या फायद्यांचा अभ्यास करणारी कोणतीही माहिती/संशोधन उपलब्ध नाही. या प्रश्नांमुळे आणि लसीच्या पुरवठ्यातील सतत येणाऱ्या अडचणींमुळे, रुग्णालयात दाखल होण्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पात्र लोकसंख्येचे (मुलांसाठी लसीकरणाच्या मंजुरीसह) पूर्ण लसीकरण झाले पाहिजे. मास्क वापरणे, वैयक्तिक स्वच्छता ठेवणे आणि गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळणे, बंद जागेमध्ये योग्य वायुविजन असणे यासारख्या गोष्टी अमलात आणाव्या लागतील. प्रसारावर नियंत्रण ठेवण्यासाठी मूलभूत खबरदारी चालू ठेवली पाहिजे.

*(लेखक बी. जे. वैद्यकीय महाविद्यालय, पुणे येथे शल्यचिकित्साशास्त्र (Surgery) चे प्राध्यापक आहेत.)*

# *Legacy of Progressive Education Society, Pune-5*



प्रभात 3/16

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी सातत्याने प्रयत्नशील राहिली आहे. नावीन्याचा ध्यास घेणे आणि नवनवीन तंत्रे आत्मसात करणे आणि त्यात विद्यार्थ्यांनाही सोबत घेऊन वाटचाल करणे हा संस्थेचा शिरस्ता. त्याकरता सगळ्या शाखा आणि महाविद्यालयांमध्ये सर्व सुविधाही निर्माण करण्यात आल्या आहेत. या अत्यंत आधुनिक अशा सुविधांमुळे समाजातील सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना ज्ञानप्राप्ती करणे शक्य आणि सुकर झाले आहे.

३

प्रभात रविवार, दि. १७ ऑक्टोबर २०२१

## प्रोग्रेसिव्हची "मॉडर्न" वाटचाल

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे मध्यवर्ती कार्यालय

पुण्यातील प्रख्यात शल्यचिकित्सक प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे यांनी १ जानेवारी १९९४ पासून प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी या संस्थेच्या नियामक मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून कार्यभार स्वीकारला. एक सर्वव्यापी आणि सर्वस्पर्शी व्यक्तिमत्त्व कार्याध्यक्षपदी लाभल्याने संस्थेचा विकास वेगाने झाला. दूरदृष्टी, कार्यकुशलता, अचूक निर्णय क्षमता, सर्वांगीण विकासाची सातत्याने स्वप्ने बघणारे आणि ती प्रत्यक्षात उतरविण्यासाठी कष्टांची तमा न बाळगणारे, सर्वांना बरोबर घेऊन प्रगतीची शिखरे पादाक्रांत करणारे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. एकबोटे यांच्या मार्गदर्शनामुळे संस्थेची उत्तरोत्तर प्रगतीच होत गेली. नवी कौशल्ये आत्मसात करणे आणि तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे या त्यांच्या कार्यशैलीला नियामक मंडळानेही चांगली साथ दिल्यामुळे ज्ञानाचा हा वटवृक्ष दिमाखात उभा राहिला आहे.

### काळानुरूप बदल

### प्रोग्रेसिव्ह उपक्रम

मा. श्री. भगतसिंग कोश्यारी (राज्यपाल, महाराष्ट्र राज्य) यांच्या हस्ते प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांचा विशेष गौरव करण्यात आला.

### दमदार वाटचाल

### पर्यावरणविषयक जागरूकता

### मॉडर्न आणि प्रोग्रेसिव्ह

### शाखा आणि विद्यार्थी

### गुणवंत विद्यार्थी

डॉ. गजानन र. एकबोटे
कार्याध्यक्ष :
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी, पुणे

# *Legacy of Progressive Education Society, Pune-5*

लोकमत

# मॉडर्न हायस्कूलची लखलखती परंपरा

'प्रोग्रेसिव्ह' आणि 'मॉडर्न' हे बिरुदावलीचे शब्द घेऊन १९३४ मध्ये मा. कै. शंकरराव कानिटकर सरांनी प्रोग्रेसिव्ह शिक्षण संस्थेची स्थापना केली. १९८६ पासून मा. कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांच्या कुशल नेतृत्वामुळे सध्या संस्थेच्या जवळ-जवळ ६० शाखा यशस्वीपणे कार्यरत आहेत.

१९८५ मध्ये शिवाजीनगर भागात मॉडर्न प्री-प्रायमरी (इंग्रजी माध्यम) शाळेची स्थापना झाली. १९८६ मध्ये मॉडर्न प्रायमरी (इंग्रजी माध्यम) शाळेची स्थापना टुमदार व प्रशस्त इमारतीमध्ये झाली. स्वच्छ परिसर, हवेशीर व प्रशस्त खोल्या, उच्चशिक्षित शिक्षक व सेवाभावी शिक्षकेतर कर्मचारी यांच्यामुळे शाळेने अल्पावधीतच उल्लेखनीय प्रगती केली. औषधी वनस्पतींची बाग, आकर्षक भित्तिचित्रे, L.C.D. व प्रोजेक्टरयुक्त AV रूम, ग्रंथालय, स्वतंत्र स्वच्छतागृहे, C.C.T.V. कॅमेरा अशा सोयींनी शाळेचा दर्जा उंचावत आहे. कोविड काळामध्ये ऑनलाइन शिक्षण अभ्यासक्रमानुसार उत्तमप्रकारे घेतले जाते. १९९३ मध्ये मॉडर्न हायस्कूलची (इंग्रजी माध्यम) स्थापना झाली. 'ज्ञानमयो भव' या ब्रीदवाक्याला अनुसरून सलग २६ वर्षे इ. १० वी च्या १०० टक्के निकालाची लखलखती परंपरा शाळेने निर्माण केली आहे. ९० टक्क्यांवर गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा अनेक नामवंत शिक्षणतज्ज्ञ व प्रसिद्ध राजकीय व्यक्तींच्या हस्ते सत्कार झाला आहे. कौशल्याधिष्ठित विद्यादानामध्ये शाळा नेहमीच अग्रेसर आहे. N.I.I.T. संस्थेतर्फे विद्यार्थ्यांना संगणक प्रशिक्षण दिले जाते. शाळेला सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा, ग्रंथालय, मोठे मैदान व pavilion आहे. क्रीडा विभागातून अनेक आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय, राज्यस्तरांवरील खेळाडू अभिमानास्पद कामगिरी करत आहेत. आत्तापर्यंत शाळेचे ३ माजी विद्यार्थी शिवछत्रपती पुरस्कार विजेते ठरले आहेत. विद्यार्थी पर्यावरण संवर्धनाचे धडे गिरवीत आहेत. शाळेच्या परकीय भाषा (जर्मन) विभागामध्ये मॅक्समूलर संस्थेच्या Pasch प्रकल्पांतर्गत अनेक विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मार्फत जर्मनीमध्ये शिकायला जाण्याची संधी मिळाली आहे. K12 India Pilot Programme हा USA मधील वेलकर्व्ह लॅब यांच्यामार्फत राबविला आहे. शाळेला पुणे मनपाचा स्वच्छ पुरस्कार, किर्लोस्कर स्वच्छ सुंदर शाळा पुरस्कार, वनराई हरित शाळा पुरस्कार, निसर्ग सेवक पुरस्कार या नामांकित पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. वारकऱ्यांसाठी 'मूठभर तांदूळ', सीमेवर लढणाऱ्या सैनिकांसाठी राखी व फराळ भेट, अंध व दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी लेखनिक अशा व इतर उपक्रमांमधून विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक कर्तव्याचे भान व जाणीव निर्माण होते. शाळेचे वेगळेपण जपणारा असा पुण्यातील एकमेवाद्वितीय प्रकल्प म्हणजे 'मॉडर्न एव्हिएशन क्लब'! या प्रशिक्षणांतर्गत २ विद्यार्थी उच्चशिक्षित होऊन भारतीय वायूसेनेत अधिकारी पदावर कार्यरत आहेत. शाळेच्या या ३ शाखांच्या देदीप्यमान वाटचालीत संस्थेचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. गजानन एकबोटे यांचे अमूल्य योगदान लाभले आहे. तसेच संस्थेचे कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, सहकार्यवाह प्रा. जोत्स्ना एकबोटे, सहकार्यवाह प्रा. सुरेश तोडकर, उपकार्यवाह प्रा. डॉ. प्रकाश दीक्षित, उपकार्यवाह प्रा. डॉ. निवेदिता एकबोटे, ॲड. डॉ. चिंतामणी घाटे यांचे वेळोवेळी बहुमोल मार्गदर्शन प्राप्त होते तसेच प्रोत्साहनपर कौतुकोद्गारांमुळे सौ. माधुरी शाह (मुख्याध्यापिका, हायस्कूल), सौ. माधवी देशपांडे (मुख्याध्यापिका, प्रायमरी स्कूल), सौ. जयश्री शाळीग्राम (मुख्याध्यापिका, प्री-प्रायमरी स्कूल) यांच्या नेतृत्वाखाली शाळेची वाटचाल यशस्वीरीत्या सुरू आहे.



प्रा. डॉ. गजानन एकबोटे,कार्याध्यक्ष पी.ई. सोसायटी

Hello Pune
Page No. 5 Oct 18, 2021
Powered by: erelego.com

## *Legacy of Progressive Education Society, Pune-5*

# PES's Modern College of Engineering: A step towards Excellence




College Building

Progressive Education Society is a reputed and distinguished institution in Maharashtra. It was established in 1934 in Pune by Lt. Hon. Shankarrao Kanitkar, along with his team of five prominent teachers and experts in the field of education. The activities of this Society have always been 'progressive' and 'modern'. The Hon Chairman Dr. G. R. Ekbote always inspires to provide education a real meaning and a new dimension to the society. Currently, 64 educational institutes, which include primary schools to post graduate professional & management institutes, spreads in and around Pune city are under the aegis of Progressive Education Society.

Modern College of Engineering was established in 1999 and is approved by AICTE, DTE, Government of Maharashtra and is permanently affiliated to SPPU. The Institute is accredited with A Grade by NAAC. Electronics & Telecommunication Engineering and Electrical Engineering programs are accredited by NBA. Institute has also been awarded the "Best College in the Urban Area" by SPPU.The Institute has state of art infrastructure with spacious and well ventilated class-rooms, laboratories, computer center, language laboratory, audio/video laboratory, central library, sports and gymnasium facilities, hostel, cafeteria etc.



Convocation Ceremony

The Institute offers undergraduate programs in Mechanical Engineering, Electronics and Telecommunication Engineering, Computer Engineering, Electrical Engineering, Information Technology Engineering, Artificial intelligence and Data Science, Artificial intelligence and Machine Learning and Electronics and Computer Engineering. Postgraduate programs are offered in Mechanical Engineering (Heat Power), Electrical Engineering (Control System), Electronics and Telecommunication Engineering (Signal Processing) and Computer Engineering (Computer Engineering), Masters In Computer Application (Under Engineering faculty) and Masters in Business Administration. PES Institute has four recognized research centers affiliated to Savitribai Phule Pune University namely Mechanical Engineering, Electrical Engineering, Electronics and Telecommunication Engineering and Management which offer Doctorate in Philosophy (PhD).

The Principal, Prof. Dr. K.R Joshi has led the Institute to new heights at national and international level. The Institute has collaborations with various industries and there are industry expert's talks. The Institute has been also selected by Ministry of Human Resource Development (MHRD), Govt. of India for establishment of IIC to systematically foster the culture of Innovation amongst Education Institutions. Students are encouraged for entrepreneurship and creating IPRs. The Institute has also established 'NPTEL', 'Spoken Tutorial' under MOOC and 'e-Yantra' lab in collaboration with IIT-Mumbai, for providing 'out of the book' learning assistance. Institute has been rated "A" and "AA" consecutively by IIT Madras for excellent performance in NPTEL in the year 2016 and 2017. Students at MCOE have won prizes in national level competitions like SAE-BAJA, Robocon, EFFICYCLE, GOKART and SUPRA, IEEE, IETE, ISTE, SAE, IEI, CSI, SMART INDIA HACKTHON etc.

The placement cell provides training to ensure that every student gets the required skills. PES's MCOE signed MOUs with various reputed companies and the major recruiters are TCS, Wipro, Zensar, Syntel, UNO MINDA, Bitwise, Harbinger, BYJU'S, Accenture, Tavisca, Mahindra, Autodesk etc. The alumni of MCOE have secured high positions in the corporate, whereas a few have started their own start up. The students of MCOE have achieved top ranks in University and many of students are placed in various reputed companies.

***For more details visit:***
***www.moderncoe.edu.in***
***Contact : 9922615959***

The Times of India 3.10.2021

# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*

पुणे नवदुर्गा उत्सव "ती" ची यशोगाथा नगरसेविका प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांची विशेष



# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*

सकाळ

## शिवाजीनगरला नवदुर्गांचा सन्मान

**शिवाजीनगर, ता. १८ :** भाजप शिवाजीनगर मतदारसंघाच्या वतीने नवदुर्गा सन्मान सोहळा झाला. शिवाजीनगर मतदारसंघातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा या वेळी सन्मान आमदार सिद्धार्थ शिरोळे, संघटन सरचिटणीस राजेश पांडे, दत्ता खाडे, प्रभाग समिती अध्यक्ष नीलिमा खाडे, नगरसेविका जोत्स्ना एकबोटे यांच्या हस्ते करण्यात आला.

या वेळी ज्योत्स्ना सरदेशपांडे, शामला देसाई, शकुंतला खटावकर, प्रमिला धाम, पूनम शेंडे, ज्योती देशपांडे, नीलिमा जगदाळे, कमल अनपट , उमा शर्मा, अदिती मोगर, मंजिरी जोशी, श्वेता पगार, शिवानी गोरे, कमल कांबळे, आशा सकपाळ, मालती काकडे, क्रांती कांबळे, संजना शहा यांचा सन्मान करण्यात आला. महिलांचा सन्मान हाच समाजाचा अभिमान असून, स्त्री शक्ती जन्मापासूनच वेगवेगळ्या रूपात आपल्यावर संस्कार करत असते, ज्याचा उपयोग आपल्याला आयुष्यभर समाजात वावरताना होत असतो. त्यामुळे आज हा सन्मान सोहळा आयोजित केल्याचा विशेष आनंद होत असल्याचे आयोजक अध्यक्ष रवींद्र साळेगावकर यांनी सांगितले.

आमदार शिरोळे म्हणाले, 'हा योग्य व्यक्तींचा सन्मान करणारा कार्यक्रम आहे. या व्यक्ती समाजामध्ये खऱ्याअर्थाने काम करत असतात आणि अशाप्रकारे मानसन्मान मिळाल्यामुळे काम करायला ऊर्जा मिळते, ही मंडळी कुठलीही अपेक्षा न ठेवता काम करत असतात.' या वेळी सरचिटणीस प्रतुल जागडे, गणेश बागडे सुनील पांडे, अपूर्व खाडे, महिला अध्यक्षा अपर्णा गोसावी तसेच मतदारसंघातील प्रमुख महिला व पदाधिकारी उपस्थित होते.



**मॉडेल कॉलनी : उल्लेखनीय काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करताना सिद्धार्थ शिरोळे, राजेश पांडे, दत्ता खाडे, नीलिमा खाडे आदी.**

Sakaal 19.10.2021

# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*



## *महापालिकेचा एव्हिएशन गॅलरी प्रकल्प लवकरच नागरिकांसाठी खुला!: 10 ते 25 रुपयांपर्यंत आकारले जाणार तिकीट: नागरिकांना, विमानाचे व विमान उदयोगाची माहिती होणार*

पुणे: महापालिकेच्या वतीने शहरात एव्हिएशन गॅलरी प्रकल्प उभा करण्यात आला आहे. या माध्यमातून नागरिकांना विमानाचे व विमान उदयोगाची माहिती होणार आहे. हा प्रकल्प लवकरच नागरिक आणि पर्यटकांसाठी खुला करण्यात येणार आहे. मात्र त्यासाठी महापालिकेने शुल्क आकारण्याचा निर्णय घेतला आहे. महापालिका प्रशासनाने हा प्रस्ताव मंजुरीसाठी शहर सुधारणा समितीच्या माध्यमातून मुख्य सभे समोर ठेवला होता . त्याला मुख्य सभेने मंजुरी दिली आहे.

**पुणे शहरासाठी मोठे आकर्षण**

पुणे महानगरपालिकेच्या शाळा क्र.१४ च्या आवारातील दर्शनी भागातील बंद असलेल्या शाळेच्या चार मजली इमारतीमध्ये , "एव्हीएशन गॅलेरी "हा प्रकल्प उभारण्याचे नियोजन भवन रचना विभागामार्फत केले होते. त्या अनुषंगाने म.न.पा.ची शाळा क्र.१४ मधील दर्शनी भागातील शाळेच्या इमारती मधील ग्राउंड फ्लोअर अधिक तीन मजले हा भाग "एव्हीएशन गॅलेरी "या प्रकल्पासाठी म.न.पा.च्या शिक्षण मंडळाने, भवन रचना विभागाला दिला होता. सदरील प्रकल्प वर्ग खोल्या ७१७.५८ चौ.मी.क्षेत्रफळावर साकारण्यात आलेला आहे. प्रकल्पाचा ताबा,मालमत्ता व व्यवस्थापन विभागामार्फत ०५ मार्च २०२० रोजी घेणेत आला आहे. तसेच या आगळया वेगळया प्रकल्पासाठी आवश्यक ते शुल्क आकारून सदर प्रकल्प विदयार्थ्यांना, नागरिकांना,पर्यटकांना खुला करण्याचे अनुषंगाने आवश्यक ती पुढील कार्यवाही सत्वर सुरू करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेच्या या आगळया वेगळया प्रकल्पाचे उद्घाटन 9 मार्च 2020 रोजी झाले.

# Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam

हा प्रकल्प सुरू करणे आवश्यक आहे. विमानाविषयी सर्वसामान्य नागरिकांच्या मनात नेहमीच एक कुतुहल असते,विमान तसेच वैमानिक उदयोगात असलेल्या रोजगाराचा विविध संधी याविषयी सर्वांगिण व शास्त्रशुध्द माहिती देणारे कायम स्वरूपी प्रदर्शन यामुळे "एव्हीएशन गॅलेरी 'युनिक आहे. या "एव्हीएशन गॅलेरी व्दारे विदयार्थ्यांना,पर्यटकांना,नागरिकांना, विमानाचे व विमान उदयोगाची माहिती होणार असुन पुणे शहरासाठी मोठे आकर्षण ठरणार आहे. त्यामुळे पुणे शहराच्या वैभवात भर पडणार आहे. त्यानुसार , "एव्हीएशन गॅलेरी" येथे तिकिट आकारणी करून सर्वांसाठी खुले केले जाईल.

**असे असेल तिकीट**

| | |
|---|---|
| व्यक्ती. | तिकिट |
| प्रौढ नागरिक. | २५/- प्रत्येकी |
| विदेशी नागरिक | ३००/- प्रत्येकी |
| दिव्यांग व्यक्ती | मोफत |
| ४. विदयार्थी शैक्षणिक सहल शिक्षकांसह. | |
| अ. खाजगी शाळामधील विदयार्थी. | १०/- प्रत्येकी |
| ब. म.न.पा.शाळा ,जिल्हा परिषद व शासकीय शाळांचे विदयार्थी | मोफत |
| लहान मुले १२ वर्षापर्यंत. | १०/- प्रत्येकी |

*माझ्या विकास निधीतून एव्हीएशन गॅलरी हा पुर्ण झाला आहे. हा प्रकल्प पुणेकर नागरिकांना लवकरत लवकर पाहता यावा यासाठी महापालिका प्रशासनाने लवकर निविदा प्रक्रिया पार पाडून हा प्रकल्प जनतेसाठी खुला करावा*

**नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे**

# Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam

## COVID-19 Vaccination Drive 25th October 2021 to 2nd November 2021

*मा.महापौर मुरलीधरजी मोहोळ, नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे, प्राचार्य झुंजारराव सर* व मॉडर्न महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या उपस्थितीत मॉडर्न महाविद्यालय शिवाजीनगर पुणे -05 या ठिकाणी राबवण्यात आलेली लसिकरण मोहीम यशस्वीरीत्या पार पडली.

















# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*























# Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam

## निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ

## नगरसेविका प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या प्रयत्नांना यश !!!!

निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ आज पिंपरी चिंचवडच्या महापौर मा .सौ.उषा उर्फ माई ढोरे, उपमहापौर मा. सौ नानी उर्फ हिराबाई घुले, नगरसेविका मा प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे उपाध्यक्ष –नाव समिती पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवडचे स्थानिक नगरसेविका मा.श्रीमती सुमन पवळे, नगरसेवक मा.श्री. सचिन चिखले, पीएमपीएमएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक मा.श्री.दतात्रय झेंडे, निगडी आगाराचे प्रमुख मा. श्री. शांताराम वाघेरे या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत निगडी येथे आयोजित करण्यात आला होता. या वेळी महापौर मा.सौ.उषा ढोरे यांच्या शुभहस्ते निगडी ते लोणावळा या बसचे वाहन चालक, वाहक यांचा सत्कार करण्यात आला .











# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*




*निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ: नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांच्या प्रयत्नांना यश*

पुणे : लोणावळा व पुणे शहराला जोडणारी बस सेवा सुरु . त्यामुळे लोणावळा ,मळवली ,कार्ले-भाजे लेणी याठिकाणच्या अनेक चाकरमानी, व्यापारी, विद्यार्थीवर्ग, अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्मचारीवर्ग हा पिंपरी चिंचवड शहर , पुणे शहराशी वेगवेगळ्या कामाच्या माध्यमातून या दोन्ही शहरांशी जोडला गेलेला आहे. या प्रवाश्यांच्या सोईसाठी पुणे स्टेशन ते लोणावळा तसेच निगडी ते लोणावळा बससेवा सुरु करावी अशी मागणी नगरसेविका ज्योत्स्ना एकबोटे यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा यांच्याकडे केली होती. या मागणीला तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत निगडी ते कामशेत ही पी.एम.पी.एम.एलची बससेवा मार्ग पुढे लोणावळा शहराशी जोडण्याचा निर्णय घेतला.

**सेवा उपलब्ध झाल्याचे समाधान : एकबोटे**

यातील अनेक नागरिकांना आपल्या उपजीविकेसाठी पुणे शहरापर्यंत रोज दुचाकी अथवा चारचाकी वाहनांद्वारे यावे लागत आहे . या वाहनांद्वारे दैनंदिन प्रवास केल्यामुळे अनेक नागरिक , कर्मचारी वर्गाला आरोग्य समस्येला तोंड द्यावे लागत होते. आज निगडी ते लोणावळा बस सेवा सुरु झाल्यामुळे या भागातील नागरिक , विद्यार्थी, व्यापारी वर्ग यांना आज दिलासा मिळाला आहे. तसेच जे अनेक नागरिक दैनंदिन कामानिमित्त दोन्ही शहरात वाहनांनी येत असतात त्यांना पी.एम.पी.एम.एलची वाहतूक सेवा उपलब्ध झाल्याचे समाधान नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ आज पिंपरी चिंचवड च्या महापौर उषा उर्फ माई ढोरे, उपमहापौर नानी उर्फ हिराबाई घुले, नगरसेविका मा प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे उपाध्यक्ष नाव समिती पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवडचे स्थानिक नगरसेविका सुमन पवळे, नगरसेवक सचिन चिखले, पीएमपीएमएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक दत्तात्रय झेंडे , निगडी आगाराचे प्रमुख शांताराम वाघेरे या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला . महापौर उषा ढोरे यांच्या निगडी ते लोणावळा या बससेवेचे वाहन चालक, वाहक यांचा सत्कार करण्यात आला.

# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*

महाराष्ट्र लोकमंच



***निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ; नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांच्या प्रयत्नांना यश*** October 29, 2021

पुणे : लोणावळा व पुणे शहराला जोडणारी बस सेवा सुरु . त्यामुळे लोणावळा, मळवली, कार्ले-भाजे लेणी याठिकाणच्या अनेक चाकरमानी , व्यापारी, विद्यार्थीवर्ग, अनेक वेगवेगळया क्षेत्रातील कर्मचारीवर्ग हा पिंपरी चिंचवड शहर, पुणे शहराशी वेगवेगळया कामाच्या माध्यमातून या दोन्ही शहरांशी जोडला गेलेला आहे. या प्रवाश्यांच्या सोईसाठी पुणे स्टेशन ते लोणावळा तसेच निगडी ते लोणावळा बससेवा सुरु करावी अशी मागणी नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लक्ष्मीनारायण मिश्रा यांच्याकडे केली होती या मागणीला तात्काळ सकारात्मक प्रतिसाद देत ,निगडी ते कामशेत ही पी.एम.पी.एम.एलची बससेवा मार्ग पुढे लोणावळा शहराशी जोडण्याचा निर्णय घेतला. यातील अनेक नागरिकांना आपल्या उपजीविकेसाठी पुणे शहरापर्यंत रोज दुचाकी अथवा चारचाकी वाहनांद्वारे यावे लागत आहे. या वाहनांद्वारे दैनंदिन प्रवास केल्यामुळे अनेक नागरिक, कर्मचारी वर्गाला आरोग्य समस्येला तोंड द्यावे लागत होते.

आज निगडी ते लोणावळा बस सेवा सुरु झाल्यामुळे या भागातील नागरिक, विद्यार्थी, व्यापारी वर्ग यांना आज दिलासा मिळाला आहे. तसेच जे अनेक नागरिक दैनंदिन कामानिमित्त दोन्ही शहरात वाहनांनी येत असतात त्यांना पी.एम.पी.एम.एलची वाहतूक सेवा उपलब्ध झाल्याचे समाधान नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले.

निगडी ते लोणावळा बस सेवेचा शुभारंभ आज पिंपरी चिंचवड च्या महापौर उषा उर्फ माई ढोरे ,उपमहापौर हिराबाई घुले, नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे उपाध्यक्ष – नाव समिती पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवडचे स्थानिक नगरसेविका मन पवळे, नगरसेवक सचिन चिखले, पीएमपीएमएलचे मुख्य वाहतूक व्यवस्थापक दतात्रय झेंडे, निगडी आगाराचे प्रमुख शांताराम वाघेरे या मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. महापौर मा.सौ.उषा ढोरे यांच्या निगडी ते लोणावळा या बससेवेचे वाहन चालक, वाहक यांचा सत्कार करण्यात आला.

# *Work of Appreciation: Prof. Mrs. Jyotsna Ekbote Madam*

सकाळ

## निगडी-लोणावळा बससेवेला प्रारंभ

**पुणे :** निगडी ते लोणावळादरम्यान पीएमपीच्या बससेवेला शुक्रवारी प्रारंभ झाला. लोणावळा, मळवली, कार्ले-भाजे लेणी याठिकाणच्या अनेक चाकरमानी, व्यापारी, विद्यार्थीवर्ग, अनेक वेगवेगळ्या क्षेत्रातील कर्मचारीवर्ग हा पिंपरी-चिंचवड शहर, पुणे शहराशी वेगवेगळ्या कामाच्या माध्यमातून या दोन्ही शहरांशी जोडला गेला आहे. या प्रवाशांच्या सोईसाठी पुणे स्टेशन ते लोणावळा तसेच निगडी ते लोणावळा बससेवा सुरू करण्यासाठी प्रा. ज्योत्स्ना एकबोटे यांनी पीएमपीकडे पाठपुरावा केली होता. त्यानुसार निगडी ते कामशेत हा मार्ग पुढे लोणावळा शहराशी जोडण्यात आला आहे. बससेवेच्या प्रारंभवेळी पिंपरी-चिंचवडच्या महापौर उषा ढोरे, उपमहापौर हिराबाई घुले, प्रा. एकबोटे नगरसेविका सुमन पवळ, नगरसेवक सचिन चिखले आदी उपस्थित होते.

Pune, Pune-Today
30/10/2021 Page No. 1



# ग्रेट भेट

जिंतूर- परभणीच्या आमदार मा. सौ. मेघनाताई बोर्डीकर यांनी नगरसेविका प्रा.सौ.ज्योत्स्ना एकबोटे यांच्या घरी सदिच्छा भेट दिली. या वेळी प्रा.डॉ.निवेदिता एकबोटे, अध्यक्षा भाजपा युवती आघाडी, पुणे यांनी स्वागत केले.

Dt. 30.10.2021







# *Inauguration of new infrastructure*


।। ज्ञानमयो भव ।।

सस्नेह निमंत्रण

• दिनांक •
शुक्रवार,
दि. २२ ऑक्टोबर २०२१

• स्थळ •
प्रो. ए. सोसायटीचे
सभागृह, मॉडर्न अभियांत्रिकी
महाविद्यालय आवार,
शिवाजीनगर, पुणे ५

• वेळ •
दुपारी ४.०० वाजता

।। श्री ।।
प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी
शिवाजीनगर, पुणे ५

सस्नेह नमस्कार,

प्रो. ए. सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील (शिवाजीनगर)
नूतन इमारतीचा उद्घाटन समारंभ
मा. ना. श्री. उदयजी सामंत (उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य)
यांच्या शुभहस्ते आणि
मा. खा. श्री. गिरीषजी बापट (सदस्य, लोकसभा)
प्रा. डॉ. नितीन करमळकर (माननीय कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)
यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान
मा. प्रा. डॉ. गजानन र. एकबोटे (M.S., M.N.A.M.S.)
(कार्याध्यक्ष, प्रो. ए. सोसायटी, पुणे ५)
हे भूषविणार आहेत. आपण या कार्यक्रमास उपस्थित राहून संस्थेवरील प्रेम वृध्दिंगत करावे, ही विनंती.

आपले स्नेहांकित,

प्रा. श्री. शामकांत देशमुख
कार्यवाह, प्रो. ए. सोसायटी

प्रा. सौ. ज्योत्स्ना एकबोटे
सहकार्यवाह, प्रो. ए. सोसायटी
उपाध्यक्षा, नाम समिती व नगरसेविका, पुणे म.न.पा.

प्रा. श्री. सुरेश तोडकर
सहकार्यवाह, प्रो. ए. सोसायटी

आणि
नियामक मंडळाचे सर्व सदस्य





# *Inauguration of new infrastructure*













# *Inauguration of new infrastructure*










# Inauguration of new infrastructure

## विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांचा प्रसार करून त्यांना प्रोत्साहन द्या -उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत

पुणे, दि.22: विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेल्या संशोधन प्रकल्पांना आणि त्यातून तयार केलेल्या उपकरणांना प्रसिद्धी देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीच्या उदघाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.नितीन करमळकर, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ.गजानन एकबोटे, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख आदी उपस्थित होते.
श्री.सामंत म्हणाले, विद्यार्थ्यांना तज्ज्ञ आणि विद्वान व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासोबत आवश्यक सुविधा देण्याचा प्रयत्न महाविद्यालयांनी करावा. प्रत्येक विद्यार्थी स्वावलंबी व्हावा हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. हे धोरण विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज आहे. देशातील शिक्षण प्रगत झाल्याशिवाय उद्योगविश्व किंवा जगाचे लक्ष आपल्याकडे जाणार नाही. त्यामुळे देशातील आदर्श शिक्षण प्रणाली तीन टप्प्यात आणली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात विद्यमान पायाभूत सुविधांचा आधारे विद्यार्थ्याला पुढे नेण्यासाठी उपक्रम राबविण्यात येतील. दुसऱ्या टप्प्यात शैक्षणिक संस्थामधील सुविधा अधिक उन्नत करणे आणि तिसऱ्या टप्प्यात शासन आणि संस्था मिळून नवे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या दिशेने वाटचाल करताना स्वायत्त संस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिवाळीनंतर संस्थांच्या प्रतिनिधींची कुलगुरूंसोबत बैठक घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.
उच्च शिक्षणासोबत राज्याचा इतिहास व संस्कृतीची ओळख विद्यार्थ्यांना होणे गरजेचे असून विद्यापीठांनी त्यादृष्टीने प्रयत्न करावे. परदेशात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपले ज्ञान आणि अनुभवाचा लाभ राज्यातील विद्यार्थ्यांना द्यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. ऑनलाईन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला न्यूनगंड दूर करण्याचा महाविद्यालयांनी आणि पालकांनी प्रयत्न करावा, त्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी शासन घेईल, असेही श्री.सामंत यांनी सांगितले.
कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, राष्ट्रीय शिक्षण देण्याच्या उद्देशाने स्वातंत्र्यपूर्व काळात पुणे शहरात शिक्षण संस्था उभ्या राहिल्या. या संस्थांनी शैक्षणिक विकासात चांगले योगदान मिळाले आहे. ऑनलाईन शिक्षणाच्या युगातील आवश्यक सुविधांची निर्मिती मॉडर्न महाविद्यालयाने केली आहे. या सुविधांचा विद्यार्थ्यांना चांगला उपयोग होईल. विद्यापीठाने उत्तम अभ्याक्रम उपलब्ध करून दिले असून विद्यार्थ्यांनी त्याचा उपयोग करावा असे आवाहन त्यांनी केले. संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ.एकबोटे यांनी यावेळी विचार व्यक्त केले. प्रास्ताविकात श्रीमती एकबोटे यांनी संस्थेच्या उपक्रमांची माहिती दिली.श्री.सामंत यांच्या हस्ते 'ज्ञानमय' या संशोधन साहित्याचे प्रकाशन करण्यात आले. त्यांच्या हस्ते गुणवंतांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी श्री.सामंत यांच्या हस्ते संस्थेची नूतन इमारत, संगणक कक्ष आणि वर्गखोलीचे उदघाटन करण्यात आले. त्यांनी विद्यार्थ्यांकडून नावीन्यपूर्ण प्रकल्पांची माहिती घेतली.

## *Media Coverage of the Inauguration of new infrastructure*



पुणे : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन संस्थेच्या नुतन इमारतीचा उद्‌घाटन समारंभ उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांच्या हस्ते पार पाडला.

# नवीन शैक्षणिक धोरण आदर्शवत

**प्रत्येक विद्यार्थी स्वावलंबी व्हावा हेच उद्दिष्ट : उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २२ -** नवीन शैक्षणिक धोरण आदर्शवत असून, प्रत्येक विद्यार्थी स्वावलंबी व्हावा हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. हे धोरण विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी संस्था आणि विद्यापीठांनी पुढाकार घ्यायला पाहिजे, अशी अपेक्षा उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केली.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शिवाजीनगर येथील मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीचे उद्‌घाटन सामंत यांच्या हस्ते झाले. यावेळी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह प्रा. शामकांत देशमुख, प्रा. सुरेश तोडकरसह आदी उपस्थित होते.

याप्रसंगी ज्ञानमय या संशोधन साहित्याचे प्रकाशन करण्यात आले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटी या संस्थेतर्फे सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत दर्जेदार शिक्षण देत असून, ही बाब गौरवास्पद आहे. असे सांगत उदय सामंत म्हणाले, नवीन शैक्षणिक धोरणात काही बदल सूचवित उच्च दर्जाचे शैक्षणिक धोरण ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली समितीने राज्य शासनाकडे शिफारस केली आहे. या धोरणाची योग्यपणे अंमलबजावणी करण्यासाठी संस्था व विद्यापीठाची भूमिका ठरणार आहे. तसेच, स्वायत्तता संस्थाचे प्रश्न सोडविण्यासाठी दिवाळीनंतर पुण्यात सर्व कुलगुरूंची बैठक संस्थांच्या प्रतिनिधींसोबत घेण्यात येणार असल्याचे आश्वासन सामंत यांनी दिले.

कुलगुरू डॉ. करमळकर यांनी कौशल्याभिमुख अभ्यासक्रम असलेल्या डिग्री प्लस या संकल्पनेची माहिती दिली.

डॉ. एकबोटे म्हणाले, स्वायत्ता संस्थांना राज्य शासन व विद्यापीठाकडून प्रतिसाद मिळत नाही. तसेच, नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करताना येणाऱ्या प्रश्नांकडे त्यांनी लक्ष वेधले. तसेच प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती सुरू करावी आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना न्याय मिळावा म्हणून एकच व्यासपीठ असावी. या सर्व पार्श्वभूमीवर राज्य सरकारने संस्थांना प्रोत्साहनचे धोरण स्वीकारावे, अशी अपेक्षा डॉ. एकबोटे यांनी मांडली. प्रा. ज्योस्त्ना एकबोटे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. शामकांत देशमुख यांनी परिचय करून दिला. कल्याणी जोशी यांनी सूत्रसंचालन केले.

प्रभात Sat, 23 October 2021 https://epaper.eprabhat.net/c/63911664

---

**सामना**

# विद्यार्थ्यांच्या संशोधन प्रकल्पांना प्रोत्साहन द्या!

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) – विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेल्या संशोधन प्रकल्पांना आणि त्यातून तयार केलेल्या उपकरणांना प्रसिद्धी देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे, असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नवीन इमारतीच्या उद्‌घाटन कार्यक्रमात सामंत बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह, नगरसेविका प्रा. ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह प्रा. श्यामकांत देशमुख, सहकार्यवाह सुरेश तोडकर आदी उपस्थित होते. यावेळी सामंत यांच्या हस्ते ज्ञानमय या संशोधन अहवालाचे प्रकाशन करण्यात आले.

सामंत म्हणाले, ऑनलाईन परीक्षेमुळे विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण झालेला न्यूनगंड दूर करण्याचा महाविद्यालयांनी आणि पालकांनी प्रयत्न करावा. कोणत्याही विद्यार्थ्यांच्या सर्टिफिकेटवर कोविड बॅच असा उल्लेख नसणार आहे. विद्यार्थ्यांचे कोणतेही नुकसान होणार नाही याची काळजी शासन घेईल. इंडस्ट्रीजमध्ये ऑनलाइन परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत वेगळे धोरण राबविल्यास संबंधितांवर गुन्हा दाखल करण्यास शासन मागे पाहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

विद्यापीठ कायद्यातील बदलांसाठी यूजीसीचे माजी अध्यक्ष सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. विद्यापीठ कायद्यातील बदलांमुळे राज्यपाल, कुलगुरू, कुलसचिव यांच्या अधिकारांवर गदा येणार असल्याची चर्चा सुरू झाली. परंतु, सर्वांचे अधिकार अबाधित राहणार आहेत. नव्या शैक्षणिक धोरणाशी सुसंगत असा हा विद्यापीठ कायदा राहील. राज्यातील जवळपास ५८ संस्थांमध्ये चांगल्या पद्धतीने कामकाज सुरू आहे. विविध समस्या सोडविण्यासाठी दिवाळीनंतर पुण्यात येऊन सर्व कुलगुरू आणि संस्थाचालकांची विशेष बैठक घेणार असल्याचेही सामंत यांनी सांगितले.

यावेळी डॉ. नितीन करमळकर, डॉ. गजानन एकबोटे यांचीही भाषणे झाली.

## २५ वर्षे आम्हीच सत्तेत राहू

राज्यातील सरकार पाच वर्षे टिकणार आहे, त्यामुळे अजून दोन-तीन वेळा आपण मॉडर्न कॉलेजच्या कार्यक्रमांसाठी यावे, असे निमंत्रण डॉ. एकबोटे यांनी उदय सामंत यांना दिले. यावर बोलताना सामंत म्हणाले, आम्ही अजून ३ नव्हे २५ वर्षे सत्तेत राहू. फक्त तुम्ही बोलवत राहा. आम्ही मुंबईत मजबुतीने उभे आहोत, तुम्ही नाही बोलवले तरी मी येईन, असे मिश्कीलपणे सामंत यांनी सांगताच सभागृहात हशा पिकला.

Pune Edition
Oct 23, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# *Media Coverage of the Inauguration of new infrastructure*

## 'संशोधन प्रकल्पांना प्रोत्साहन द्या'

पुणे : 'विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेल्या संशोधन प्रकल्पांना आणि त्यातून तयार केलेल्या उपकरणांना प्रसिद्धी देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहन द्यावे,' असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी महाविद्यालयांना उद्देशून शुक्रवारी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीच्या उद्‍घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख उपस्थित होते. 'नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याची गरज आहे,' असे सामंत यांनी सांगितले.

Maharashtra Times 23.10.2021



From left: Dattatray Jadhav, department of technical education; State higher and technical education minister Uday Samant; Prataprao Pawar, president of COEP governing council; and COEP director, Prof BB Ahuja, at a student interaction at the COEP on Friday. HT PHOTO

## Get off the online studies: Samant

Dheeraj Bengrut
puneletters@htlive.com

PUNE: As colleges have been allowed to reopen in the state, students are not yet coming in to attend lectures. College administrations are planning to go back to offline classes after the Diwali vacation. Students should start practising now for offline classes and examinations. They need to come out of the online learning mode," said state technical and higher education minister, Uday Samant.

He was speaking at a press conference held on Friday at the College of Engineering Pune (COEP).

"The reason many students are not turning up to college is the lack of two vaccination doses. So a massive vaccination drive specially for college students is going to start from October 25 to November 2. Before Diwali, our target is to vaccinate as many as four million students in the state under the 'Yuva Swasthya Mission'," he added.

When asked about the long-pending issue of COEP's university status, Samant said, "All our efforts are on to make COEP a university, and we are working towards it. Not only COEP, but also the J J School of Arts in Mumbai, both will be given university status hopefully by the next academic year."

When asked about the opening up of college hostels, and canteens, he said, "We are ready to open the university and college hostels and messes, but this responsibility is given to the respective directors of the higher and technical education departments.

They are studying the safety precautions to be taken and guidelines for opening up of the hostels."

### 'Research projects need to be encouraged, made public'

HT Correspondent
puneletters@htlive.com

PUNE : Research projects made by students, and that end results of such research needs to be public. Also, students need to be encouraged to do research in various fields," said state technical and higher education minister Uday Samant. He was speaking at the inauguration of the Progressive Education Society (PES) in Shivajinagar on Friday.

Vice-chancellor Savitribai Phule Pune University's (SPPU) Prof Nitin Karmalkar and PES executive director Prof Gajanan Ekbote were present.

Colleges should try to get industry experts and talented people from society to act as guides.

"The main objective of the new education policy is to make each and every student self dependent. Also it is necessary to take this new policy to every student," he added.

Later, a session on "Cyber Suraksha" in the context of online and blended education was held at the Suryadatta Institute at which education minister Samant participated.

Hindustan Times 23.10.2021

# *Media Coverage of the Inauguration of new infrastructure*

सकाळ TODAY

पुणे, रविवार, २४ ऑक्टोबर २०२१ १

## नव्या शिक्षण धोरणाचा लवकरच श्रीगणेशा

### उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांचे सूतोवाच; हिवाळी अधिवेशनात धोरण मांडणार



शिवाजीनगर : प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीचे उद्घाटन करताना उदय सामंत. या वेळी ज्योत्स्ना एकबोटे, डॉ. नितीन करमळकर, डॉ. गजानन एकबोटे आदी.

पुणे, ता. २३ : "राज्यात लवकरच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यात येणार आहे. या धोरणाचा अभ्यास करण्यासाठी ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीने राज्य सरकारला शिफारशींचा अहवाल दिला आहे. त्यानुसार लवकरच राज्यात नवीन शैक्षणिक धोरण तयार करण्यात येईल. येत्या हिवाळी अधिवेशनात हे धोरण मांडण्यात येईल," असे सूतोवाच राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नवीन इमारतीचे उद्घाटन सामंत यांच्या हस्ते शुक्रवारी झाले. या वेळी ते बोलत होते. कार्यक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, सोसायटीचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख, सरकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, सुरेश तोडकर उपस्थित होते.

सामंत म्हणाले, "राज्यात नवीन शैक्षणिक धोरण आखण्यात येत असून, त्याची तीन टप्प्यांत अंमलबजावणी करण्यात येईल. पहिल्या टप्प्यात पायाभूत सुविधांच्या आधारे देशात प्रगतिशील विद्यार्थी नावारूपाला येतील, यावर भर असेल. दुसऱ्या टप्प्यात शैक्षणिक संस्थांना अधिक सुविधा पुरवून बळ दिले जाईल. तिसऱ्या टप्प्यात शिक्षण संस्था आणि शासन एकत्रित प्रयत्नातून शिक्षण व्यवस्थेला चालना दिली जाईल."

'महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६' मध्ये सुधारणा सुचविण्यासाठी डॉ. सुखदेव थोरात यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली. परंतु यामुळे समितीमुळे कुलपती, कुलगुरू यांच्या अधिकारांवर गदा येणार, असा चुकीचा समज पसरविण्यात आला. परंतु असे काही होणार नाही. कुलपती, कुलगुरू यांचे सर्व अधिकार कायम राहतील, असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

**...तर उद्योगांवर गुन्हे दाखल करू**

कोरोना काळात परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यास सांगण्यात आले होते. परंतु 'कोरोना बॅच' असा अपप्रचार करण्याचा प्रयत्न होत असल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होत आहे. पण कोरोना काळात परीक्षा दिल्यामुळे विद्यार्थ्यांना एखाद्या उद्योगाने नोकरीवर घेतले नाही, असा प्रकार समोर आल्यास तो उद्योजक कितीही मोठा असो, त्यावर गुन्हा दाखल केला जाईल, असे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले.

पुढारी

## संशोधनासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करा : सामंत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

'विद्यार्थ्यांनी परिश्रमपूर्वक तयार केलेल्या संशोधन प्रकल्पांना आणि त्यातून तयार केलेल्या उपकरणांना प्रसिद्धी देऊन विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे,' असे आवाहन राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केले.

प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या मॉडर्न शैक्षणिक संकुलातील नूतन इमारतीच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाला सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, संस्थेचे अध्यक्ष विघ्नहरी महाराज देव, कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, सहकार्यवाह ज्योत्स्ना एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख आदी उपस्थित होते.

सामंत म्हणाले, 'विद्यार्थ्यांना तज्ज्ञ आणि विद्वान व्यक्तींचे मार्गदर्शन उपलब्ध करून देण्यासोबत आवश्यक सुविधा देण्याचा प्रयत्न महाविद्यालयांनी करावा. प्रत्येक विद्यार्थी स्वावलंबी व्हावा, हेच नव्या शैक्षणिक धोरणाचे उद्दिष्ट आहे. हे धोरण विद्यार्थ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहचविण्याची गरज आहे. देशातील शिक्षण प्रगत झाल्याशिवाय उद्योगविश्व किंवा जगाचे लक्ष आपल्याकडे जाणार नाही. त्यामुळे देशातील आदर्श शिक्षणप्रणाली तीन टप्प्यांत आणली जाणार आहे. पहिल्या टप्प्यात विद्यमान पायाभूत सुविधांच्या आधारे विद्यार्थ्याला पुढे नेण्यासाठी उपक्रम राबविण्यात येतील. दुसऱ्या टप्प्यात शैक्षणिक संस्थांमधील सुविधा अधिक उन्नत करणे आणि तिसऱ्या टप्प्यात शासन आणि संस्था मिळून नवे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. या दिशेने वाटचाल करताना स्वायत्त संस्थांचे प्रश्न सोडविण्यासाठी दिवाळीनंतर संस्थांच्या प्रतिनिधींची कुलगुरूंसोबत बैठक घेण्यात येईल.'

-Prof. Vikram Phale,
Director, Physical Education










# *Congratulations Dr. Prabhakar Varade*











# *Congratulations Dr. Prabhakar Varade*

**Savitribai Phule Pune University**
(Formerly University of Pune)

*Telephone No*: **25621171/1174**
*E-mail* : ***rr@unipune.ac.in***
*Telegraph* : **`UNIPUNE'**
*Fax No* : **25691233**

**ACADEMIC SECTION**
**Ganeshkhind, PUNE-411 007**

**Ref. No:** BOD/Sci. & Tech./05/249 **Date: 21/10/2021**

**To**

Dr.Prabhakar Shivdas Varade
Progressive Education Society Modern
College Shivajinagar Addr: Shivajinagar Pune
Ta: Pune (corporation Area) Dist: Pune
Pincode :411005

**Subject : Recognition as a Post-Graduate Teacher**

Sir,

Please refer to your application for Recognition as a Post-Graduate Teacher of Savitribai Phule Pune University, I am directed to inform you that the University authorities have been pleased to recognize you as a Post-Graduate Teacher of this University under the provision of Section 37(1) (e) of the Maharashtra Public Universities Act, 2016.

***The details of your recognition are as under :***

1. You have been recognized as a **Post- Graduate Teacher (By Papers)** under the faculty of **Science and Technology** in the subject of **Electronic Science** with effect from **20-09-2021** to till your age of superannuation or you are ceased to be in service of the Affiliated College / Recognized Institute / Research Institute from where you had applied for the recognition as a Post Graduate Teacher.

Recognition granted to you is always subject to the terms and conditions prescribed by the University and University Grants Commission, New Delhi from time to time, in this behalf.

If any correction in the recognition letter then please contact this office within fifteen days from the date of receipt of this letter.

Thanking you.

Yours,

**(M.V. Rasve)**
**Deputy Registrar**
**Academic Section**

1 of 2 P.T.O.








# *Congratulations Dr. Manisha Mandhare*



सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

विज्ञान विभाग

प्रमाणपत्र

कोविड-१९ च्या कालावधीमध्ये
श्रीम. मनिषा मांढरे पद - प्राध्यापक
मॉडर्न महाविद्यालय, पुणे यांनी
इयत्ता बारावीच्या 'जीवशास्त्र प्रश्नपेढी' विकसनासाठी
स्वयंप्रेरणेने दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हे प्रमाणपत्र
सन्मानपूर्वक प्रदान करण्यात येत आहे.

विकास गरड
उपसंचालक (समन्वय)
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

दिनकर टेमकर
संचालक
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.





## *NEWLY ADDED AND BOOKS RECEIVED IN GRATIS DURING OCTOBER 2021*

| Sr. no. | Author | Title |
|---|---|---|
| 1. | Dr. Rajendra Zunjarrao | Fulora(फुलोरा) |
| 2. | Dr. Nayana Kulkarni | Masterpiece(मास्टरपीस) |
| 3. | S.R.Rahangdale/ S.S.Rahangdale | Biodiversity of Durgawadi Plateaus |









# *News Paper Clippings : October 2021*




Online newspapers and online services based on newspapers are becoming increasingly popular and useful in current digital age. These services helped libraries in reaching out users wherever they are and also save time of the users. The newspaper clippings are also known as press clippings in some libraries .
[*Ref: Gaur, Ramesh C., Chand, Mahesh, Gaur, Kavita & Yadav, Amar Singh. (2013). Online Newspaper Clippings and News Services for Libraries: Experiences in Indian Libraries. Accessed from http://library.ifla.org/240/1/153-gaur-en.pdf* ]

**Clipping** is the cutting-out of articles from a paper publication. Newspaper clippings are often used when people have to write a report or make a presentation or for future reference.

The Modern College, Shivajinagar Library subscribes to Ten (10) English Newspapers and Eleven (11) Marathi Newspapers which are referred by the students and staff. The Library has a practice of posting notifications of important news related to Education, UGC, NAAC, Savitribai Phule Pune University on the WhatsApp Groups of Staff.

Father of Library Science, Dr. S.R.Ranganathan's Fifth Law of Library Science states that *'Library is a Growing Organism'*. It means that a library should be a continually changing institution, never static in its outlook. Books, methods, and the physical library should be updated over time. As an implication of the Fifth Law of Library Science, the Modern College Library has also updated the ways of keeping and maintaining the Newspaper Clippings. E-newspaper Clippings Service gives a global viewership/user base, no maintenance required, storage space issues will be solved and any user, anytime, at any place can have an access to the Newspaper Clippings Service. The E-Newspaper Clippings Section is divided into ***News regarding MCASC, Pune-5, Education, Work of Appreciation, Health, Research, Sports, Miscellaneous .***



# *News Paper Clippings related to Progressive Education Society, Pune 5*

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

पुणे : गणेशखिंड येथील मॉडर्न हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालयात गुणवंत विद्यार्थी सत्कार करण्यात आला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे सिनेट सदस्य संतोष ढेरे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते. पालक शिक्षक संघातर्फे मार्च २०२१ मधील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव झाला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य संजय खरात, शाळा समिती अध्यक्ष दीपक मराठे, चित्तरंजन कांबळे आणि दादाभाऊ शिनलकर उपस्थित होते. मुख्याध्यापिका रोहिणी काळे यांनी प्रास्ताविक केले.

Sakaal 4.10.2021



गणेशखिंड रस्त्यावरील मॉडर्न हायस्कूलमध्ये ग्रंथप्रदर्शन आयोजित करण्यात आले होते.

## 'मॉडर्न'मध्ये अभिवाचन

पुणे : गणेशखिंड रोडवरील मॉडर्न हायस्कूल या ठिकाणी वाचन प्रेरणा दिन नुकताच उत्साहात झाला. इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी कथा व अभिवाचन घेतले. प्रमुख पाहुणे संजय भोसले, मुग्धा नलावडे; तसेच गीता भावसार आणि माजी विद्यार्थिनी आर्या भावसार उपस्थित होते.

संजय भोसले यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व सांगितले. वाचनाने चारित्र्यसंवर्धन कसे होते त्याचे स्वतःच्या आयुष्यात घडलेल्या प्रसंगांवरून उदाहरण दिले. भोसले यांच्या हस्ते ग्रंथालयातील प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. दहावीची विद्यार्थिनी तनुजा शेळके हिने सर्वांना वाचन प्रतिज्ञा दिली. नलावडे यांनी 'सिंहाचा दिवा' आणि 'नरू' या दोन गोष्टींचे अभिवाचन करताना सर्व विद्यार्थी आणि शिक्षक मंत्रमुग्ध झाले. मुख्याध्यापिका सुरेखा कामथे यांनी 'रखमा म्हणत्यात मला' या स्वरचित नाट्यछटेचे सादरीकरण केले. गीता भावसार व आर्या भावसार यांनी एपीजे अब्दुल कलाम यांचे अग्निपंख, पु. ल. देशपांडे यांचे 'खोगीर भरती'चे अभिवाचन केले. करोनाचे संकट अजूनही कमी झाले नसल्याने विद्यार्थ्यांची गर्दी होऊ नये म्हणून हे कार्यक्रम प्रशालेच्या तीन वेगवेगळ्या ठिकाणी आयोजन करण्यात आले होते. प्रोग्रेसिव्ह एज्युकेशन सोसायटीचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह श्यामकांत देशमुख, शाला समितीचे अध्यक्ष दीपक मराठे, व्हिजिटर चित्तरंजन कांबळे, नियामक मंडळाचे सदस्य उद्धव खरे, शांताराम पिंगळे यांचे कार्यक्रमासाठी विशेष मार्गदर्शन लाभले.

मुख्याध्यापिका कामथे, उपमुख्याध्यापिका वंदना सोनोने, पर्यवेक्षक शीलरतन बंगाळे; स्वाती देवळे यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. रूपाली केसकर, साधना राऊत, शिवाजी अंबिके, किरण भामरे, सविता बोराटे, वासंती विभांडिक, नितीन सुर्वे, हरीश गुट्टे, हर्षल सोनवणे, अक्षय ढोले; तसेच प्रशालेतील सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले.

Maharashtra Times 19.10.2021

## मॉडर्न हायस्कूल गणेशखिंड येथे वाचन प्रेरणा दिन

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २२ - गणेशखिंड रोडवरील मॉडर्न हायस्कूल येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे संजय भोसले, मुग्धा नलावडे, गीता भावसार आणि माजी विद्यार्थिनी आर्या भावसार होते. यावेळी ऑनलाइन माध्यमातून विद्यार्थ्यांनी कथा व अभिवाचन घेतले.

यावेळी संजय भोसले यांच्या हस्ते ग्रंथालयातील प्रदर्शनाचे उद्घाटन झाले. ग्रंथालयामधील पुस्तके व त्यांचे नियोजन यासाठी त्यांनी गौरवोद्गार काढले. यासाठी त्यांनी ग्रंथपाल संगीता नरुटे यांचे अभिनंदनही केले. विद्यार्थिनी तनुजा शेळके हिने सर्वांना वाचन प्रतिज्ञा दिली.

प्रो.ए. सोसायटी शिवाजीनगर पुणेचे कार्याध्यक्ष डॉ. गजानन एकबोटे, कार्यवाह शामकांत देशमुख, शाला समितीचे अध्यक्ष दीपक मराठे, चित्तरंजन कांबळे, नियामक मंडळाचे सदस्य उद्धव खरे, शांताराम पिंगळे यांनी कार्यक्रम आयोजनाबद्दल कौतुक केले. मुख्याध्यापिका सुरेखा कामथे, उपमुख्याध्यापिका वंदना सोनोने, पर्यवेक्षक शीलरतन बंगाळे, स्वाती देवळे, रूपाली केसकर यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले. साधना राऊत, शिवाजी अंबिके, किरण भामरे, सविता बोराटे, वासंती विभांडिक, नितीन सूर्वे, हरीश गुट्टे, हर्षल सोनवणे, अक्षय ढोले आदी उपस्थित होते.

प्रभात Sat, 23 October 2021 https://epaper.eprabhat.net/c/63911

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

### प्रथम केवळ प्रात्यक्षिके सुरू : ओळखपत्रावरच व्हॅक्सिनेशनचा शिक्का

# महाविद्यालये उघडताना संस्थाचालकांचे 'सावधान'

**स्पेशल रिपोर्ट**

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : शहरातील महाविद्यालये सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला असला तरी नामांकित महाविद्यालयांच्या चालकांनी सावध भूमिका घेतली आहे. त्यामुळे प्रत्यक्षात वर्गात बसून शिकण्याच्या क्षणाची गेल्या दीड वर्षापासून वाट पाहणाऱ्या विद्यार्थ्यांना आणखी काही दिवसांची प्रतीक्षा करावी लागणार आहे. शास्त्र, अभियांत्रिकी आदी शिक्षणातील प्रात्यक्षिके (प्रॅक्टिकल्स) मात्र लवकर चालू होऊ शकतात. काही जिल्ह्यांमधील गावे आजही बंद ठेवण्यात आली आहेत. या भागातून येणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे कोरोना पसरण्याची शक्यता नाकारता येत नाही. कोरोना प्रतिबंधक लस घेणाऱ्या विद्यार्थ्यांनाच ऑफलाइन शिक्षण दिले जाणार आहे, तर बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आरटीपीसीआर चाचणी बंधनकारक केली आहे.

पुणे शहर परिसरातील शैक्षणिक संस्थांमध्ये अहमदनगर, नाशिक, सातारा, सांगली, सोलापूर, कोल्हापूर आदी जिल्ह्यांतील तसेच परराज्यातील विद्यार्थी शिक्षणासाठी येतात. या जिल्ह्यांमधली तसेच जिल्ह्यातील कोरोना परिस्थिती पूर्णपणे आटोक्यात आलेली नाही. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर तब्बल दीड वर्षापासून बंद आलेली महाविद्यालये दिवाळीनंतर सुरू होतील, अशी घोषणा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी केली होती. मात्र, अजित पवार यांनी येत्या सोमवारपासून महाविद्यालये सुरू करता येतील, असे शुक्रवारी स्पष्ट केले. त्यात महापालिकेने पुन्हा बदल केला; परंतु अनेक विद्यार्थ्यांनी अद्याप कोरोना प्रतिबंधक लस घेतल्या नाहीत. तसेच विद्यार्थ्यांनी लस घेतली किंवा नाही; हे तपासण्यासाठी महाविद्यालयांना यंत्रणा निर्माण करावी लागणार आहे. त्यामुळे काही महाविद्यालयांनी सुरुवातीला केवळ प्रात्यक्षिकांसाठी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात बोलविण्याचा निर्णय घेतला आहे, तर काहींनी विद्यार्थ्यांच्या ओळखपत्रावर लस घेतली असल्यास त्याबाबत शिक्का देण्याचे निश्चित केले आहे.



विद्यार्थ्यांनी लस घेतली किवा नाही हे तपासण्यासाठी महाविद्यालयांकडे स्वतंत्र यंत्रणा नाही. त्यामुळे स. प. महाविद्यालयातर्फे शुल्क भरलेल्याची पावती पाहून विद्यार्थ्यांना आठवड्याभरात ओळखपत्र (आयकार्ड) दिले जाईल. दोन डोस घेतले असल्यास संबंधित विद्यार्थ्याच्या ओळखपत्रावर 'व्हॅक्सिनेटेड'असा शिक्का दिला जाईल. अशाच विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश देऊन त्यांना वर्गात व प्रयोगशाळेत ऑफलाइन मार्गदर्शन केले जाईल. उर्वरित विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण दिले जाईल.

**-सुनीता दातार, प्राचार्य, स. प. महाविद्यालय, पुणे**

मॉडर्न महाविद्यालयात सुमारे बारा हजार विद्यार्थी शिक्षण घेत असून, सर्व विद्यार्थ्यांचे ऑफलाइन शिक्षण सुरु करणे तात्काळ सुरु केले जाणार नाही. प्रथमत: अंतिम वर्षाच्या व इयत्ता बारावीच्या विद्यार्थ्यांचे प्रात्यक्षिक वर्ग सुरु केले जाणार आहेत. त्यानंतर टप्प्याटप्प्याने इतर वर्गांची प्रात्यक्षिके घेतली जातील. एकूण परिस्थिती विचारात घेऊन ऑफलाइन वर्ग सुरु केले जातील, तोपर्यंत ऑनलाइन वर्ग सुरु राहील.

**- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर, पुणे**

Hello Pune
Page No. 3 Oct 10, 2021
Powered by: erelego.com

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

# Colleges to reopen on Oct 12, focus on final-year students

## Institutes Expect More Pupils After Diwali

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Colleges and institutes of higher education are putting in place various arrangements as they prepare to reopen for physical classes from Tuesday after being shut since March 2020.

The date of reopening was on Saturday postponed to October 12. Pune municipal commissioner Vikram Kumar said a revised order allowing colleges, coaching classes and training institutes to reopen from October 12 was issued on Saturday. Kumar did not give any reason for the change in the date of reopening.

Pimpri Chinchwad commissioner Rajesh Patil told **TOI** that in view of the October 11 state-wide bandh, the date of reopening was pushed to October 12. "We don't want any safety issues. Also, we want to give ample time to the college staff to prepare," said Patil. Pune collector Rajesh Deshmukh on Saturday said colleges in rural areas will also reopen from October 12.

Institutes said they expect local students to attend lectures, but students from outside Pune are expected to arrive after the Diwali. Sharad Kunte, president of the Deccan Education Society that runs Fergusson College and Brihan Maharashtra College of Commerce (BMCC), said their institutes will reopen on Tuesday. "All our staff are vaccinated. We do not expect students from outside Pune to be back on campus on Tuesday, but local students, if they are vaccinated, can attend," said Kunte. Classes will continue in hybrid mode because there will be some students who will not be able to attend classes in person, said Kunte.

P B Buchade, principal of Abasaheb Garware College, said more students can be expected at most colleges after Diwali. "We will resume physical classes after a week as we need get the vaccination data of students and arrange classes with fewer students," said Buchade.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts Science and Commerce, said the reopening has been planned in three phases. "The first to be called will be outgoing students, which means final-year students in undergraduate and postgraduate courses. We will then concentrate on finishing practicals for all, and then start lectures," said Zunjarrao. According to Zunjarrao, theory classes will be held in a staggered manner with one-third of the students attending two days a week.

Vishwakarma University too is ready to reopen from Tuesday. Vice-chancellor Siddharth Jabade said 85% of their Pune-based students are partially vaccinated while the rest are fully vaccinated, according to the data they have. "In view of the significant number of students who are partially vaccinated, a hybrid model of education will be enabled," said Jabade. Final-year students' practicals/ hands-on examinations are a priority, he said. "Students from outside Pune will be provided with an standard operating procedure for accommodation, reaching Pune, food, health check-up etc," he added.

### Collector issues order similar to PMC

Pune collector Rajesh Deshmukh on Friday issued orders similar to the Pune Municipal Corporation directive allowing private offices to operate at full capacity where staff are fully vaccinated. The order issued by the collector comes into effect from October 12. PCMC additional commissioner Vikas Dhakane told TOI that the civic body's orders on the extension of restaurant timing and others are on the lines of the PMC's order but will be effective from October 12. TNN

### THOSE OUTSIDE PUNE GET MORE TIME



File photo

"Around 35% of our students are from outside Pune; coming to the city only to go back home for Diwali and return again for classes is not feasible. I think we will see full strength post-Diwali —**Mangesh Karad** | VICE-CHANCELLOR, MIT ART, DESIGN & TECHNOLOGY UNIVERSITY

"Most of the eligible staff have been vaccinated, barring those with some medical conditions. About 12,500 students have been vaccinated as per information available with us, but some may not have entered the data. Our campuses are fully prepared to accept students from October 12 onwards, but for safety reasons we are calling them back in a staggered manner through the week. Students will require an RT-PCR test before returning to campus. On the campus, we plan to create a bubble so that once they enter, they will stay on the campus only —**Vidya Yeravdekar** | PRO VICE-CHANCELLOR, SYMBIOSIS INTERNATIONAL UNIVERSITY

"As many students are from outside Pune, they will have to book tickets, undergo RT-PCR tests and figure out their accommodation before returning to college. All this will take some time, especially during the festival season. Some courses which have more local students can start immediately but others will be delayed. Having said this, we will appeal to all final-year students to resume in-person classes as soon as possible —**M M Salunkhe** | BHARATI VIDYAPEETH VICE-CHANCELLOR

"As we have several students from across India, we need to give them more to return to the campus. Many others stay nearby as well and we will welcome them for labs/faculty interactions/ projects from Tuesday. For a while, lectures will be held online but practicals/projects will be require physical attendance. We have been counselling students for a while and will continue that. I have found that many feel psychologically better after returning to campus —**Prabhat Ranjan** | D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY (DYPIU), AKURDI

### No SoP yet from state higher education department

The directorate of higher education has not yet issued any order regarding the reopening of colleges or a standard operating procedure to be followed. Dhanraj Mane, director of higher education said orders are likely on Monday. TNN

### Special vaccination drives to be organized in colleges

Students above 18 years of age will be able to get themselves vaccinated on college premises itself, mayor Murlidhar Mohol tweeted late on Friday. The PMC plans to launch a special campaign soon, he added. TNN

The Times of India 10.10.2021

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

# स्वायत्ततेनंतरही कोंडी

## 'यूजीसी'च्या परिनियमांची अंमलबजावणी होत नसल्याचा महाविद्यालयांना फटका

**चिन्मय पाटणकर, लोकसत्ता**

### अडचणी कोणत्या...

- यूजीसीच्या स्वायत्ततेच्या परिनियमांची राज्य शासन आणि विद्यापीठ स्तरावर अंमबजावणी नाही
- नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यासाठी एक वर्ष आधी विद्यापीठाची मान्यता आवश्यक
- नवीन अभ्यासक्रम समाजकल्याण विभागाकडून पात्र ठरवणे आवश्यक
- विद्यार्थ्यांची पात्रता विद्यापीठ स्तरावर पूर्ण होणे आवश्यक

**स्वायत्ततेच्या व्यथा** (भाग १)

**पुणे :** राज्य शासनाकडून राज्यातील महाविद्यालयांना स्वायत्तता घेण्यासाठी प्रोत्साहन दिले जात असताना स्वायत्त महाविद्यालयांनाही मान्यता प्रक्रियेचे कागदी घोडे नाचवणे अपरिहार्य असल्याचे स्पष्ट झाले आहे. अभ्यासक्रम मान्यता, अभ्यासक्रमाचा राज्य शासनाच्या शिष्यवृत्तीमध्ये समावेश, विद्यार्थ्यांची पात्रता आदी मुद्द्यांची विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) परिनियमानुसार विद्यापीठ व शासनाच्या स्तरावर अंमलबजावणी होत नसल्याचा फटका स्वायत्त महाविद्यालयांना सहन करावा लागत आहे.

राष्ट्रीय मूल्यांकन आणि अधिस्वीकृती परिषदेच्या मूल्यांकनासह विविध निकषांवर तपासणी करून उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या महाविद्यालयांना विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्वायत्तता प्रदान केली जाते. स्वायत्त महाविद्यालयांसंदर्भात यूजीसीकडून परिनियमही जाहीर करण्यात आले आहेत. स्वायत्ततेच्या धोरणाअंतर्गत राज्यातील जवळपास शंभरहून अधिक महाविद्यालयांना स्वायत्तता मिळाली आहे. स्वायत्तता मिळाल्यानंतर महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम, परीक्षा पद्धत या बाबतचे स्वातंत्र्य मिळण्याची तरतूद आहे. प्रत्यक्षात यूजीसीच्या स्वायत्ततेसंदर्भातील परिनियमांची राज्य शासन आणि विद्यापीठ स्तरावर अंमलबजावणी होत नसल्याने स्वायत्तता मिळूनही स्वायत्त महाविद्यालयांना स्वायत्तता अनुभवता येत नसल्याचे चित्र आहे.

मॉडर्न महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र झुंजारराव म्हणाले, की विद्यार्थ्यांना उपयुक्त असे नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम सुरू करण्याची प्रक्रिया कमी वेळाची असायला हवी. यूजीसीच्या परिनियमांनुसार स्वायत्त महाविद्यालयाने नवीन अभ्यासक्रम सुरू करताना विद्यापीठ आणि राज्य शासनाला कळवून अभ्यासक्रम सुरू करणे अपेक्षित आहे. परंतु संलग्नित विद्यापीठांकडून या बाबत स्वायत्त नसलेल्या महाविद्यालयांप्रमाणे मान्यता प्रक्रिया राबवण्याचा आग्रह स्वायत्त महाविद्यालयांकडे धरला जातो. त्यामुळे नवीन अभ्यासक्रम सुरू करण्यात वेळ जाऊन अडचणी निर्माण होतात. स्वायत्त महाविद्यालयातील नव्या अभ्यासक्रमांना राज्य शासनाची शिष्यवृत्ती लागू होण्यातही अडचणी आहेत. स्वायत्त महाविद्यालयांतील नव्या अभ्यासक्रमांबाबत संलग्नित विद्यापीठाने समाजकल्याण विभागाला माहिती द्यावी. जेणेकरून संबंधित अभ्यासक्रमाचा समावेश समाजकल्याण विभागाला त्यांच्या यादीत करता येईल आणि संबंधित अभ्यासक्रमाला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीला लाभ मिळू शकेल. सद्यःस्थितीत शासन निर्णय प्राप्त झाल्यावरच समाजकल्याण विभागाकडून शिष्यवृत्ती प्राप्त होऊ शकेल असे सांगण्यात येते. याच शासन निर्णयाअभावी विद्यार्थ्यांची पात्रताही विद्यापीठ स्तरावर अडवली जाते. त्यामुळे स्वायत्तता घेऊनही अनेक महाविद्यालये नवीन अभ्यासक्रम सुरू करू शकलेली नाहीत. या मुद्द्यांचा गांभीर्याने विचार करून राज्य शासनाने स्वायत्त महाविद्यालयांसंदर्भात स्पष्ट निर्देश राज्यातील विद्यापीठांना द्यावेत आणि स्वायत्त महाविद्यालयांसाठी धोरण आखावे.

स्वायत्त महाविद्यालयांना विविध प्रकारच्या अडचणी भेडसावत असल्याबाबत फर्ग्युसन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रवींद्रसिंह परदेशी यांनीही दुजोरा दिला. स्वायत्त महाविद्यालयांबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) परिनियमांची विद्यापीठ आणि शासन स्तरावर अंमलबजावणी व्हायला हवी. यूजीसीचे परिनियम स्वयंस्पष्ट असल्याने त्याची अंमलबजावणी केली, तरी स्वायत्त महाविद्यालयांचे बरेसचे प्रश्न सुटतील, असे डॉ. परदेशी यांनी स्पष्ट केले.

लोकसत्ता Wed, 13 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63724243

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

पुढारी

# एक सत्र ऑनलाइन; दुसरे ऑफलाइन..!

- पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार आज प्रथम सत्राचा शेवटचा दिवस
- विद्यार्थ्यांना कोरोना लसीच्या दोन्ही मात्रांचे बंधन महाविद्यालयांसाठी डोकेदुखी
- एक संपूर्ण सत्र ऑनलाइन, तर दुसरे सत्र ऑफलाइन
- विद्यार्थ्यांच्या स्वागतासाठी महाविद्यालये सज्ज



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार प्रथम सत्राचा शेवटचा दिवस २० ऑक्टोबर आहे आणि विशेष म्हणजे आजच कॉलेजमधील ऑफलाइन शिक्षणाचा प्रारंभ होत आहे. त्यामुळे यंदा एक सत्र ऑनलाइन, तर एक सत्र ऑफलाइन राहणार आहे. विद्यार्थ्यांच्या आगमनासाठी शहरातील महाविद्यालये सज्ज असली, तरी विद्यार्थ्यांना कोरोना लसीच्या दोन्ही मात्रांचे बंधन डोकेदुखी ठरणार असल्याची माहिती काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी दिली. त्यामुळे महाविद्यालये सुरू होणार असली, तरी शिक्षण मात्र ऑफलाइन आणि ऑनलाइन दोन्ही पद्धतीने सुरू राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे.**

कोरोनामुळे गेल्या दीड वर्षापासून प्रत्यक्ष वर्गात जाऊन शिक्षण घेण्याची वाट पाहणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना बुधवारपासून महाविद्यालयात जाऊन शिकण्याची, मित्रांबरोबर मनसोक्त गप्पा मारण्याची संधी मिळणार आहे. महाविद्यालयांना मात्र विद्यार्थ्यांच्या प्रथम सत्राच्या अभ्यासाची काही प्रमाणात का होईना उजळणी आणि द्वितीय सत्राची सुरुवात अशा तारेवरच्या कसरतींचे नियोजन करावे लागणार आहे. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीसाठी दोन्ही लसींचे बंधन असल्यामुळे महाविद्यालयांना ऑनलाइन, तसेच ऑफलाइन शिक्षण सुरूच ठेवावे लागणार आहे. यंदा एक सत्र ऑनलाइन आणि दुसरे सत्र ऑफलाइन होत असल्यामुळे अभ्यासाच्या नियोजनाबरोबरच परीक्षेची देखील विद्यार्थ्यांकडून तयारी करून घेण्याचे आव्हान महाविद्यालयांसमोर असणार आहे. त्यामुळे कोरोना प्रादुर्भावाची परिस्थिती सुधारली असली, तरी महाविद्यालय प्रशासनाची जबाबदारी वाढणार असल्याचे चित्र दिसून येत आहे.

### परीक्षेबाबत परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या बैठकीत निर्णय

“ परीक्षा ऑनलाइन घ्यायची की ऑफलाइन, यासंदर्भात परीक्षा व मूल्यमापन मंडळाची येत्या आठ ते दहा दिवसांत बैठक घेण्यात येणार आहे. परिस्थिती सुधारली आणि भविष्यात कोरोना वाढला नाही, तर परीक्षा ऑफलाइनच होणार आहे. कोरोनामुळे परीक्षा ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हे केवळ कोरोनाकाळापुरतेच मर्यादित होते. आता महाविद्यालये सुरू झाली, तर परीक्षेच्या पारंपरिक पर्यायाला अपवाद करता येणार नाही. त्यामुळे येत्या काळात होणाऱ्या बैठकीनंतर परीक्षेची पद्धत आणि स्वरूप जाहीर केले जाणार आहे.

- **डॉ. महेश काकडे,** संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

“ सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पहिल्या आणि दुसऱ्या सत्राच्या वेळापत्रकानुसार पहिल्या सत्राचा बुधवारी शेवटचा दिवस आहे आणि योगायोगाने त्याच दिवशी महाविद्यालये सुरू करण्याची संधी मिळत आहे. आता दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांचा वर्गनिहाय आढावा घेणार आहे. त्यानंतरच पुढील दिशा ठरवावी लागेल. त्यामुळे ऑनलाइन शिक्षणावरदेखील भर द्यावा लागणार आहे.

- **डॉ. राजेंद्र झुंजारराव,** प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय

“ विद्यार्थ्यांच्या ऑफलाइन लेक्चरची सर्व तयारी झाली आहे. कोरोना नियमांचे पालन करून वर्ग सुरू करण्यात येणार आहेत. विद्यार्थी आल्यानंतर प्रॅक्टिकलचे नियोजन केले जाणार आहे. कोरोना लसीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच परवानगी असल्यामुळे लसीसंदर्भात विद्यार्थ्यांना सांगण्यात येणार आहे.

- **डॉ. रवींद्र परदेशी,** प्राचार्य, फर्ग्युसन कॉलेज

“ राज्यातील महाविद्यालये उद्यापासून सुरू होत आहेत. परंतु, अनेक विद्यार्थी बाहेरगावाहून येणार आहेत. तसेच, सर्वांचीच आर्थिक परिस्थिती चांगली नाही. त्यामुळे महाविद्यालयीन, विद्यापीठातील आणि शासकीय वसतिगृहे त्वरित सुरू करावीत. विद्यार्थ्यांसाठी असणारी कमवा आणि शिका योजनेची अंमलबजावणी चांगल्या प्रकारे त्वरित सुरू करावी, या योजनेच्या मानधनात वाढ करावी; तसेच संपूर्ण शुल्क भरले नाही किंवा इतर गोष्टींमुळे महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात येणार नाही, यासाठी योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. त्याचबरोबर लसीकरणाची प्राधान्याने अंमलबजावणी करण्यात यावी.

- **कमलाकर शेटे,** विद्यार्थी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ; उपाध्यक्ष, युक्रांद, पुणे शहर

“ कॉलेज ऑफलाइन सुरू करण्यासंदर्भात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडून सूचना प्राप्त झाल्या आहेत. यामध्ये दोन डोस झालेल्या विद्यार्थ्यांनाच वर्गात बसण्याची परवानगी द्यावी आणि शिक्षण ऑफलाइन आणि ऑनलाइन असे सुरू ठेवावे, अशा मार्गदर्शक सूचना आहेत. किती विद्यार्थ्यांनी लसीचे दोन्ही डोस घेतले आहेत, याची आम्हाला देखील माहिती नसल्यामुळे एका गुगल फॉर्मच्या माध्यमातून माहिती गोळा करून त्यांनाच महाविद्यालयात लेक्चर आणि प्रॅक्टिकलसाठी बोलाविले जाणार आहे. अन्य विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण दिले जाणार आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवरील स्वच्छता मोहीम काही दिवसांपूर्वीच करण्यात आली आहे. आवश्यकता वाटल्यास ती पुन्हा केली जाणार आहे.

- **डॉ. सविता दातार,** प्रभारी प्राचार्या, स. प. महाविद्यालय

My Pune Edition
Oct 20, 2021 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

## News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5

सकाळ

# वरिष्ठ महाविद्यालये आजपासून होणार सुरू

**EDU गाईड**

**पुणे, ता. १९ :** तब्बल १८ महिन्यांपासून बंद असलेली वरिष्ठ महाविद्यालये बुधवारपासून (ता. २०) खुली होणार आहेत. प्रदीर्घ काळानंतर प्रत्यक्ष वर्ग सुरू करण्याची तयारी अंतिम टप्प्यात आल्याचे दिसून येते. अभ्यासक्रम टप्प्या-टप्प्याने सुरू करण्याची तयारी केली जात असून त्याप्रमाणे महाविद्यालयांनी वेळापत्रक केले आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव आटोक्यात आल्याने सर्व अकृषी विद्यापीठे, अभिमत विद्यापीठे, स्वयंअर्थसहाय्यित विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयात ऑफलाइन पद्धतीने नियमित वर्ग बुधवारपासून सुरू करण्याला राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मान्यता दिली आहे. या पार्श्वभूमीवर सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठानेही महाविद्यालये सुरू करण्याबाबत परिपत्रक काढले आहे. यामध्ये पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकेने दिलेल्या आदेशानुसार महाविद्यालये सुरू करण्याची कार्यवाही करावी. तसेच नाशिक, नगर जिल्ह्यातील सर्व संलग्न महाविद्यालयांनी त्या जिल्ह्यातील प्रशासन आणि स्थानिक प्रशासन यांनी दिलेल्या आदेशानुसार महाविद्यालये सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी, असे विद्यापीठ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. वरिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यासाठी महाविद्यालयांमध्ये वर्ग खोल्या, महाविद्यालयाचा आवार, ग्रंथालय, प्रयोगशाळा, प्रशासकीय कार्यालये येथे निर्जंतुकीकरण करण्याचा कामाला वेग आला आहे. त्याशिवाय महाविद्यालयांच्या प्रवेशद्वारावर सॅनिटायझरची सुविधा उपलब्ध करून दिली जात आहे. बहुतांश महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांकडून कोरोना प्रतिबंध लस घेतल्याबाबतची माहिती मागविली आहे.



**शिवाजीनगर : मॉडर्न महाविद्यालयात वर्गखोल्यांचे निर्जंतुकीकरण करताना कर्मचारी.**

### उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सूचना

- कोरोना प्रतिबंध लशीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश
- महाविद्यालयात असेल ५० टक्के उपस्थिती
- मास्कचा वापर अनिवार्य
- वर्गात प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षणाची सोय महाविद्यालयांना उपलब्ध करून द्यावी लागणार

**"विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंध लशीचे दोन डोस घेतले आहेत की नाहीत, हे जाणून घेण्यासाठी माहिती संकलित केली जात आहे. प्रत्यक्ष वर्गात ५० टक्केच विद्यार्थी हजर राहणार आहेत. वर्गात हजर असणारे विद्यार्थी शिकत असताना, उर्वरित ऑनलाइनद्वारे शिकू शकणार आहेत.**

**- डॉ. सीमा पुरोहित,**
प्राचार्य, बीएमसीसी

Pune, Main
20/10/2021 Page No. 2

## *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

लोकमत

# महाविद्यालये सुरु झाली; पण विद्यार्थी कुठे गेले ?

## ऑनलाईन वर्गांनाच पसंती; दिवाळीनंतर विद्यार्थीसंख्या वाढणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्य शासन व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने महाविद्यालये सुरू करण्यास परवानगी दिली असली तरी अनेक विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधक दोन डोस घेतलेले नाहीत. तसेच अनेक विद्यार्थी गावी असून दिवाळीनंतरच पुण्यात येण्याचे त्यांचे नियोजन आहे. त्यातच विद्यापीठाचे पहिले शैक्षणिक सत्र २० ऑक्टोबरला संपणार होते. त्यामुळे बुधवारपासून शहरातील महाविद्यालये सुरू झाली. मात्र, बहुसंख्य विद्यार्थी महाविद्यालयांच्या आवारात फिरकलीच नाहीत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातर्फे महाविद्यालये सुरू करण्याबाबतची सविस्तर नियमावली विद्यापीठाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. त्यानुसार कोरोना नियमांचे पालन करून शहरातील काही महाविद्यालये सुरू झाली.

कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याने विद्यापीठाने ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतींनी विद्यार्थ्यांचे वर्ग सुरू ठेवण्याच्या सूचना दिल्या. त्यामुळे शहरातील बहुतांश महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांनी पाठ फिरविली. त्यामुळे महाविद्यालये सुरू झाली; पण मुले कुठे गेली? असे म्हणण्याची वेळ आली.

शहरातील काही महाविद्यालयांत द्वितीय व तृतीय वर्षांतील विद्यार्थ्यांचे ऑफलाईन वर्ग सुरू झाल्याचे दिसून आले. तसेच अनेक महिन्यांपासून बंद असलेली प्रयोगशाळांमधील प्रत्यक्षिके (प्रॅक्टिकल्स) बुधवारी सुरू झाली.

विद्यापीठाचे पहिले सत्र संपणार असले तरी येत्या ३० ऑक्टोबरपर्यंत प्राध्यापकांना ऑनलाईन वर्ग सुरू ठेवण्याच्या सूचना देण्यात आल्या.



स. प. महाविद्यालयात प्रत्याक्षिकाच्या तासाला उपस्थित असलेले विद्यार्थी.

> अनेक विद्यार्थ्यांनी कोरोना प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतले नाहीत; त्यामुळे विद्यापीठाच्या सूचनेनुसार ऑनलाईन व ऑफलाईन दोन्ही पद्धतींनी वर्ग सुरु ठेवले आहेत. बुधवारी काही विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष वर्गात बसून शिक्षण घेतले. तसेच विज्ञान शाखेच्या १० ते १२ विद्यार्थ्यांनी प्रयोगशाळेत प्रात्यक्षिके केली. लवकरात लवकर सर्व विद्यार्थ्यांनी दोन डोस पूर्ण करावेत, याबाबत महाविद्यालयातर्फे प्रयत्न केले जाणार आहेत.
>
> **- डॉ. सविता दातार, प्राचार्य, स. प. महाविद्यालय**

> एकाच वेळी सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयात बोलावणे सयुक्तिक नाही. त्यामुळे अंतिम वर्षाचे विद्यार्थी, पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे विद्यार्थी यांना टप्प्याटप्प्याने महाविद्यालयात बोलावले जाणार आहे. तसेच विद्यार्थ्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी आवश्यकतेनुसार ऑनलाईन जादा तास घेण्याच्या सूचना प्राध्यापकांना दिल्या आहेत.
>
> **- डॉ. राजेंद्र झुंजारराव, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय, शिवाजीनगर**

Hello Pune
Page No. 8 Oct 21, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5*

**सामना**

## लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश

# महाविद्यालये गजबजली

पुणे, दि. २० (प्रतिनिधी) - कोरोनाच्या पहिल्या लाटेमध्ये २३ मार्च २०२० पासून बंद झालेली महाविद्यालये तब्बल दीड वर्षानंतर बुधवारी गजबजली. राज्य सरकारच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या सूचनेनुसार कोविड प्रतिबंधक लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयांमध्ये प्रवेश देण्यात आला.



कोरोना आणि लॉकडाऊनमुळे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पूर्णत: ऑनलाइन पद्धतीने राबविण्यात आले. परंतु, गेल्या दोन महिन्यांपासून कोरोना संसर्ग आटोक्यात असल्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या परिपत्रकानुसार महाविद्यालयातील वर्ग सुरू करण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे. महाविद्यालये सुरू करण्यापूर्वी संपूर्ण इमारती सॅनिटाइज करण्यात आल्या आहेत. एका तुकडीसाठी विद्यार्थी प्रवेश क्षमतेच्या ५० टक्के मर्यादा निश्चित करण्यात आली असून, उर्वरित विद्यार्थ्यांना ऑनलाइन व्यवस्था राहील, या नियमानुसार पुण्यातली महाविद्यालये सुरू झाली. लस घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला. त्यामुळे पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांची संख्या कमी दिसली.

युवासेनेचे सहसचिव किरण साळी यांच्या मार्गदर्शनानुसार गरवारे महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे सॅनीटायझर, मास्क व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. आकाश शिंदे, सागर अलकुंटे, रोहित कदम, रोहित ढाळे, भावेश माने, आशुतोष कांबळे उपस्थित होते.

### नियमावली

▮ १८ वर्षपिक्षा कमी वयाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन सोय ▮ दोन लसी घेतलेल्यांना महाविद्यालयात प्रवेश ▮ एका बाकावर केवळ एकाच विद्यार्थ्याला बसविणार ▮ प्रत्येकाला मास्क, सॅनिटायजर व सुरक्षित अंतर राखणे आवश्यक ▮ नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कार्यवाही होणार.

### वसतिगृहात एका खोलीत एकच विद्यार्थी

▮ वसतिगृहामध्ये एका खोलीत एकाच विद्यार्थ्याची व्यवस्था राहील. वसतिगृहाची खोली मोठी असल्यास दोघांना परवानगी असणार आहे. वसतिगृहाच्या मेसमध्ये जेवणाच्या वेळा वेगवेगळ्या ठेवण्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

❝ आजपासून महाविद्यालये सुरू झाली असली तरी फस्ट टर्मचा शेवटचा दिवस असल्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती कमी होती. पुणे विद्यापीठाकडून नियमावली महाविद्यालयाला मिळाली आहे. दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच प्रवेश द्यायचा आहे. त्याचा आढावा घेणं सुरू आहे. १५ नोव्हेंबरनंतर म्हणजे सेकंड टर्मपासून महाविद्यालयात विद्यार्थ्यांची उपस्थिती वाढेल.

**- आर. एस. झुंजारराव**, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय.

Pune Edition
Oct 21, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com

## Colleges reopen for on-campus classes after 1.5 years

Meanwhile, affiliated colleges have tweaked academic calendars to allow students to return to campus.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College, Shivajinagar, said classes have resumed for first-year students of all undergraduate and postgraduate students. "These students have had a longer gap than anyone else. Their board exams also got cancelled and they have missed the excitement of starting a new course. So, we have decided to prioritise first-year students as far as physical lectures are concerned, after the Diwali break, we will start with second-year students," he said.

Savita Datar, principal of SP College, said most colleges are offering a blended mode of education, with both offline classes and live streaming of the same for those students who aren't fully vaccinated or whose parents have not agreed to send them to campus.

"We got consent from only about 30 per cent parents about their wards returning to campus. So, we have started classes for them and teachers have been asked to live-stream the same class. It will take time for parents to be confident ... and many students are also out of town. I think that would be the case in most colleges in the city. Also, as far as the academic calendar is concerned, we started late also, so we have decided to extend the classes and take only a few days break for Diwali," she said.

The Indian Express 21.10.2021

# News Paper Clippings Related to MCASC(Autonomous) Pune 5



# Educators & students not keen on 100% offline exams

## Most Say Hold In-Person Tests Next Semester

Ardhra.Nair@timesgroup.com

**Pune:** Teachers and students have mixed feelings about state higher and technical education minister Uday Samant's declaration that offline college examinations would be prioritised wherever possible.

A senior Savitribai Phule Pune University official said a decision will be taken during a meeting of the board of examination on October 27. "Many educationists feel that offline exams are essential to upholding the quality and prestige of the university," he said.

Rajendra Zunjarrao, principal of Modern College of Arts Science and Commerce in Shivajinagar, said offline exams are better to assess students. "However, it won't be possible this semester. Many students in Pune colleges are from outside and without opening hostels, there is no place for them to stay," said Zunjarrao. He said not all students are fully vaccinated still.

Vasundhara Vanarase, a law student at Marathwada Mitra Mandal's College of Commerce, said upcoming exams must be held online. "Students need to acclimatise to in-person classes and exams," said Vanarase. BVoc media and communication student Anushka Chalke said, "The first-semester exam must be online and for the next, offline exams can be held," she said.

P B Buchade, principal of Abasaheb Garware College, feels a hybrid mode of teaching must be implemented this year.

### VACCINATION, HOSTEL HURDLES

- Many students in Pune colleges are from other parts of Maharashtra and other states
- **Hostels are yet to reopen**
- Some students are not yet fully vaccinated while those below 18 years are not eligible
- **Students & parents prefer online education though cases have reduced but the risk of the pandemic continues**

**SPPU likely to take a decision for the varsity and affiliated colleges at a meeting on October 27**

The Times of India 24.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

### महाविद्यालये सुरू करण्याबाबत अद्याप निर्णय नाही

**मुंबई :** इयत्ता ८ वी ते १२पर्यंतचे वर्ग येत्या सोमवारपासून सुरू होत असले तरी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय अद्याप राज्य शासनाने घेतलेला नाही.

शाळांबरोबरच महाविद्यालयेही सुरू करण्याची मागणी करण्यात येत होती. विशेषतः शाळा सुरू करता मग महाविद्यालये का नाही, असा सवालही करण्यात येत आहे. महाविद्यालये कधी सु करायची याचा अद्याप निर्णय झालेला नाही, असे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले. विद्यापीठांच्या कुलगुरूंचे याबाबत मते मागविली आहेत. त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यावर निर्णय घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शाळा सुरू झाल्यावर त्याचा कितपत परिणाम जाणवतो. किती पालक विद्यार्थ्यांना शाळांमध्ये पाठवतात याचा आढावा घेऊन मगच महाविद्यालयांबाबत निर्णय घेतला जाईल.

लोकसत्ता Fri, 01 https://

### रोजगारक्षम होण्यासाठी 'डिग्री प्लस'ची मात्रा

**पुणे विद्यापीठाचा विद्यार्थ्यांसाठी उपक्रम; ४०० पेक्षा अधिक अभ्यासक्रम**

सकाळ EXCLUSIVE

**पुणे, ता. ३० :** पारंपरिक अभ्यासक्रम शिकत असतानाच विद्यार्थ्यांमध्ये रोजगाराभिमुख कौशल्य वाढावे, यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ 'डिग्री प्लस' नावाचा अभिनव उपक्रम घेऊन येत आहे. सर्व विद्याशाखांना सामावून घेणारे आणि उद्योगांना अपेक्षित ४०० पेक्षा अधिक अभ्यासक्रमांचा हा खजिना नोव्हेंबरमध्ये विद्यार्थ्यांसाठी खुला करण्यात येईल, अशी माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांनी दिली.

**काय आहे उपक्रम?**

पदवीचे शिक्षण घेत असतानाच उद्योग, सेवा, माहिती-तंत्रज्ञान आदी क्षेत्रांना अपेक्षित कौशल्यं विद्यार्थ्यांना यावीत म्हणून उद्योगांच्याच सहभागाने सुरू केलेला उपक्रम. ऑनलाइन, ऑफलाइन किंवा प्रत्यक्ष अनुभवावर आधारित हे अभ्यासक्रम विद्यार्थ्याला मर्जीप्रमाणे निवडता येतील.

**कसे शिकणार?**

एका संकेतस्थळाच्या माध्यमातून अभ्यासक्रम विद्यार्थ्याला शिकता येईल. ज्यामध्ये व्हिडिओ, ऑनलाइन कार्यशाळा, उपक्रम यांच्या माध्यमातून शिकविले जाईल. आवश्यक त्या ठिकाणी प्रत्यक्ष शिकवणी, कार्यशाळा किंवा उद्योगांमध्ये प्रत्यक्ष अनुभव यांची रचना करण्यात आली आहे.




**प्रवेश केव्हा?**

संपूर्ण वर्षभर पदवीला शिकत असताना विद्यार्थ्याला हे अभ्यासक्रम शिकता येतील. यासाठी संकेतस्थळावर नोंदणी करता येणार असून, नोव्हेंबर महिन्यात प्रवेश सुरू होतील.

**कोठे?**

विद्यापीठाने उपलब्ध केलेल्या संकेतस्थळावर लर्निंग मॅनेजमेंट सिस्टमच्या आधारे ऑनलाइन आणि ऑफलाइन अभ्यासक्रम घेता येईल.

**कोणाला फायदा?**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने खासगी कंपनीच्या सहकार्याने ४०० पेक्षा जास्त अभ्यासक्रम तयार केले आहेत. उपक्रमाची व्याप्ती महाराष्ट्रभर असेल; परंतु, प्रथम प्राधान्य विद्यापीठा अंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयांतील विद्यार्थ्यांना असेल.

"विद्यापीठात येणारे विद्यार्थी आर्थिकदृष्ट्या सक्षम असतीलच असे नाही. मात्र, हुशार नक्कीच असतात. जगाच्या गरजा आणि ज्ञान वेगाने बदलत आहे. नियमित अभ्यासक्रमात ही कौशल्ये प्राप्त होत नाहीत. अशा वेळी बदलत्या जगाच्या कसोटीवर उतरण्यासाठी अतिशय माफक किमतीत हे अभ्यासक्रम डिग्री प्लसच्या माध्यमातून उपलब्ध होत आहेत.
- डॉ. नितीन करमळकर,
कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**वैशिष्ट्ये**

१. विद्यापीठासह आंतरराष्ट्रीय स्तरावरचे प्रमाणपत्र मिळणार
२. कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील सर्व अभ्यासक्रमांचा समावेश
३. उद्योगक्षेत्रातील तज्ज्ञ प्रत्यक्ष शिकवणार
४. प्रत्यक्ष व्यावसायिक अनुभव
५. खिशाला परवडेल अशा दरात आंतरराष्ट्रीय अभ्यासक्रम
६. प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रम

**अभ्यासक्रमांबाबत...**

| सहभागी उद्योग | | | | |
|---|---|---|---|---|
| अॅमेझॉन, कोर्सेरा, सिंपली लर्निंग, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस | ४०० पेक्षा अधिक संख्या | ३ ते ११ महिने कालावधी | ४०० ते ४००० रुपये शुल्क | प्रवेश क्षमता बंधन नाही |

Sakaal 1.10.2021

## *News Paper Clippings During October 2021*

### Section: Education

# कॉलेजे सुरू करण्यास वेळ का?

## शिक्षणतज्ज्ञांचा सरकारला परखड प्रश्न

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

इयत्ता आठवी ते बारावीच्या शाळा सोमवारपासून सुरू होत आहेत; मात्र कॉलेजे सुरू करण्यास सरकारची अद्याप मानसिकता दिसत नाही. कॉलेज विद्यार्थ्यांपेक्षा लहान असलेल्या शालेय विद्यार्थ्यांना घराबाहेर येऊन शाळेत जाण्यास सांगणार आणि कॉलेजच्या विद्यार्थ्यांना मात्र ऑनलाइन शिक्षणच घ्यायला लावणार हे चूक असल्याचे मत शिक्षणतज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

मार्च, २०२०पासून शाळा आणि कॉलेजे बंद आहेत. आता सोमवारपासून शाळा सुरू करण्याबाबत निर्णय झाला आहे. यापूर्वी ग्रामीण भागातील शाळा सुरू झाल्या आहेत. मात्र कॉलेज सुरू करण्याबाबत सरकार का विचार करत नाहीत, असा प्रश्न विचारला जात आहे. कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांचे लसीकरणही पूर्ण झाले आहे. यामुळे ते शालेय विद्यार्थ्यांच्या तुलनेत अधिक सुरक्षित आहेत. तसेच त्यांना प्रात्यक्षिकांपासून अनेक गोष्टींसाठी कॉलेजमध्ये जाणे आवश्यक असते आणि ते त्यांच्या हिताचेही आहे, असे असतानाही कॉलेज सुरू करण्याबाबत कोणी फार काही बोलताना दिसत नाही. काही स्वायत्त कॉलेजांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकांसाठी टप्प्याटप्प्याने बोलविण्यास सुरुवात केली आहे.



> "शाळेच्या आधी कॉलेज सुरू होणे आवश्यक होते. खरे तर कॉलेजे यापूर्वीच सुरू होणे आवश्यक होती. कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी व्याख्याने, प्रात्यक्षिके ही महत्त्वाची असतात. यापूर्वीच विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान होत आहे. यामध्ये आता आणखी वेळ काढू नये आणि लवकरात लवकर कॉलेज सुरू करावीत.
> — सुधीर पानसे, शिक्षणतज्ज्ञ

पण अधिकृत आदेश आल्यास तो नक्कीच विद्यार्थी हिताचा होईल. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिवाळीनंतर कॉलेज सुरू करण्याबाबत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात येणार असल्याचे सांगितले. मात्र तोपर्यंत उशीर होईल, असे मत शिक्षण तज्ज्ञ व्यक्त करत आहेत.

## विद्यार्थ्यांवर ताण नको

**मुंबई :** 'सुमारे दीड वर्षांच्या काळानंतर प्रत्यक्ष शाळा पुन्हा सुरू होत आहेत. यामुळे शाळा सुरू होताच अभ्यासक्रम संपवायचा आहे. परीक्षेचे नियोजन करायचे आहे; पण विद्यार्थ्यांवर याबाबत ताणही देऊ नये,' असे मत टास्क फोर्सचे सदस्य डॉ. समीर दलवाई यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी चार ऑक्टोबरला स्वागत उत्सव साजरा करण्यात येणार असल्याचे शालेय शिक्षणमंत्री वर्षा गायकवाड यांनी सांगितले.

सोमवारपासून शाळा सुरू होत असल्याने शालेय शिक्षण विभागाने शाळा सुरक्षितपणे सुरू करण्याबाबत मार्गदर्शन सत्राचे आयोजन केले होते. या वेळी ते बोलत होते. शिक्षण हक्क मंचाच्या हेमांगी जोशी यांनीही, 'सकारात्मक वातावरण राहील, याबाबत पालक, शिक्षक, माध्यमांनी विचार करावा,' अशी सूचना केली. माजी शिक्षण संचालक आणि ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. वसंत काळपांडे यांनी, 'करोनाकाळात शाळा सुरू होत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना लागण झाली तरी त्यावर तोडगा काढून पुढे जाणे महत्त्वाचे ठरेल,' असे सांगितले. हिवरेबाजार ग्रामपंचायतीचे पोपटराव पवार यांनीही अनुभव सांगितला.

### या आहेत सूचना

- शाळा सुरू होताच तातडीने परीक्षा नकोत.
- लवकर अभ्यासक्रम संपवण्याच्या मागे लागू नये.
- पहिले दोन आठवडे विद्यार्थ्यांशी समरसून, गप्पा माराव्यात.
- मुलांवरील ताण, मनातील भावना मोकळ्या करण्यासाठी संधी द्या.

Maharashtra Times 2.10.2021

# अकरावीच्या 'एफसीएफएस' फेरीच्या वेळापत्रकात बदल

**पुणे :** राज्यातील अकरावीच्या केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतील 'प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य' (एफसीएफएस) फेरीदरम्यान येत असलेल्या सुट्यांमुळे या फेरीच्या वेळापत्रकात अंशतः बदल करण्यात आला आहे. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरीचे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून, ४ ते ११ ऑक्टोबरदरम्यान ही फेरी होईल.

मुंबई महानगर, पुणे, पिंपरी चिंचवड, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, अमरावती महापालिका क्षेत्रात राबवल्या जाणाऱ्या अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेतील प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरीचे सुधारित वेळापत्रक माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी गुरुवारी जाहीर केले. त्यानुसार ३५० ते ५०० गुण असलेल्या विद्यार्थ्यांना ४ आणि ५ ऑक्टोबर या दरम्यान अर्ज करून प्रवेश जाहीर झालेल्या महाविद्यालयात प्रवेश निश्चित करता येईल. ३०० ते ५०० गुण असलेल्या विद्यार्थ्यांना ६ ते ८ ऑक्टोबर या दरम्यान अर्ज करून प्रवेश जाहीर झालेल्या महाविद्यालयात प्रवेश घेता येईल. २५० ते ५०० गुण असलेल्या विद्यार्थ्यांना ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान प्रवेश अर्ज भरून प्रवेश जाहीर झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश घेता येईल. तर दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना १२ ते १३ ऑक्टोबर दरम्यान अर्ज करून प्रवेश जाहीर झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश निश्चित करता येईल. एटीकेटी सवलत मिळालेल्या दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना १४ ते १८ ऑक्टोबर दरम्यान अर्ज करून प्रवेश जाहीर झाल्यावर महाविद्यालयात प्रवेश घेता येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Sat, 02 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63534000

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# शाळा सुरू, महाविद्यालये बंदच!

## जबाबदारी कोणाची? : उच्च शिक्षण विभागाकडून नियोजन होईना

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. ३ -** राज्यातील करोनाची स्थिती पाहता, विद्यार्थी हिताच्या दृष्टीने यापूर्वीच महाविद्यालये सुरू करणे आवश्यक होते. प्रत्यक्ष अध्यापन आणि प्रात्यक्षिकांसाठी प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू नसल्याने विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. शिवाय त्याचा परिणाम शैक्षणिक गुणवत्तेवर होत आहे. एकीकडे उद्यापासून शाळा सुरू होत आहे, तर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन शिक्षण, हा विरोधाभास



शैक्षणिकदृष्ट्या पूरक नसल्याचे मत शिक्षणतज्ज्ञांतून होत आहे.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे मार्च २०२० पासून शाळा व महाविद्यालये बंद आहेत. त्याच आता सोमवारपासून आठवी ते बारावीपर्यंतच्या शाळा सुरू होणार आहेत. यापूर्वी ग्रामीण भागातील शाळा सुरू झाल्या आहेत. मात्र, महाविद्यालये सुरू करण्याबाबत राज्य सरकार कधी निर्णय घेणार, या प्रतीक्षेत विद्यार्थी आहेत. विशेषत: महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या बहुतांश विद्यार्थ्यांचे लसीकरण पूर्ण होण्याच्या मार्गावर आहे. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे बहुतांश लसीकरण पूर्ण झाले आहे. त्यामुळे शाळेच्या तुलनेत महाविद्यालयांतील विद्यार्थी अधिक सुरक्षित आहेत. असे असतानाही राज्य सरकार महाविद्यालये सुरू करण्यास वेळकाढूपणा का करीत

> करोनाचा प्रादुर्भाव लक्षात घेता जगातील अनेक देशांनी महाविद्यालये सुरु केली आहेत. मात्र, राज्यातील महाविद्यालये सुरु करण्यास विलंब होत असून, ही शैक्षणिकदृष्ट्या योग्य नाही. संस्थेतील प्राध्यापक व कर्मचाऱ्यांचे बहुतांश लसीकरण झाले असून, विद्यार्थ्यांचे लसीकरण होत आहे. अशा स्थितीत सर्व नियम पाळून टप्प्याटप्प्याने महाविद्यालये सुरु होणे आवश्यक आहे. अन्यथा शैक्षणिक गुणवत्तेत आपण फार मागे पडू, अशी भीती आहे.
>
> **- ॲड. एस. के. जैन,** ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ

आहे, असा प्रश्न उपस्थित आहे.

राज्यातील महाविद्यालये दिवाळीनंतर सुरू होणार असल्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी सांगितले आहे. मात्र, विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अध्यापन, व्याख्याने, प्रात्यक्षिकांसाठी वर्ग सुरू होणे महत्त्वाचे आहे. त्याकडे राज्य सरकारचे दुर्लक्ष होत असल्याची नाराजी शिक्षणतज्ज्ञांतून व्यक्त

प्रभात Mon, 04 October 2021
https://epaper.eprabhat.net/c/63534686

# PhD not mandatory for the post of assistant professor for 2021

TIMES NEWS NETWORK



ISTOCK

In a move to allow universities to fill the vacant posts, the Ministry of Education has lifted the mandatory requirement of PhD for applying to the post of assistant professors across Indian higher education institutes.

The criteria has been lifted temporarily for 2021.

In 2018, the government had directed that candidates would need PhD to apply for the post of assistant professor as NET will not be the only criteria for recruitment

This was announced under the University Grants Commission (Minimum Qualifications for Appointment of Teachers and other Academic Staff in Universities and Colleges and other Measures for the Maintenance of Standards in Higher Education) Regulations, 2018

Union Education Minister Dharmendra Pradhan said that the plan of implementing the policy has been put on hold for the current year due to Covid, however, it has not been cancelled.

As per the existing norms, candidates who qualify for teacher eligibility exams including NET, SET, SLET are eligible to apply for the post of assistant professor. Candidates who have been awarded a PhD degree in accordance with UGC regulations will be exempted from the requirement of the minimum eligibility condition of NET/SLET/SET.

The Times of India 4.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

लोकमत

## प्राध्यापकांना जुनी पेन्शन योजना लागू करण्याची मागणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : राज्यातील विविध महाविद्यालयांत १९९२ ते २००० मध्ये नियुक्त झालेल्या नेट-सेट मुक्त प्राध्यापकांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करावी, असे आदेश सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वी वेळोवेळी जाहीर केलेल्या निकालात दिले आहेत. मात्र, याबाबत चुकीची माहिती सादर करून राज्याच्या उच्च शिक्षण विभागाकडून उच्च न्यायालयाची दिशाभूल केली जात आहे. त्यामुळे उच्च शिक्षण विभागाचे सचिव व राज्याच्या संचालकांचे वागणे हे लज्जास्पद असल्याने त्याचा प्राध्यापक संघटनेतर्फे निषेध करण्यात आला, असे प्राध्यापक महासंघाचे सरचिटणीस एस.पी. लवांडे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत सांगितले.

लवांडे म्हणाले, अमरावती विभागातील २३ व नागपूर विभागातील २० शिक्षक निवृत्त झाल्यानंतर त्यांना जुनी निवृत्ती पेन्शन योजना लागू करण्यात आली, तसेच राज्यातील इतर विभागांतही योजना लागू करण्यास अडवणूक केली जात आहे. न्यायालयात चुकीची माहिती सादर करून जुनी निवृत्ती वेतन योजना तात्पुरती प्रलंबित ठेवणे अयोग्य आहे. मात्र, हे आता उघड झाले आहे.

त्यामुळे यापुढील काळात मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांना निवेदन देणे, आदी उपक्रम राबविले जाणार आहेत.

Hello Pune
Page No. 8 Oct 06, 2021
Powered by: erelego.com

---

सतीश मुळीक, उपाध्यक्ष ॲड. अवॉ

## शिक्षकांना ऑनलाइन निष्ठा प्रशिक्षण

**पुणे, दि. ५** - राज्यातील सर्व शासकीय व अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववी ते बारावीसाठी अध्यापन करणाऱ्या शिक्षक व मुख्याध्यापकांसाठी ऑनलाइन निष्ठा प्रशिक्षण दीक्षा प्लॅटफॉर्मच्या माध्यमातून देण्यात येणार आहे. यासाठी विषयनिहाय वेळापत्रकही निश्चित झाले आहे.

केंद्रीय शिक्षण मंत्रालयाच्या वतीने निष्ठा या एकात्मिक प्रशिक्षणाची सुरुवात २१ ऑगस्ट २०१९ पासून झाली. यामध्ये एकूण १९ मोड्युल्सचा समावेश असणार आहे. यात १२ मोड्युल्स हे सामान्य अभ्यासक्रमावर ३ ते ४ तासांचे व ७ मोड्युल्स हे विषयनिहाय अध्यापनशास्त्रावर आधारित असून ते २४ ते २५ तासांचे असणार आहेत. ५ ऑक्टोबर ते ३ एप्रिलदरम्यानच्या प्रशिक्षणाचा वेळापत्रकात समावेश आहे. शिक्षकांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम हा मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू भाषेमध्ये उपलब्ध होणार आहे.

प्रभात Wed, 06 Octo https://epap

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**



# कॉलेज-विद्यापीठ बंदच

## लशीचे दोन डोस घेतल्यानंतरही राज्यातील विद्यार्थी घरीच बसून

म. टा. प्रतिनिधी, पुणे

करोनाच्या पार्श्वभूमीवर सुरक्षित अंतराचे नियम पाळून राज्यातील शाळा सुरू झाल्या असून, त्यामध्ये विद्यार्थ्यांची उपस्थितीही दिवसेंदिवस वाढत आहे. मात्र, त्याचवेळी लशीचे दोन डोस घेतलेले विद्यार्थी कॉलेज, विद्यापीठे सुरू होण्याची वाट पाहत आहे. त्यामुळे राज्य सरकारने तातडीने कॉलेज सुरू करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी विद्यार्थी व पालकांकडून होत आहे.

राज्यात करोनाच्या प्रादुर्भावामुळे शाळा-कॉलेज साधारण दीड वर्षांपासून बंद होते. विद्यार्थ्यांचे ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरू होते. मात्र, ऑनलाइन शिक्षणातील मर्यादा ओळखून शालेय शिक्षण विभागाने सोमवारपासून शाळा सुरु करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार ग्रामीण भागातील पाचवी ते बारावीच्या, तर शहरी भागातील आठवी ते बारावीच्या शाळा उत्साहात सुरु झाल्या आहेत. मात्र, त्याच वेळी पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाची कॉलेज बंद असून, विद्यार्थी घरी बसून ऑनलाइन शिक्षण घेत आहेत. शालेय विद्यार्थ्यांचे लसीकरण झालेले नसतानाही पालकांच्या सकारात्मक प्रतिसादामुळे विद्यार्थी शाळांमध्ये जात आहेत. तर, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांकडूनही त्यांची योग्य काळजी घेतली जात आहे. एकीकडे ही परिस्थिती असताना, दुसरीकडे कॉलेजातील विद्यार्थी दीड वर्षांपासून घरीच आहेत. यातील अनेक विद्यार्थ्यांचे लशीचे दोन डोस पूर्ण झाले आहेत. त्यामुळे या विद्यार्थ्यांना करोनाचा संसर्ग होण्याचा धोका कमी आहे. शालेय विद्यार्थ्यांपेक्षा कॉलेजमध्ये जाणारे विद्यार्थी सज्ञान असल्याने ते स्वतःची काळजी घेऊ शकतात. सध्या हे विद्यार्थी कोचिंग क्लास, अभ्यासिकांमध्ये जातात. कॉलेजांमधील इतर शैक्षणिक उपक्रमांमध्ये सहभागी होतात. त्याचबरोबर आपल्या मित्रमैत्रिणींबरोबर समूहाने फिरतात. मात्र, कॉलेजमध्येच येत नाही, अशी परिस्थिती आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळायचे झाल्यास, कॉलेज-विद्यापीठांमध्ये ऑफलाइन पद्धतीने शिक्षण सुरू होण्याची आवश्यकता असल्याचे प्राध्यापकांचे म्हणणे आहे.

> "शाळा सुरू केल्यानंतर आता राज्य सरकारने सुरक्षित नियमांचे पालन करून तातडीने महाविद्यालये सुरू करण्याची आवश्यकता आहे. सरकारने इंजिनीअरिंग, मॅनेजमेंट, फार्मसी अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पावले उचलावीत. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) सूचनेप्रमाणे विद्यापीठे आणि कॉलेजांमधील वसतिगृह सुरू करून, विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा.
>
> – अनिल ठोंबरे, प्रदेश सहमंत्री, 'अभाविप'

### मंत्र्यांकडेही मागणी

पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमांना २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे संपूर्ण वर्ष ऑनलाइन पद्धतीने शिक्षण घेण्यात गेले. या विद्यार्थ्यांच्या परीक्षादेखील ऑनलाइन पद्धतीने झाल्या. आता २०२१-२२ या शैक्षणिक वर्षात कॉलेज सुरू न झाल्यामुळे हे विद्यार्थी द्वितीय वर्षाचे शिक्षणसुद्धा घरातूनच ऑनलाइन पद्धतीने घेत आहेत. त्यामुळे कॉलेज सुरू न झाल्यास दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम हे विद्यार्थी कॉलेजमध्ये न जाता घरातून पूर्ण करतील, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. तर, तीन वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमाचे केवळ एक वर्ष (अंतिम वर्ष) कॉलेजात शिकता येणार आहे. या संपूर्ण परिस्थितीला विद्यार्थी कंटाळल्याने, आता कॉलेज सुरू करा, अशी मागणी विद्यार्थी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांना 'ट्विटर'वर करीत आहेत. सामंत यांच्या फेसबुक अकाउंटवरही विद्यार्थ्यांच्या कॉलेज सुरू करण्याबाबतच्या पोस्ट पाहायला मिळत आहेत.

Maharashtra Times 8.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# महाविद्यालये, पर्यटनस्थळे सोमवारपासून सुरू

## सर्व हॉटेल्स रात्री ११ पर्यंत सुरू राहणार

**प्रभात वृत्तसेवा**




**पुणे, दि. ८ -** जिल्ह्यातील कोविड परिस्थितीत सुधारणा होत असून लसीकरणाचे प्रमाणदेखील चांगले आहे. त्यामुळे पुणे, पिंपरी-चिंचवड व ग्रामीण भागातील महाविद्यालये आणि पर्यटनस्थळे सोमवारपासून (दि.११) सुरू करण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांचे लसीकरणाचे दोन डोस पूर्ण झाले आहेत, त्यानांच प्रवेश मिळणार आहे. बाहेर जिल्ह्यांतून येणाऱ्या विद्यार्थ्यांना आरटी-पीसीआर चाचणी करणे बंधनकारक राहणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी सांगितले.

विधानभवन येथे करोना आढावा बैठकीनंतर पवार बोलत होते. ते म्हणाले, 'जिल्ह्यात लसीकरणाला चांगली गती देण्यात आली आहे. लसीकरणात पुणे जिल्हा राज्यात दुसऱ्या क्रमांकावर आहे. कोविड संसर्गाचे प्रमाणदेखील नियंत्रणात असल्याने हे निर्णय घेतले आहेत.'

**पालिकेचे सुधारित आदेश**

शहरातील रेस्टॉरंट, बार व फूडकोर्ट शनिवारपासून रात्री ११ वाजेपर्यंत सुरू राहतील. मनपा आयुक्त विक्रम कुमार यांनी शुक्रवारी रात्री उशिरा याबाबतचे आदेश काढले. तर घरपोच पार्सल सेवा रात्री १२ पर्यंत असणार आहे. तर, कोचिंग क्लासेस ५० टक्के क्षमतेने सुरू करण्यास परवानगी मिळाली आहे.

**बैठकीतील निर्णय**

- पर्यटनस्थळे सोमवारपासून सुरु
- करोना प्रतिबंधक नियम पाळणे बंधनकारक
- हॉटेल रात्री ११ वाजेपर्यंत सुरु राहणार
- खासगी कार्यालयांमध्ये १०० टक्के उपस्थितीत परवानगी
- राज्य आणि केंद्र सरकारच्या अखत्यारितील प्रशिक्षण केंद्र सुरू

प्रभात Sat, 09 October 2021 https://epaper.eprabhat.net/c/6364

# पुण्यात थेट महाविद्यालयांत होणार लसीकरण

**पुणे, ता. ८ :** शहरातील महाविद्यालये सोमवारपासून सुरू करण्याची घोषणा करण्यात आल्यानंतर आता विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या परिसरात लस उपलब्ध करून देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

पालकमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी घेतलेल्या बैठकीत दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांचे महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. परंतु, अनेक विद्यार्थ्यांचे, महाविद्यालयातील कर्मचारी यांचे लसीकरण अद्याप झालेले नाही. या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला.

महापौर मुरलीधर मोहोळ म्हणाले, "१८ वर्षांवरील ज्या विद्यार्थी-विद्यार्थिनींचे लसीकरण न झालेले नाही. त्यांच्यासाठी महापालिकेतर्फे थेट महाविद्यालय परिसरातच लसीकरणाची सुविधा उपलब्ध करून दिली जाईल."

Sakaal 9.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

लोकसत्ता | पुणे दिनांक

# महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था, शिकवणीवर्ग सोमवारपासून सुरू

## ऑनलाइन शिक्षणाला कंटाळलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात जाण्याचा मार्ग मोकळा

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने पुणे, पिंपरी-चिंचवड, जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था सोमवारपासून (११ ऑक्टोबर) सुरू करण्याचा निर्णय उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत शुक्रवारी झालेल्या करोना आढावा बैठकीत घेण्यात आला. महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था सुरू करण्याच्या निर्णयामुळे ऑनलाइन शिक्षणाला कंटाळलेल्या विद्यार्थ्यांचा प्रत्यक्ष शिक्षण संस्थेत जाण्याचा मार्ग मोकळा झाला असून या निर्णयाचे शिक्षण क्षेत्रातून स्वागत करण्यात येत आहे.

राज्यातील ग्रामीण भागात पाचवी ते बारावीचे वर्ग आणि शहरी भागातील आठवी ते बारावीचे वर्ग ४ ऑक्टोबरपासून सुरू करण्यात आले. मात्र महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला नव्हता. त्यामुळे शाळा सुरू होऊनही महाविद्यालये बंद असा विरोधाभास निर्माण झाला होता. ऑनलाइन शिक्षणातील त्रुटींमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने, प्रात्यक्षिके आवश्यक असलेल्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत असल्याने महाविद्यालये सुरू करण्याची मागणी संस्थाचालक, प्राध्यापक, विद्यार्थ्यांकडून करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्यातील महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था आणि खासगी शिकवणी वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात आली.

पवार म्हणाले, की पुणे, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागातील महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. करोना प्रतिबंधात्मक नियमांचे पालन करून महाविद्यालये सुरू केली जातील. लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश दिला जाणार असून, बाहेरून येणाऱ्या विद्यार्थ्यांना आरटीपीसीआर चाचणी करणे बंधनकारक आहे.

### पुणे महापालिकेच्या मार्गदर्शक सूचना

- सर्व माध्यमाच्या महाविद्यालयांच्या नियमित वर्गात लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश
- महाविद्यालयातील शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या दोन्ही मात्रा झालेल्या असणे आवश्यक
- महाविद्यालयात मुखपट्टीचा वापर, सुरक्षित अंतर, निर्जंतुकीकरण आदी नियमांचे पालन करणे बंधनकारक
- प्रशिक्षण संस्था आसन क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेने सुरू करण्यास परवानगी
- प्रशिक्षण संस्थातील प्रशिक्षक, कर्मचाऱ्यांनी लशीच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या असणे आवश्यक
- खासगी शिकवणी वर्ग आसन क्षमतेच्या ५० टक्के क्षमतेने सुरू
- शिकवणी वर्गातील प्रशिक्षक, कर्मचाऱ्यांच्या लसीच्या दोन्ही मात्रा घेतलेल्या असणे आवश्यक

" प्रशासनाने महाविद्यालये सुरू करण्याबाबत घेतलेला निर्णय अतिशय महत्वाचा आणि आनंदाचा आहे. महाविद्यालये बंद असल्याने विद्यार्थ्यांची अभ्यासाची कुचंबणा होत होती, मानसिक ताण येत होता. सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य, व्यवस्थापनाशी आम्ही संपर्कात आहोत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार महाविद्यालयांना कार्यवाहीचा आदेश दिला जाईल. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला पूर्ण प्राधान्य असेल. पुन्हा एकदा महाविद्यालये, विद्यापीठाचा परिसर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीने गजबजणार आहे याचे समाधान वाटते.

– **डॉ. एन. एस. उमराणी**, प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

महाविद्यालये, विद्यापीठे सुरू करण्याबाबत विभागीय आयुक्त सौरभ राव यांच्याकडे पाठपुरावा केला होता. महाविद्यालय बंद असल्याने प्रात्यक्षिक आवश्यक असलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. तसेच दोन वर्षांचा अभ्यासक्रम असलेल्या विद्यार्थ्यांना एकदाही महाविद्यालयात जायला न मिळणे घातक आहे. मात्र महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयामुळे आनंद झाला आहे. बाकी सगळे सुरू असताना महाविद्यालये बंद ठेवणे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची सर्वतोपरी काळजी घेऊनच महाविद्यालये सुरू केली जातील. शासनाच्या नियमांचे पालन काटेकोरपणे करण्यात येईल.

– **डॉ. विद्या येरवडेकर**, प्र कुलपती, सिम्बायोसिस

महाविद्यालये सुरू करण्याच्या निर्णयाचे स्वागत आहे. महाविद्यालये सुरू होणे आवश्यक होते. विद्यार्थ्यांना लशीच्या दोन्ही मात्रा घेण्याचे आवाहन केले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याला प्राधान्य देऊनच महाविद्यालये सुरू होतील. नवसाधारण पद्धत स्वीकारूनच पुढे जावे लागेल. त्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकणे आवश्यक होते.

– **डॉ. मंगेश कराड**, कार्याध्यक्ष, एमआयटी एडीटी विद्यापीठ

लोकसत्ता Sat, 09 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63631084

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

### पुण्यातील महाविद्यालये मंगळवारपासून सुरू होणार

पुणे : शहरातील महाविद्यालये, प्रशिक्षण संस्था सोमवारपासून सुरू होतील, असे आदेश महापालिकेने शुक्रवारी काढले होते. मात्र (शनिवारी) सुधारित आदेश काढून आता महाविद्यालये (मंगळवारी) उघडतील, असे आदेश दिले आहेत.

**महाविद्यालयात होणार विद्यार्थ्यांचे लशीकरण**

**लशीकरण न झालेल्या १८ वर्षांवरील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींसाठी पुणे महापालिकेतर्फे थेट महाविद्यालय परिसरात लशीकरण सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. यामुळे ज्या तरुणांचे लशीकरण झालेले नाही, त्यांना आता थेट महाविद्यालयामध्ये लस मिळणार असल्याची माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली. यासंबंधी त्यांनी एक ट्विट केले आहे.**

लाखीमपूर येथील घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीसह शेतकरी संघटना, कामगार संघटनांनी सोमवारी महाराष्ट्र बंदची घोषणा केली आहे. पुण्यातही बंद यशस्वी करण्यासाठी काँग्रेस, राष्ट्रवादी व शिवसेना हे पक्ष एकत्र आले आहेत. या आंदोलनाचा एसटी, पीएमपी यासह सार्वजनिक वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे महाविद्यालयात पोहचवण्यासाठी विद्यार्थ्यांना अडचणी येऊ शकतात. त्यामुळे महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय एक दिवस पुढे ढकलला आहे आहे. महाविद्यालये सोमवार ऐवजी मंगळवारी सुरू होतील असे महापालिकेने आदेशात नमूद केले आहे.

Kesari 10.10.2021

६ | रविवार, १० ऑक्टोबर २०२१ — रविवार पुणे दिनांक

### महाविद्यालये, प्रशिक्षण वर्ग, शिकवणी वर्ग सोमवारऐवजी मंगळवारपासून सुरू

#### महाविद्यालयातच विद्यार्थ्यांच्या लसीकरणाची सुविधा

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** पुणे महापालिकेच्या हद्दीतील महाविद्यालये, प्रशिक्षण वर्ग आणि खासगी शिकवणी वर्ग सोमवारऐवजी आता मंगळवारपासून सुरू होणार आहेत. महापालिकेकडून शनिवारी त्याबाबतचे सुधारित आदेश देण्यात आले असून, विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी महाविद्यालयातच सुविधा करण्यात येणार असल्याची माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी ट्विटद्वारे दिली.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या करोना आढावा बैठकीत पुणे जिल्ह्यातील महाविद्यालये, प्रशिक्षण वर्ग सोमवारपासून सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर महापालिकेकडून सोमवारपासून महाविद्यालये सुरू करण्याबाबतच्या मार्गदर्शक सूचनाही देण्यात आल्या. मात्र शनिवारी महापालिकेचे आयुक्त विक्रम कुमार यांनी महाविद्यालये, प्रशिक्षण वर्ग आणि शिकवणी वर्ग सोमवारऐवजी मंगळवारपासून सुरू करण्याबाबतचे सुधारित आदेश प्रसिद्ध केले.

लसीकरण न झालेल्या १८ वर्षांवरील विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी पुणे महापालिकेमार्फत महाविद्यालय परिसरातच लसीकरण सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. लवकरच या बाबत विशेष मोहीम राबवण्यात येणार असल्याची माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी ट्विटद्वारे दिली.

> “महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. मात्र सर्व महाविद्यालये एका वेळी सुरू करण्याऐवजी टप्प्याटप्प्याने सुरू करणे गरजेचे आहे. जेणेकरून विद्यार्थ्यांना वातावरणाशी जुळवून घेता येईल. सुरुवातीला पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरू केले जातील. त्यानंतर अन्य अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना बोलावण्यात येईल. त्याशिवाय मार्गदर्शक सूचनांनुसार विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी सुविधा उपलब्ध केल्या आहेत.
>
> – डॉ. संजय खरात, प्राचार्य, मॉडर्न महाविद्यालय गणेशखिंड

> “महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय आवश्यक होता. मात्र प्रशासनाने निर्णय घेतल्यानंतर महाविद्यालयांना तयारीसाठी तुलनेने कमी वेळ मिळाला आहे. आपल्या गावी असलेल्या आणि आता महाविद्यालये सुरू होणार असल्याने पुण्यात परतणाऱ्या विद्यार्थ्यांचीही घाई होण्याची शक्यता आहे. पुण्यात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी मोठा टक्का पुण्याबाहेरील विद्यार्थ्यांचा, वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा असतो. त्यामुळे प्रशासनाकडून वसतिगृह सुरू करण्याबाबत, एका खोलीत किती विद्यार्थी या बाबत स्पष्टता मिळण्याची आवश्यकता आहे.
>
> – डॉ. अनुराग कश्यप, प्राचार्य, बीएनसीए

**समाजकल्याण विभागाची वसतिगृहे सुरू करण्याची मागणी**

पुण्यातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे बाहेरगावाहून शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना खासगी ठिकाणी राहणे परवडणारे नाही. तसेच काही विद्यार्थी पहिल्यांदाच येणारे असल्याने त्यांना अडचणींना तोंड लागेल. त्यामुळे समाजकल्याण विभागाची करोना काळजी केंद्रं म्हणून वापरलेली वसतिगृहे निर्जंतुकीकरण करून विद्यार्थ्यांसाठी खुली करावीत. वसतिगृह प्रवेशासाठी ऑनलाइन, ऑफलाइन प्रक्रिया सुरू करण्याची मागणी स्टुडंट हेल्पिंग हँडचे कुलदीप आंबेकर यांनी केली.

लोकसत्ता Sun, 10 October 2021 https://epaper.loksatta.com/c/63650687

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

सामना

# महाविद्यालये मंगळवारी सुरू होणार

## बंदच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासनाचे सुधारित आदेश

पुणे, दि. ९ (प्रतिनिधी) – पुण्यातील महाविद्यालये येत्या सोमवारपासून सुरू करण्यास राज्य सरकारकडून परवानगी देण्यात आली होती. मात्र, येत्या सोमवारी लखीमपूर घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीसह शेतकरी संघटना, कामगार संघटना यांनी 'महाराष्ट्र बंद'ची घोषणा केली आहे. त्यामुळे आता सोमवारऐवजी मंगळवारी (दि. १२) महाविद्यालये सुरू होणार आहेत.

पुण्यातील महाविद्यालये सोमवारपासून सुरू करण्यास परवानगी देण्यात आली होती. कोरोना प्रतिबंधक लसीकरणाचे दोन्ही डोस झालेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयासाठी परवानगी असणार आहे, ही माहिती उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी आढावा बैठकीत दिली होती. मात्र, येत्या सोमवारी लखीमपूर घटनेचा निषेध करण्यासाठी महाविकास आघाडीसह शेतकरी संघटना, कामगार संघटना यांनी 'महाराष्ट्र बंद'ची घोषणा केली आहे. त्यामुळे त्याचा परिणाम एसटी तसेच पीएमपीएलच्या वाहतुकीवर होणार असल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना महाविद्यालयात येण्यासाठी अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे.

त्यामुळे, पालक तसेच महाविद्यालयांकडून मागणी करण्यात आल्याने महापालिकेने शहरातील महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय एक दिवस पुढे ढकलला असून, आता पुण्यात महाविद्यालये सोमवारऐवजी मंगळवारी सुरू करण्याचे सुधारित आदेश महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवींद्र बिनवडे यांनी जाहीर केले आहेत.

### पालिका महाविद्यालय परिसरात करणार लसीकरण



लसीकरण न झालेल्या १८ वर्षांवरील विद्यार्थी–विद्यार्थिनींसाठी पुणे महापालिकेमार्फत थेट महाविद्यालय परिसरातच लसीकरण सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय पुणे महापालिकेने घेतला आहे. यासाठी लवकरच महापालिका विशेष मोहीम राबविणार असल्याची माहिती महापौर मुरलीधर मोहोळ यांनी दिली आहे.

Pune Edition
Oct 10, 2021 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# संदर्भ ग्रंथपालाचे साहित्य निर्मितीत अनन्य साधारण महत्त्व

पुणे : ज्ञानाच्या क्षेत्रात समरस होऊन आणि झोकून देऊन काम करणे दुर्मीळ दिसते. परंतु, तुम्ही जेव्हा तुमच्या कामाशी समरस होतात, तेव्हाच मोठे काम उभे राहते. लेखकांसाठी अचूक संदर्भासहित साहित्य निर्मितीच्या अनुषंगाने संदर्भ ग्रंथपालाचे अनन्य साधारण महत्त्व असते, असे मत माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

जयकर ग्रंथालयाचे निवृत्त संदर्भ ग्रंथपाल डॉ. शांताराम महाजन तथा शां. ग. महाजन यांचा संवाद पुणेतर्फे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. त्यावेळी देशमुख बोलत होते. यावेळी सुनील महाजन, संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे, भालचंद्र जुवळे आदी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, प्रत्येक शहराला इतिहास असतो. त्या इतिहासाची नोंद केल्याशिवाय शहराचे भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आर्थिकदृष्ट्या नक्की काय महत्त्व आहे? हे लक्षात येत नाही. ग्रंथालय आणि ग्रंथपाल हे लेखकाच्या साहित्य निर्मितीचे मुख्य दुवे असतात. हा दुवा कच्चा असेल, तर लेखकात हतबलतेची भावना वाढीस लागते. आजही आपल्याकडे ऐतिहासिक नोंदी घेण्याबाबत त्या टिपून ठेवण्याबाबत निराशा, अनास्था दिसून येते ही अनास्था आणि आळस झटकून विचारवंतांनी अभ्यासकांनी नोंदी घेण्याच्या कामास प्रारंभ केला पाहिजे. नवीन पिढीला इतिहासात अचूक नोंदींची भर घालण्यासाठी मुळात आधीच्या नोंदी असणे आवश्यक आहे.

Kesari 10.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

### साहित्यनिर्मितीत संदर्भ ग्रंथपालाचे महत्त्व : देशमुख

पुणे, ता. ९ : "ज्ञानाच्या क्षेत्रात समरसून आणि झोकून देऊन काम करणे दुर्मिळ दिसते. परंतु, तुम्ही जेव्हा तुमच्या कामाशी समरसून काम करतात तेव्हाच मोठे काम उभे राहते. लेखकांसाठीही अचूक संदर्भासहीत साहित्याची निर्मिती करताना संदर्भ ग्रंथपालाचे अनन्यसाधारण महत्त्व असते," असे मत अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

जयकर ग्रंथालयाचे निवृत्त संदर्भ ग्रंथपाल डॉ. शांताराम महाजन तथा शां. ग. महाजन यांचा 'संवाद पुणे'तर्फे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. महाजन यांच्या पत्नी प्रभा महाजन, 'संवाद पुणे'चे सुनील महाजन, प्रसाद भडसावळे, पत्रकार मुकुंद संगोराम, युनिव्हर्सल प्रकाशन संस्थेचे भालचंद्र जुवळे यावेळी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले, "प्रत्येक शहराला स्वतःचा एक इतिहास असतो. त्याची नोंद केल्याशिवाय त्या शहरातील व्यक्तींनाही शहराचे भौगोलिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या महत्त्व लक्षात येत नाही. ग्रंथालय आणि ग्रंथपाल हे लेखकाच्या साहित्य निर्मितीचे मुख्य दुवे असतात. हा दुवा कच्चा असल्यास लेखकात हतबलतेची भावना वाढीस लागते. आजही ऐतिहासिक नोंदी टिपून ठेवण्याबाबत अनास्था दिसून येते. ती झटकून विचारवंत, अभ्यासकांनी नोंदी घेण्यास प्रारंभ केला पाहिजे. त्यात पुढील पिढी संदर्भ बदलत जाईल, त्यानुसार नोंदींची भर घालत जाईल. त्या दृष्टीने ग्रंथपाल डॉ. महाजन यांचे कार्य अतुलनीय आहे." डॉ. मोनिका महाजन यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.



पुणे : जयकर ग्रंथालयाचे निवृत्त संदर्भ ग्रंथपाल डॉ. शांताराम महाजन यांना 'संवाद पुणे'तर्फे जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. या वेळी (डावीकडून) लक्ष्मीकांत देशमुख, डॉ. महाजन, सुनील महाजन आणि प्रसाद भडसावळे.

Sakaal 10.10.2021

### ग्रंथपालांचे महत्त्व अनन्यसाधारण

**डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांचे मत**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'ज्ञानाच्या क्षेत्रात समरसून जाणे आणि झोकून देऊन काम करणे दुर्मीळ होत आहे; पण संदर्भ ग्रंथपाल आपले काम चोखपणे बजावत आहेत. अचूक संदर्भासहित साहित्य निर्मितीसाठी संदर्भ ग्रंथपालांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे,' असे मत साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

व्यासंगी ग्रंथपाल आणि सूचिकार डॉ. शां. ग महाजन यांनी शनिवारी ९० व्या वर्षांत पदार्पण केले. या निमित्त 'संवाद पुणे'तर्फे महाजन यांना घरगुती कार्यक्रमात जीवनगौरव प्रदान करण्यात आला. त्या वेळी देशमुख बोलत होते. ज्येष्ठ पत्रकार मुकुंद संगोराम, महाजन यांचे शिष्य प्रसाद भडसावळे, युनिव्हर्सल प्रकाशन संस्थेचे भालचंद्र जुवळे आणि 'संवाद पुणे'चे सुनील महाजन उपस्थित होते.

'ग्रंथालय आणि ग्रंथपाल हे लेखकाच्या साहित्य निर्मितीचे मुख्य दुवे आहेत. हा दुवा कच्चा असेल, तर लेखकांमध्ये हतबलतेची भावना वाढीस लागते. आपल्याकडे नोंदी टिपून ठेवण्याबाबत अनास्था दिसून येते. अचूक नोंदींची भर घालण्यासाठी मुळात आधीच्या नोंदी असणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने महाजन यांचे कार्य महत्त्वाचे आहे,' असे देशमुख यांनी सांगितले.

'या वयातही माझे लिखाण सुरू आहे. यापुढेही संदर्भ ग्रंथ निर्मितीसाठी प्रयत्न करीत राहणार आहे. संदर्भ ग्रंथांबद्दल सजगता वाढीस लागावी यासाठी ग्रंथ चळवळ करणाऱ्या संस्था आणि व्यक्ती यांच्यासह मी कायम असेन,' अशी भावना महाजन यांनी व्यक्त केली. शां. ग. महाजन यांच्या पत्नी प्रभा महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मोनिका महाजन यांनी सूत्रसंचालन केले.



नव्वदीतील पदार्पणाबद्दल व्यासंगी ग्रंथपाल आणि सूचिकार डॉ. शां. ग महाजन यांना डॉ. लक्ष्मीकांत देशमुख यांच्या हस्ते शनिवारी जीवनगौरव प्रदान करण्यात आला. या वेळी सुनील महाजन आणि प्रसाद भडसावळे उपस्थित होते.

Maharashtra Times 10.10.2021

## News Paper Clippings During October 2021

**Section: Education**

लोकमत

व्यासंगी व अभ्यासू ग्रंथपाल, ज्ञानकोशकार, सूचिकार, लेखक, अनेक ग्रंथांच्या निर्मितीचे साक्षीदार, तसेच ग्रंथालय चळवळ जिवंत ठेवण्यासाठी अविरत कार्यरत असलेल्या ग्रंथालयीन, तसेच ज्ञान क्षेत्रातील 'ग्रंथालय महर्षी' म्हणून परिचित डॉ.शांताराम गजानन तथा डॉ.शां.ग. महाजन हे 9 ऑक्टोबरला वयाच्या 90व्या वर्षात पदार्पण करत आहेत.

# ग्रंथालय महर्षीने केले नव्वदीत पदार्पण !

निवृत्त झाल्यानंतर तीस बत्तीस वर्षांमध्ये चाळीस एक पुस्तक लिहायची! तीही कथा, कादंबऱ्या, ललित साहित्य नव्हे, तर ज्यात संशोधन करायची, कष्ट करायची गरज आहे, ज्यात वाचनाची बैठक मारून ती लिहायची गरज आहे, अशी पुस्तक हे फारच विशेष आहे. त्यासाठी तुमची वृत्ती असावी लागते व्यासंगी व चिकित्सक. असेच एक ज्ञानसंपन्न व्यक्तिमत्त्व म्हणजे वयाच्या ९०व्या वर्षात पदार्पण करणारे ज्ञानसाधक डॉ.शां.ग. महाजन.

पुण्यातील शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था यांना डॉ.महाजन हे चांगलेच परिचित आहेत, ते त्यांच्या संशोधक वृत्तीमुळे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या जयकर ग्रंथालयाचे ग्रंथपाल आणि ग्रंथालय व माहितीशास्त्र विभागाचे प्रमुख या पदावरून महाजन सर ३० ऑक्टोबर, १९९२ रोजी निवृत्त झाले. निवृत्तीनंतरच्या काळाचा व आत्तापर्यंतच्या ज्ञानाचा उपयोग हा समाजासाठी, आपल्या व्यावसायिक ग्रंथपाल व माहितीशास्त्रज्ञांसाठी, तसेच ग्रंथालय क्षेत्रात नव्याने येऊ इच्छिणाऱ्या साधकांसाठी करण्याचे त्यांनी मनोमन ठरवले. आधीही त्यांचे संशोधनपर लेखन सुरूच होते. आता त्यांनी शैक्षणिक साहित्य लिहिण्यावर भर दिला. इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, तसेच यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या ग्रंथालयशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी मराठी व इंग्रजी भाषेतील पाठ्यपुस्तकांची निर्मितीचे मौलिक कार्य त्यांनी केले. एकदा महाजन सर इंग्लंड येथे गेले असता, तेथे त्यांची ओळख झाली, 'लोकल स्टडी लायब्ररियन शिप' या संकल्पनेची! यात स्थानिक माहितीचे म्हणजेच शहराचे, जिल्ह्याचे वा राज्याचे संदर्भात माहितीचे स्वतंत्र दालन, त्यातील काउंटी ग्रंथालयात असणे कसे गरजेचे व स्थानिक इतिहास जाणून घेणे किती मौलिक आहे, हे



डॉ. शां. ग. महाजन

त्यांच्या लक्षात आले. माहिती संकलन करणे, त्यावर संस्कार करून संदर्भासाठी त्याची उपलब्धी, तसेच माहिती वेळोवेळी अद्ययावत करणे ही गोष्ट इंग्लंडमधील ग्रंथालये किती अपरिहार्य मानतात, याची त्यांना जाणीव झाली. यातूनच भारतात परतल्यानंतर किमान 'पुणे शहराच्या संदर्भात अशा प्रकारचे माहिती आपण संकलित केली पाहिजे,' असा त्यांनी संकल्प सोडला. पुणे शहर, त्याचा पूर्वइतिहास, होत गेलेले बदल व शहराचा विकास याच्या सूचीचे काम हाती घेत, या प्रकल्पासाठी त्यांनी अनेक संदर्भ गोळा केले. यातून 'पुणे शहर त्याचा इतिहास वाढ आणि विकास कालखंड इसवि सन ७५० ते १९१८' या नावाने पुण्याची सूची त्यांनी प्रकाशित केली. २००० साली प्रकाशित झालेल्या या सूचीत एकूण सोळाशेच्या वर ज्ञानसाधनांची म्हणजेच ग्रंथ, लेख, अप्रकाशित प्रबंध, नकाशे, डॉक्युमेंटरीज, वृत्तपत्रातील लेख आणि चरित्र यांचा समावेश आहे, तसेच या काळाची कालक्रमीही त्यांनी तयार केली. अत्यंत किचकट, वेळकाढू असे हे काम असूनही महाजन यांनी आपल्या प्रयत्नांची शिकस्त करत, हे लेखन पूर्णत्वास नेले. हे करतानाच 'पुणे शहराचा ज्ञानकोश' यासाठी शहराबद्दल माहिती गोळा करत, इंग्रजी, मराठी व हिंदी भाषेतील अनेक ग्रंथ, वृत्तपत्र कात्रणे, तसेच वैयक्तिक संग्रहातील नोंदी एकत्रित करत, हा कोश पूर्णत्वास नेला. यात पुण्याचा इतिहास, भूगोल, संग्रहालय, शहरातील पाहण्याजोगी ठिकाणे, शैक्षणिक संस्था, संशोधन संस्था यांची माहिती, तसेच शहरातील महत्त्वाच्या व्यक्तींची परिचयात्मक चरित्रे या गोष्टींचा अंतर्भाव केला. आपल्या प्रत्येक वाढदिवसाला एक तरी नवे पुस्तक प्रकाशित करायचे, हा निवृत्तीनंतर लगेचच घेतलेला संकल्प त्यांनी आजतागायत गेली तीस वर्षे पाळला आहे. आता नव्वदीतही त्यांनी ग्रंथपालांच्या ११ चांगल्या सवयी हे पुस्तक हातावेगळे केले आहे. याचसोबत २००० सालापर्यंत केलेल्या 'पुण्यातील घटनांची कालक्रमी' याचा पुढचा भाग संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे यांच्या सहसंपादनात '२००१ ते २०२१ डिसेंबरपर्यंतच्या पुणे शहरातील घटना, तसेच घडामोडींच्या नोंदी' या ग्रंथाच्या कामात ते व्यग्र आहेत. २०२२च्या फेब्रुवारी-मार्चमध्ये तो प्रकाशितही होत आहे.

भारतीय ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ.एस.आर. रंगनाथन यांच्याकडे शिकण्याचे भाग्य त्यांना लाभले. शिक्षण पूर्ण होताच, महाजन यांनी रंगनाथन यांना 'मी आपल्याला गुरुदक्षिणा म्हणून काय देऊ?' असे विचारताच डॉ. रंगनाथन यांनी -'ग्रंथालय शास्त्र व ग्रंथालय क्षेत्राचा सर्वसामान्यांपर्यंत प्रसार कर,' असे सांगितले. डॉ.रंगनाथन यांच्या या इच्छेचे पालन आपल्या ग्रंथालयीन क्षेत्रातील कामातून, ज्ञानवर्धक साहित्य लेखनातून महाजन सर आज वयाच्या नव्वदीतही सातत्याने करत आहेत. माजी राष्ट्रपती डॉ.एपीजे अब्दुल कलाम यांच्यावरील 'रामेश्वरम ते राष्ट्रपती भवन' हे त्यांचे पुस्तक स्वत: कलाम यांनी मराठी वाचणाऱ्यांकडून समजून घेतले व ते आवडले असल्याचेही त्यांना कळविले होते. डॉ.शां.ग. महाजन यांच्यासारखे व्यासंगी ग्रंथप्रेमी, ग्रंथालयनिष्ठ व अभ्यासक 'ग्रंथालय महर्षी' हे केवळ ग्रंथालय क्षेत्रात कार्यरत असणाऱ्यांसाठीच नाही, तर ज्ञानमार्गावर कार्यरत असणाऱ्या अभ्यासक, संशोधक, वाचक अशा सर्वांसाठीच एक आदर्शवत व्यक्तिमत्त्व आहेत.



प्रसाद भडसावळे
(लेखक संदर्भ ग्रंथपाल आहेत.)

प्रासंगिक

Pune Main
Page No. 9 Oct 10, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

लोकमत

## शिक्षण संस्थांना सरकारी आदेश अजून आलेला नाहीच !

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** जिल्ह्यातील विद्यापीठे व महाविद्यालये सुरू करण्यास पालकमंत्री अजित पवार यांनी परवानगी दिली असली तरी उच्च व तंत्र शिक्षण विभागाने याबाबत कोणतेही लेखी आदेश काढले नाहीत. हा आदेश आल्यानंतरच पुण्यातील शैक्षणिक संस्था सुरू होतील अशी शक्यता शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी 'लोकमत'कडे व्यक्त केली.



> महाविद्यालये ऑफलाईन सुरू करण्यासाठी आवश्यक तयारी करण्याचे निर्देश विद्यापीठाने दिले आहेत. दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याची सूचनाही दिली आहे.
>
> **-डॉ. नितीन करमळकर, कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**

कोरोना लसीचे दोन डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांचे ऑफलाईन शिक्षण सुरू करण्याची सूचना पवार यांनी नुकतीच केली. परंतु, राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून तसेच राज्य उच्च शिक्षण विभागाने याबाबत अद्याप कोणतेही लेखी आदेश दिले नाहीत. त्यामुळे काही संस्था शासन आदेशानंतर महाविद्यालये सुरू करण्याच्या विचारात आहेत.

शाळा सुरू झाल्या असून त्यांच्यासाठी स्वतंत्र नियमावली प्रसिद्ध करण्यात आली आहे. महाविद्यालयांसाठी मात्र अशी नियमावली देण्यात आलेली नाही. बाहेरगावातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहात राहण्याशिवाय पर्याय नाही. याबाबतही शासन आदेशाची प्रतीक्षा आहे.

Hello Pune
Page No. 3 Oct 10, 2021
Powered by: erelego.com

## विद्यापीठात आता 'स्पोकन संस्कृत'

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** संस्कृत भाषेची गोडी वाढण्यासह संस्कृतमध्ये संवाद वाढण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात 'स्पोकन संस्कृत' हा प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. तीस तास कालावधीचा आणि पन्नास प्रवेश क्षमता असलेला हा अभ्यासक्रम ऑनलाइन किंवा ऑफलाइन पद्धतीने शिकता येईल.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि श्री सद्गुरू ग्रुप यांच्यात शनिवारी सामंजस्य करार करण्यात आला. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, संस्कृत आणि प्राकृत विभागाचे प्रमुख प्रा. देवनाथ त्रिपाठी, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, प्रसेनजीत फडणवीस, डॉ. संजय चाकणे, डॉ. रवींद्र मुळे, श्री सद्गुरू ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष यशवंत कुलकर्णी, अतुल भगरे, भारत जगताप, घाटे गुरुजी आदी यावेळी उपस्थित होते.

कुलकर्णी म्हणाले, आमच्या संस्थेशी पौरोहित्य करणारे आठशे गुरुजी संलग्न आहेत. त्यातील बहुतेक सर्वजण संस्कृतचा अभ्यास करणारे, संस्कृत बोलण्यास इच्छुक आहेत. मात्र त्यांना पूर्णवेळ अभ्यास करणे शक्य नसल्याने प्रमाणपत्र अभ्यासक्रमाच्या माध्यमातून संस्कृत भाषा शिकण्यास इच्छुक आहेत.

पूर्णवेळाच्या संस्कृत अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन शिकणे सर्वांनाच शक्य होत नाही. त्यामुळे प्रमाणपत्र अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. त्याद्वारे संस्कृतची गोडी निर्माण होऊन संवाद वाढेल, असे डॉ. करमळकर यांनी सांगितले.

लोकसत्ता Sun, 10 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63661706

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

## परवानगी मिळाली, पण नियोजनात वेळ जाणार

**आठवडाभर वर्ग सुरू करण्याच्या दृष्टीने महाविद्यालये करणार तयारी**

**उच्च शिक्षण विभाग आणि विद्यापीठाकडून परिपत्रक येण्याची प्रतीक्षा**

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. १० -** पुण्यात वरिष्ठ महाविद्यालये सुरू करण्यास उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी परवानगी दिली आहे. त्यानुसार पुणे महानगरपालिकेने येत्या मंगळवारपासून महाविद्यालये सुरू करण्याची मुभा दिली. मात्र, यासंदर्भात उच्च शिक्षण विभाग आणि विद्यापीठाकडून परिपत्रक अद्याप प्रसिद्ध झाले नाही. त्यामुळे त्वरित महाविद्यालये सुरू न करता पहिले आठवडाभर वर्ग सुरू करण्याच्या दृष्टीने नियोजन व तयारी करण्यात येणार असल्याचे महाविद्यालयांकडून सांगण्यात आले आहे.

महाविद्यालये सुरू करण्यापूर्वी विद्यार्थ्यांचे दोन डोस पूर्ण झालेले असावेत. तसे पालकांकडून हमीपत्र घेणे आवश्यक आहे. त्यामुळे महाविद्यालयाने घाई घाईने सुरू करणे योग्य राहणार नाही. महाविद्यालयातील सर्व वर्गांचे सॅनिटायझेशन व स्वच्छता करावी लागणार आहे. त्यादृष्टीने अनेक संस्थांनी तयारी सुरू केली आहे. त्याचप्रमाणे बहुतांश प्राध्यापकांनी लसीचे दोन डोस घेतलेले आहेत. त्यामुळे आता ज्या विद्यार्थ्यांनी दोन्ही डोस घेतले आहेत, त्याची माहिती महाविद्यालयांकडून संकलित करण्यात येत आहे.

महापालिका आयुक्तांनी महाविद्यालये सुरू करण्यास परवागनी दिल्याचे परिपत्रक काढले आहे. त्यामुळे आता महाविद्यालये सुरू करण्याची मानसिकता संस्थांनी सुरू केली आहे. मात्र कशा पद्धतीने प्रत्यक्ष वर्ग घ्यावेत, काय काळजी घ्यावी याविषयीची मार्गदर्शक सूचना विद्यापीठ आणि उच्च शिक्षण विभागाकडून प्रसिद्ध होणे अपेक्षित आहे. त्यामुळे महाविद्यालये सुरू करावी की नाही, असाही संभ्रम काही महाविद्यालयांत आहे.

"सुरुवातीला प्रवेशित विद्यार्थ्यांना ओळखपत्र दिले जाणार आहे. त्यावर ज्या विद्यार्थ्यांचे दोनही डोस झाले आहेत, तशा शिक्का ओळखपत्रावर राहील. त्याशिवाय वर्गात प्रवेश दिला जाणार नाही. तसेच अन्य नियोजन व तयारी करण्यात येत असून, टप्प्याटप्प्याने वर्ग सुरू केले जाणार आहे.

\- सविता दातार, प्राचार्य, स. प. महाविद्यालय

प्रभात Mon, 11 October 2021 https://epaper.eprabhat.net/c/636839

## शिक्षकांसाठी विद्यापीठात 'सर्वसमावेशक शिक्षण'

**पुणे, ता. १० :** विविध प्रकारच्या अक्षमता असणाऱ्या विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहाच्या बरोबरीने शिक्षण देण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात शिक्षकांसाठी सर्वसमावेशक शिक्षण हा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. गेली अनेक वर्षे या विषयात काम करणाऱ्या ध्रुव एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशनच्या मदतीने हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे.

या संदर्भातील सामंजस्य करार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व ध्रुव एज्युकेशन अँड रिसर्च फाउंडेशन यांच्यामध्ये केला. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य विभागाच्या संचालिका डॉ. अपूर्वा पालकर, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, प्रसेनजीत फडणवीस, डॉ. संजय चाकणे, डॉ. सुधाकर जाधवर, शिक्षणशास्त्र व विस्तार विभागाच्या विभागप्रमुख डॉ. मेघा उपलाने, ध्रुव फाउंडेशनच्या अध्यक्षा माधवी पटवर्धन, उपाध्यक्षा शोभना भिडे आदी उपस्थित होते.

"**अभ्यासक्रम ठरवत असताना त्यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा विचार केला जातो. या अभ्यासक्रमामुळे शिक्षकांना सर्वसमावेशक शिक्षणासंदर्भात चांगलं शिक्षण आणि प्रशिक्षण देण्याचा आमचा मानस आहे.**

**- डॉ. नितीन करमळकर,** कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

Sakaal 11.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# कॉलेजांबाबत सूचना कधी?

## उपमुख्यमंत्र्यांच्या आदेशाकडे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा काणाडोळा



म. टा. प्रतिनिधी, पुणे

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी पुणे जिल्ह्यातील कॉलेज सुरू करण्याचे आदेश दिल्यानंतरही सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने कॉलेज आणि वसतिगृह सुरू करण्याबाबत कोणत्याही सूचना दिलेल्या नाहीत; तसेच कोणतीही नियमावलीही प्रसिद्ध केलेली नाही. त्यामुळे पुणे शहर, पिंपरी-चिंचवड आणि ग्रामीण भागात मंगळवारपासून विद्यापीठाचे शैक्षणिक विभाग, कॉलेज आणि वसतिगृहे सुरू होण्याबाबत शंका व्यक्त होत आहे.

करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर राज्यातील शाळा सुरू करण्यात आल्या. मात्र, विद्यापीठे आणि कॉलेज ऑफलाइन शिक्षणासाठी बंद होती. कॉलेजमध्ये शिकणाऱ्या अनेकांनी लशीचे दोन डोस घेतले आहेत. अशा परिस्थितीतही विद्यापीठे आणि कॉलेज ऑफलाइन शिक्षणासाठी बंद असल्याने, सरकारच्या धोरणावर टीका करण्यात आली. त्यानंतर अजित पवार यांनी पुणे जिल्ह्यातील विद्यापीठे आणि कॉलेज आज, सोमवारपासून (११ ऑक्टोबर) सुरू होणार असल्याचे जाहीर केले. मात्र, सोमवारी 'महाराष्ट्र बंद'च्या पार्श्वभूमीवर, पुणे महापालिकेने मंगळवारपासून विद्यापीठे आणि कॉलेज सुरू करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार शहरातील कॉलेजांनी शैक्षणिक संकुलात ऑफलाइन पद्धतीने शिक्षण सुरू करण्याबाबत तयारी सुरू केली आहे, तर शहरातील कॉलेजांमध्ये शिकणाऱ्या परगावांतील अनेक विद्यार्थ्यांनी पुणे गाठायची तयारी सुरू केली आहे. अशा परिस्थितीत पुणे विद्यापीठाने कॉलेज आणि वसतिगृह सुरू करण्याबाबत अजून कोणत्याही अधिकृत सुचना कॉलेजांना दिलेल्या नाहीत.

त्यामुळे प्राध्यापक, प्राचार्य आणि विद्यार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. पुणे विद्यापीठाने कॉलेज आणि वसतिगृह ऑफलाइन सुरू करण्याबाबत तातडीने सूचना प्रसिद्ध करून, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी मागणी शैक्षणिक वर्तुळातून होत आहे.

### 'सर्व वसतिगृहे सुरू व्हावीत'

पुण्यात ६० टक्के विद्यार्थी इतर शहरांतून येतात. वाढत्या महागाईमुळे खासगी खोल्यांत राहणे विद्यार्थ्यांच्या आवाक्याबाहेर झाले आहे. त्यामुळे पुणे विद्यापीठ, कॉलेजांसह राज्यातील सर्व वसतिगृहे तातडीने सुरू होण्याची आवश्यकता आहे. सामाजिक न्याय व विशेष साह्य विभागाने शासकीय शाळा, अनुदानित आश्रमशाळा, केंद्रीय निवासी शाळा, शासकीय वसतिगृहे व अनुदानित वसतिगृहे सुरू करण्याचे आदेश गुरुवारी दिले आहेत. मात्र, त्याची अंमलबजावणी करण्यात येत नसल्याचे 'स्टुडंट हेल्पिंग हँड'चे अध्यक्ष कुलदीप आंबेकर यांनी सांगितले.

### उच्च शिक्षण संचालकांकडूनही सूचना नाहीत

विद्यापीठाच्या शैक्षणिक विभाग आणि संलग्न कॉलेज ऑफलाइन पद्धतीने सुरू करण्याबाबत पुणे विद्यापीठ लवकर सूचना प्रसिद्ध करणार आहे, असे प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी यांनी सांगितले होते. मात्र, पुणे विद्यापीठाकडून अजूनही सूचनांची नियमावली प्रसिद्ध झालेली नाही. त्यामुळे आज, सोमवारी नियमावली प्रसिद्ध होईल का, याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष आहे. पुणे जिल्ह्यापाठोपाठ राज्यातील कॉलेज सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली आहे; तरीही राज्याचे उच्च शिक्षण संचालक डॉ. धनराज माने यांनी कोणत्याही सूचना प्रसिद्धिपत्रकाद्वारे दिलेल्या नाहीत. याबाबत डॉ. माने यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही.

Maharashtra Times 11.10.2021

### अकरावी प्रवेश : पुणे, पिंपरी-चिंचवडमधील स्थिती

# ६८ हजार विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित

प्रभात वृत्तसेवा



**पुणे, दि. १०** - पुणे व पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील कनिष्ठ महाविद्यालयांत इयत्ता अकरावीसाठी ६८ हजार २११ विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झाले आहेत. केंद्रीय ऑनलाइन प्रवेश पद्धतीद्वारे ही प्रक्रिया सुरू आहे.

अकरावी प्रवेशासाठी तीन नियमित फेऱ्या झालेल्या आहेत. एक विशेष फेरीही घेण्यात आली असून, आता प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य ही फेरी सुरू आहे. पुणे विभागात ३१७ कनिष्ठ महाविद्यालये असून यात १ लाख १३ हजार २०५ प्रवेशाच्या जागा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. एकुण ८९ हजार ९ विद्यार्थ्यांनी प्रवेशासाठी नोंदणी केलेली आहे. यातील ८१ हजार ७८४ अर्ज लॉकही झाले आहेत. ८१ हजार ५४५ अर्जांची पडताळणी पूर्ण झालेली आहे. ६४ हजार २४८ विद्यार्थ्यांनी कनिष्ठ महाविद्यालयांचा पसंती क्रम नोंदविल्याचे आढळून आले आहे.

बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सोयीच्या व नामांकित कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेश घेण्याचा हट्ट कायम ठेवला. दरम्यान, नामांकित महाविद्यालयांचा कटऑफ ९० टक्क्यांवरच राहिला. त्यामुळे बऱ्याचशा विद्यार्थ्यांना इतर प्रवेशासाठी इतर महाविद्यालयांची निवड करण्याची वेळ ओढवली आहे. अद्यापही प्रवेशाच्या ४४ हजार ९९४ जागा रिक्त आहेत. प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर आता विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची निवड करुन प्रवेश निश्चित करावा लागत आहे.

प्रभात Mon, 11 October 2021
https://epaper.eprabhat.net/c/63683959

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**

**पुढारी**

## 'सदर्भ ग्रंथपालाचेही साहित्यनिर्मितीत महत्त्व'

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

'ज्ञानाच्या क्षेत्रात समरसून जाणे आणि झोकून देऊन काम करणे दुर्मीळ दिसते. परंतु, तुम्ही जेव्हा तुमच्या कामाशी समरसून जाऊन काम करता, तेव्हा मोठे काम उभे राहते. लेखकांसाठी देखील अचूक संदर्भासहित साहित्यनिर्मितीच्या अनुषंगाने संदर्भ ग्रंथपालाचे अनन्यसाधारण महत्त्व असते,' असे मत साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख यांनी व्यक्त केले.

जयकर ग्रंथालयाचे माजी संदर्भ ग्रंथपाल डॉ. शांताराम गजानन महाजन यांचा संवाद पुणेतर्फे 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला, त्या वेळी देशमुख बोलत होते. संवाद पुणेचे अध्यक्ष सुनील महाजन, संदर्भ ग्रंथपाल प्रसाद भडसावळे, भालचंद्र जुवळे आदी उपस्थित होते.

देशमुख म्हणाले की, ग्रंथालय आणि ग्रंथपाल हे लेखकाच्या साहित्यनिर्मितीचे मुख्य दुवे असतात. हा दुवा कच्चा असेल, तर लेखकात हतबलतेची भावना वाढीस लागते. आजही आपल्याकडे ऐतिहासिक नोंदी घेण्याबाबत त्या टिपून ठेवण्याबाबत निराशा, अनास्था दिसून येते. ही अनास्था आणि आळस झटकून विचारवंतांनी, अभ्यासकांनी नोंदी घेण्याच्या कामास सुरुवात केली पाहिजे. त्यात आवश्यकतेनुसार पुढील पिढी जसा संदर्भ बदलत जाईल, त्यानुसार नोंदींची भर घालत जाईल. नवीन पिढीला इतिहासात अचूक नोंदींची भर घालण्यासाठी मुळात आधीच्या नोंदी असणे आवश्यक आहे. प्रभा महाजन यांनी मनोगत व्यक्त केले. डॉ. मोनिका महाजन यांनी सूत्रसंचालन केले आणि आभार मानले.

My Pune Edition
Oct 11, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

**लोकमत**

## दूरस्थ अध्ययन प्रशाळेतर्फे मानसशास्त्र अभ्यासक्रम

### महाविद्यालयांनी घ्यावा पुढाकार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमार्फत पुण्यातील दोन महाविद्यालयांमध्ये एम. ए. मानसशास्त्र अभ्यासक्रम सुरू केला जाणार आहे. तसेच अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील महाविद्यालयांनी पुढाकार घेतल्यास या ठिकाणीही अभ्यासक्रमाचे केंद्र दिले जाईल, असे विद्यापीठाच्या आंतरविद्याशाखीय अभ्यास विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. संजीव सोनवणे यांनी सांगितले.



नोकरी करून शिक्षण घेणाऱ्या आणि काही कारणास्तव शिक्षण न घेऊ शकलेल्या गृहिणींना विद्यापीठाने उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठाच्या मुक्त व दूरस्थ अध्ययन प्रशाळेमार्फत बी. ए., एम. ए., आणि बी. कॉम,. एम. कॉम. अभ्यासक्रमास प्रवेश दिले जातात. विद्यापीठाशी संलग्न पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्ह्यांतील संलग्न महाविद्यालयांमध्ये प्रवेशासाठी केंद्रे देण्यात आली आहेत. या केंद्रांतर्गत हजारो विद्यार्थी प्रवेश घेतात.

सोनवणे म्हणाले, विद्यापीठाशी संलग्न डी. वाय. पाटील व स. प. महाविद्यालयात प्रत्येकी २४ जागांवर एम. ए. सायकॉलॉजी या विषयासाठी प्रवेश दिले जाणार आहेत. त्याचप्रमाणे शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांशी कोणत्या प्रकारे संवाद ठेवावा; तसेच त्यांना शिकविताना कोणती काळजी घ्यावी याबाबत मार्गदर्शन करण्यासाठी स्कूल सायकॉलॉजी हा अभ्यासक्रम सुरू केला जाईल.

नवीन शैक्षणिक धोरणाची ओळख करून देणारा 'डिप्लोमा इन हायर एज्युकेशन' हा पदविका अभ्यासक्रम लवकरच सुरू करण्यात येणार असून, बीबीए अभ्यासक्रमही प्रस्तावित आहे.

Hello Pune
Page No. 8 Oct 11, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# Blended exam approach is way ahead, say Pune varsity officials

### Educationists and students union have emphasised that offline exams must be pushed for or proctored online exams held

| Salonee Mistry
salonee@punemirror.com

TWEET @Salonee_mirror

After being shut since March 2020, colleges across Pune and Pimpri-Chinchwad are set to reopen from Tuesday. Several colleges have sprung into action to welcome students in whatever numbers they turn up. However, for the time being, they are not expecting students from outstation to immediately make it back in time for the reopening of classes.

While colleges prepare to reopen, the examination department of Savitribai Phule Pune University, has been strategising ways to test students taking all scenarios into consideration. They want to have a plan in place, whether the exams are conducted in full force offline or online. Focusing on how exams were conducted over the last year and a half and the issues the university and students faced (technical or otherwise), the examination department is putting forth a proposal to the board of examination to adopt a blended approach and format in the future.


KALPESH NUKTE

Online exams have allegedly helped students, who usually don't score well, to excel

Mahesh Kakade, chief of examination, said there have been many lessons learnt over the course of the pandemic and these have been taken into consideration, while putting forth the proposals. "One of our biggest challenges was ensuring that students do not cheat and their evaluation is done in the right way. Considering that it was an online examination, there were only multiple choice questions (MCQ). This is one aspect we are hoping to change," said Kakade.

In its proposal, the examination department has suggested that the exams be conducted in a blended online and offline format and module. In a scenario, where only the online option is available, there must be descriptive questions besides the MCQs. In a situation that offline exams cannot be conducted for all, or that they must be conducted in limited numbers, preference must be given to final year students. And, examinations for others could be conducted online.

"This is simply a proposal to try and stay ahead of the situation. There is a lot we have learnt in the last year and a half and we hope to implement it in some way," Kakade added.

Kuldip Ambekar, president of Student Helping Hands, an independent student union, said, "We have seen how the pandemic and online examinations have helped even those students who usually don't score well,to top them."

Ambekar, who is also a law student, said, "If online exams are to be taken, they should be conducted in a proctored manner, anything else will only add to the issues the students currently face. Not every student has the bandwidth to sit for longer duration exams or run systems on their phones with low internet services. If it has to be done, then SPPU needs to work on getting the system right."

Educationist Dhananjay Kulkarni too holds a similar point of view. He said, "Online examinations do not adequately assess the subject understanding of the student. Considering that colleges are now opening and that other states too are managing offline examinations, whatever the situation ahead, we should also look at pushing for offline exams. It is the only way to truly test the calibre of the students," Kulkarni told *Mirror*.

Pune Mirror 11.10.2021

# Vaccine drives for college students from tomorrow

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Pune:** As part of the initiative to vaccinate those aged above 18 who have not yet received their first dose, the Pune and Pimpri Chinchwad Municipal Corporations will conduct special drives for students from Tuesday in their respective colleges.

District collector Rajesh Deshmukh said the parents and college students should aim to get vaccinated by October 14. Deshmukh said colleges have been told to collect vaccination certificates from students and their parents starting October 14. In the case school students, parents have been asked to submit their vaccination certificates.

**STEPPING UP EFFORTS**

- Over 39k vaccinated in Pune district on Sunday; **1.11cr** doses administered overall so far
- College students and their parents have been asked to submit vaccination certificates by October 14
- Villages with 100% vaccination will be felicitated
- District administration has set a target of 5L doses a day

Stepping up efforts, the district administration has set a target of administering five lakh doses every day. The highest daily vaccination that the district has achieved so far is 2.54 lakh doses on August 31.

To achieve this goal, the district collector said the support of trained staff at private vaccination centres can be taken.

Deshmukh said that to vaccinate the eligible beneficiaries from remote areas in the district, the health department should micro-plan the drive. In rural areas with poor road connectivity, transportation should be made available for beneficiaries.

The district collector has also asked authorities to increase the participation of women beneficiaries, for which assistance of women's self-help groups and non-governmental organisations (NGOs) will be taken.

The Times of India 11.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. अनिवार्य नाही

### यूजीसी अधिनियम २०१८ मधील तरतुदीला स्थगिती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** विद्यापीठांच्या विभागातील सहायक प्राध्यापक पदाच्या पात्रतेमधील पीएच.डी. पदवीच्या अनिवार्यतेला स्थगिती देण्यात आली आहे. पुढील दोन वर्षांसाठी ही स्थगिती राहणार असल्याचे विद्यापीठ अनुदान आयोगाने (यूजीसी) स्पष्ट केले असून, त्या बाबतचे राजपत्रही प्रसिद्ध करण्यात आले आहे.

देशभरातील विद्यापीठांतील शैक्षणिक विभागातील सहायक प्राध्यापक नियुक्तीसाठीच्या किमान पात्रतेसाठी पीएच.डी. पदवी अनिवार्य करण्याचा निर्णय यूजीसीने घेतला. त्या अनुषंगाने यूजीसी अधिनियम २०२१ मध्ये त्याबाबतची तरतूद करण्यात आली. १ जुलै २०२१ पासून त्याची अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे जाहीर करण्यात आले होते. त्यामुळे सहायक प्राध्यापक होऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी पीएच.डी. पूर्ण करणे आवश्यक होते. करोना काळात अनेकांच्या पीएच.डीचे संशोधन पूर्ण होऊ शकले नाही. या पार्श्वभूमीवर यूजीसीकडून विद्यापीठाच्या विभागातील सहायक प्राध्यापक पदासाठी पीएच.डी. ही किमान पात्रता असल्याचा निर्णय स्थगित करण्यात आला आहे. त्याबाबतचे परिपत्रक आणि राजपत्र यूजीसीने मंगळवारी संकेतस्थळावर प्रसिद्ध केले.

करोनाच्या प्रादुर्भावामुळे विद्यापीठाच्या विभागातील सहायक प्राध्यापक पदासाठी थेट भरती प्रक्रियेतील पीएच.डी. अनिवार्य असल्याच्या अटीची अंमलबजावणी पुढे ढकलण्यात आली आहे. हा बदल १ जुलै २०२१ ते १ जुलै २०२३ साठी लागू राहणार असल्याचे यूजीसीने परिपत्रकामध्ये नमूद केले आहे. तर विद्यापीठाच्या विभागातील सहायक प्राध्यापक पदाच्या थेट भरतीसाठी पीएच.डी. किमान पात्रता १ जुलै २०२३ पासून अमलात येणार असल्याचे राजपत्रात नमूद करण्यात आले असून या बदलाच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम २०२१ चे राजपत्र प्रसिद्ध करण्यात आले आहे.

**प्राध्यापक भरती कधी?**

राज्यात हजारो उमेदवार प्राध्यापक भरतीच्या प्रतीक्षेत आहेत. गेल्या दोन वर्षांत प्राध्यापक भरतीसाठी अनेक आंदोलनेही झाली. शासनाकडून वारंवार प्राध्यापक भरती होणार असल्याचे आश्वासन उमेदवारांना, संघटनांना देण्यात आले. मात्र वित्त विभागाकडून प्राध्यापक भरतीला मान्यता मिळालेली नसल्याने राज्यातील प्राध्यापक भरती रखडली आहे. त्यामुळे प्राध्यापक भरती प्रक्रिया कधी सुरू होणार असा प्रश्न उमेदवारांकडून उपस्थित करण्यात येत आहे.

लोकसत्ता Wed, 13 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63713575

# 'पीएचडी' अनिवार्यतेला स्थगिती

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

विद्यापीठातील विभागांमध्ये सहायक प्राध्यापकांसाठी पीएचडी बंधनकारक करण्याच्या तरतुदीला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून (यूजीसी) स्थगिती देण्यात आली आहे. करोनाच्या पार्श्वभूमीवर या तरतुदीला दोन वर्षे स्थगिती देण्यात आली असून, एक जुलै २०२३ पासून हा नियम पुन्हा लागू केला जाणार आहे.

'यूजीसी'च्या 'अधिनियम २०१८'नुसार विद्यापीठांच्या विभागात सहायक प्राध्यापक पदावर रुजू होणाऱ्या उमेदवारांना पीएचडी बंधनकारक करण्यात आली होती. एक जुलै २०२१ पासून हा नियम लागू होणार होता. मात्र, करोनाच्या पार्श्वभूमीवर निर्णयाला स्थगिती देण्यात आली असून, उमेदवारांना आणखी दोन वर्षांची मुदतवाढ दिली आहे. त्यामुळे करोनाच्या काळात संशोधन करू न शकलेल्या आणि 'सेट' तसेच 'नेट' परीक्षा उत्तीर्ण उमेदवारांना विद्यापीठांच्या विभागातील सहायक प्राध्यापक पदासाठी अर्ज करणे शक्य होणार आहे. दोन वर्षांनंतर हा नियम पुन्हा एकदा लागू केला जाणार असून, तोपर्यंत विद्यार्थ्यांना पीएचडी सादर करणे बंधनकारक राहणार आहे. जुलै २०२३नंतर पीएचडी पूर्ण नसल्यास 'यूजीसी'च्या अधिनियमानुसार संबंधित उमेदवारांना अपात्र घोषित केले जाण्याची शक्यता आहे.

**सहायक प्राध्यापकांना दोन वर्षांची मुदतवाढ**

Maharashtra Times 13.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**

लोकमत



## बदलांचा वस्तुपाठ देणारे शैक्षणिक धोरण

नवीन शैक्षणिक धोरणात प्रचलित उच्च शिक्षण पद्धतीत असणाऱ्या उणिवांचा वेध घेऊन त्यात सुधारणा करण्यासाठी अनेक उपाय सुचविले आहेत. प्रचलित पद्धतीत असणारा लवचिकतेचा अभाव, विषय निवडीत विद्यार्थ्यांना नसणारे स्वातंत्र्य, महाविद्यालयांची भक्कम वाढलेली संख्या, बहुशाखीय शैक्षणिक वातावरणाचा अभाव आणि ढासळलेली गुणवत्ता त्यांपैकी काही उणिवा, त्याचबरोबर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाची गरज, मूल्यशिक्षणाचा अंतर्भाव, सामाजिक संवेदनशीलतेची ओपासना यावरही नवीन शैक्षणिक धोरणात भर दिला आहे. सध्याच्या शैक्षणिक नियोजनात अनेक त्रुटी आहेत. त्यावरही या धोरणात भाष्य केले आहे. या आणि अशा विविध बदलांचा विचार येथे मांडला आहे.

सद्यस्थितीत पदवी अभ्यासक्रम तीन वर्षांचा असतो. तसेच पदवी मिळविण्यासाठी शाखानिहाय विषय निवडावे लागतात. नवीन शैक्षणिक धोरणात 'लिबरल एज्युकेशन' ही संकल्पना सुचवली आहे. त्यानुसार विषयांची निवड करताना कला, वाणिज्य आणि विज्ञान अशी विभागणी राहणार नाही. विद्यार्थ्याने एक वर्ष पूर्ण केल्यास प्रमाणपत्र, दोन वर्षे पूर्ण केल्यानंतर पदविका आणि तीन वर्षे पूर्ण केली तर पदवी प्राप्त होईल. शिक्षण खंडित झाले तर मिळवलेले श्रेयांक सुरक्षित असतील. त्यांचा उपयोग करून विद्यार्थी कधीही पदवी प्राप्त करू शकेल. त्याचप्रमाणे कौशल्य विकास आणि व्यवसाय शिक्षण हे शिक्षणाचे अंगभूत भाग असतील. खेळ, चित्रकला, सांस्कृतिक कार्यक्रम, राष्ट्रीय सेवा योजना यांनाही महत्त्व असले. आजमितीस भारतात ४० हजारांहून अधिक महाविद्यालये आहेत. त्यातील अनेक महाविद्यालये एका शाखेपुरती आहेत. काही महाविद्यालये तर एका विषयापुरतीच मर्यादित आहेत, अशा महाविद्यालयांमध्ये असणारी विद्यार्थिसंख्याही कमी असते. अशा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना योग्य असे शैक्षणिक वातावरण मिळत नाही. त्याचप्रमाणे मूलभूत सुविधांची ही कमतरता असते. अशा महाविद्यालयांना बहुशाखीय व्हावे लागेल, अन्यथा या महाविद्यालयांना मान्यता असणार नाही. संलग्नीकरणामुळे विद्यापीठावर कामाचा ताण वाढतो. अभ्यासक्रम ठरवणे, परीक्षा घेणे आणि शिक्षकांची निवड या आणि इतर कामांमध्ये विद्यापीठांचा वेळ जातो. नवीन शैक्षणिक धोरणानुसार ही सर्व महाविद्यालये स्वायत्त होतील. त्यामुळे महाविद्यालयांना अभ्यासक्रम ठरविण्याचे, नवीन विषय सुरू करण्याचे आणि मूल्यमापनाची पद्धती ठरविण्याचे स्वातंत्र्य मिळेल. त्यातून ग्रामीण भागातील महाविद्यालयांना पुढे काही अडचणी उभ्या राहतील. सरकारने याबाबत विचार करणे आवश्यक आहे. स्वायत्त महाविद्यालयांना आपल्या दर्जाचे निकष ठरविण्याचे स्वातंत्र्य असेल. या निकषांचे पालन होते का? हे मात्र काटेकोरपणे पाहिले जाईल. सध्या अस्तित्वात असणारी आरोग्य, क्रीडा आणि अभियांत्रिकी विद्यापीठांचे रूपांतर बहुशाखीय धोरणात होणे अपेक्षित आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी राष्ट्रीय संशोधन न्यास स्थापन करण्याची शिफारस या धोरणात आहे. या न्यासाकडे आर्थिक साहाय्य मागताना विषयांचे बंधन असणार नाही. त्याचप्रमाणे महाविद्यालयातील शिक्षक आपले संशोधन प्रकल्प आर्थिक साहाय्यासाठी सादर करू शकतील. सक्षम शिक्षणाचे नियोजन आणि नियंत्रण करणाऱ्या अनेक संस्था राज्य आणि राष्ट्रीय पातळीवरील कार्यरत आहेत. विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय तंत्रशिक्षण संस्था, भारतीय शिक्षणशास्त्र संस्था, बार काउंसिल अशा संस्थांचा त्यात समावेश आहे. या संस्थांच्या कार्यात समन्वय आणि सुसूत्रता नाही. त्याचबरोबर नियम क्लिष्ट आहेत. या सर्वांची नियंत्रक संस्था स्थापन करण्याचा प्रस्ताव नवीन शैक्षणिक धोरणात आहे.

शिक्षकांचे प्रशिक्षण, निवड त्यांचा व्यावसायिक उत्कर्ष आणि दर्जा ही काळजीची बाब आहे. आज शिक्षणशास्त्र महाविद्यालय दोन वर्षांचा शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम चालवतात. ही महाविद्यालये एकाएकी पद्धतीने चालवली जातात. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य ते शैक्षणिक वातावरण मिळत नाही. हे अभ्यासक्रम चार वर्षांची करूनही महाविद्यालये इतर शाखांबरोबर एकत्रितपणे चालविण्यात यावीत, अशी शिफारस आहे. शिक्षकांना सातत्याने प्रशिक्षणाच्या, संशोधनाच्या आणि व्यावसायिक उन्नतीच्या संधी हेदेखील अपेक्षित आहे.

**डॉ. पंडित विद्यासागर**
माजी कुलगुरू, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

Hello Pune
Page No. 6 Oct 14, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# 'यूजीसी'च्या अधिसूचना दिरंगाईमुळे अन्याय

## पीएच.डी.बाबत १ जुलैपासून सवलतीचा तपशील ऑक्टोबरमध्ये जाहीर

"१ जुलै ते १२ ऑक्टोबरपर्यंत पीएच.डी. प्राप्त नसणाऱ्या उमेदवारांना मुलाखतीपासून वंचित राहावे लागले. त्यामुळे ही अधिसूचना यूजीसीने १ जुलैला काढणे अपेक्षित होते. यूजीसीसारख्या संस्थांनी या गोष्टींचे भान ठेवणे गरजेचे आहे.

- डॉ. संजय खडक्कार, शिक्षणतज्ज्ञ

**झाले काय?...** करोनामुळे अनेकांना पीएच.डी.धारक होण्यास विलंब झाला. अनेक विद्यापीठांनी पीएच.डी. शोधप्रबंध जमा करण्याच्या कालावधीमध्येही सवलत दिली आहे. त्यामुळे यूजीसीनेही १ जुलै २०२१ ते १ जुलै २०२३ पर्यंत साहाय्यक प्राध्यापक भरतीमधून पीएच.डी.ची सूट दिली आहे. मात्र, ही अधिसूचना अडीच महिने उशिरा जाहीर करण्यात आल्याने मधल्या काळात देशातील विद्यापीठे, महाविद्यालयांमध्ये झालेल्या भरतीमध्ये अनेकांवर अन्याय झाल्याची बाब समोर आली आहे.

यांनी साहाय्यक प्राध्यापक पदासाठी अर्ज करणाऱ्यांना पीएच.डी. अनिवार्य राहणार नाही, असा निर्णय नुकताच जाहीर केला होता. त्यानंतर यूजीसीने १२ ऑक्टोबरला अधिसूचना जाहीर केली. त्यामुळे आता केवळ नेट, सेट उत्तीर्ण असणाऱ्यांनाही साहाय्यक प्राध्यापकाच्या मुलाखतींना सामोरे जाता येणार आहे. मात्र, १ जुलै २०२१ पासून लागू झालेल्या निर्णयाची अधिसूचना चक्क १२ ऑक्टोबरला जाहीर करण्यात आल्याने यूजीसीच्या या गोंधळाव[र] शिक्षण क्षेत्रातून टीका होत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोगान[े] २०१८ मध्ये साहाय्यक प्राध्यापकासाठी पात्रता निकष तया[र] करण्याकरिता एका समितीची स्थापन[ा] केली होती. समितीच्य[ा] शिफारसीनुसार, यूजीसीने २०१[८] मध्ये विद्यापीठ आणि महाविद्यालयांमध्ये साहाय्यक प्राध्यापकासाठी पीएच.डी. पदव[ी] अनिवार्य केली होती. यापूर्वी राष्ट्रीय पात्रता परीक्षा (नेट) किंवा राज्य पात्रता परीक्षा (सेट) उत्तीर्ण उमेदवारांना पीएच.डी.तून त[...] पीएच.डी.धारकांना नेट, सेटमधून सू[ट] होती. परंतु, २०१८ नुसार दोन्ह[ी] पात्रता बंधनकारक करण्यात आल्या

लोकसत्ता Thu, 14 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63739747

# राज्यातील महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून

## उदय सामंत यांची घोषणा

**मुंबई, (प्रतिनिधी)** : गेल्या दीड वर्षापासून बंद असलेली महाविद्यालये पुढच्या आठवड्यापासून पुन्हा गजबजणार आहेत. येत्या २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करण्यास राज्य सरकारने मान्यता दिली असल्याची घोषणा उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी बुधवारी केली. लशीचे दोन्ही डोस घेतलेल्या विद्यार्थ्यांनाच महाविद्यालयात प्रवेश देण्यात येणार आहे. ज्यांचे लशीकरण झालेले नाही; त्यांच्यासाठी विद्यापीठ, महाविद्यालयांनी पुढाकार घेऊन लशीकरण मोहीम राबवावी; तसेच प्रत्यक्ष उपस्थित राहू न शकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन वर्ग सुरूच राहणार आहेत. वसतिगृहेही टप्प्या-टप्प्याने सुरू करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.



शाळा सुरु झाल्या, मंदिरांची घंटा वाजली, नाट्य व चित्रपटगृहांचेही दरवाजे उघडण्याचा निर्णय झाला. मग महाविद्यालये का सुरू केली जात नाहीत? असा सवाल सतत केला जात होता. महाविद्यालये सुरू करण्याबाबत मंत्रिमंडळात असलेले मतभेदही बाहेर येत होते. अखेर काल ही प्रतीक्षा संपली. २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करण्यात येणार असल्याची घोषणा सामंत यांनी मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत केली. शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे लशीकरण पूर्ण झालेले असले पाहिजे. वसतिगृहेदेखील टप्प्या-टप्प्याने सुरू करण्यात येणार आहेत, असेही सामंत यांनी सांगितले.

### ५० टक्के उपस्थिती; पण वाढ शक्य

महाविद्यालये ५० टक्के क्षमतेने सुरू करण्यात येणार आहेत; पण स्थानिक प्रशासनाशी चर्चा करून पन्नास टक्क्यांपेक्षा जास्त क्षमतेने वर्ग चालवण्याबाबतचा निर्णय घेता येईल. ज्यांना महाविद्यालयात प्रत्यक्ष हजर राहता येणार नाही अशा विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन वर्ग सुरू ठेवणे बंधनकारक असणार आहे. महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय राज्यभरासाठी असला तरी काही जिल्ह्यांमध्ये कोरोना रुग्णांचे प्रमाण अजूनही अधिक आहे. तिथे परिस्थितीनुसार स्थानिक प्रशासन निर्णय घेईल, असे सामंत यांनी सांगितले.

### बिगर नेट, सेट अध्यापकांना निवृत्तिवेतन

राज्यातील अकृषी विद्यापीठे आणि अशासकीय अनुदानित महाविद्यालयांमधील बिगर नेट तसेच सेट अध्यापकांना निवृत्तिवेतनाचा लाभ देण्यांचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला असल्याची माहितीही उदय सामंत यांनी दिली. याचा ४ हजार १३३ प्राध्यापकांना लाभ मिळणार आहे. जे अध्यापक २३ ऑक्टोबर १९९२ ते ३ एप्रिल २००० या कालावधीत नियुक्त होते; अशांना हे निवृत्तिवेतन मिळेल.

Kesari 14.10.2021

# News Paper Clippings During October 2021

## Section: Education

पुढारी

# जिल्हावार कॅस पदोन्नती शिबिर घ्या

## डॉ. कान्हू गिरीमकर यांची मागणी

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सहायक व सहयोगी प्राध्यापकांच्या पदोन्नतीसाठी करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम (कॅस) अंतर्गत घेण्यात येणाऱ्या मुलाखती महाविद्यालयस्तरावरच व्हाव्यात, असा आदेश आहे. परंतु, अनेक महाविद्यालये अशा मुलाखतींचे आयोजनच करीत नाहीत. त्यामुळे संबंधित प्राध्यापकांवर अन्याय होत असून, कॅस पदोन्नती [illegible] कान्हू गिरीमकर यांनी केली आहे.

डॉ. गिरीमकर म्हणाले की, सातव्या वेतन आयोगाच्या अंमलबजावणीनंतर कॅसअंतर्गत घेण्यात येणाऱ्या मुलाखती वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. कारण, त्यामध्ये एक नियम आहे, की ज्या दिवशी संबंधित प्राध्यापकांच्या कॅस मुलाखती होतील, त्या दिवसापासूनच त्याची अंमलबजावणी केली जाईल. पात्रता कोणत्याही तारखेची असली, तरी मुलाखतीची तारीख महत्त्वाची असणार आहे.

Pune Edition
Oct 18, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

पुढारी

# चला...कॉलेजला!

## उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून मार्गदर्शक तत्त्वे जाहीर

### उद्यापासून होणार प्रारंभ



**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील बहुतांश कॉलेज सुरू झाल्यानंतर जवळपास दोन आठवडे झाल्यानंतर राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने कॉलेज सुरू करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. त्यामुळे अखेर बुधवारी आता पुन्हा कॉलेज गजबजणारअसल्याचे स्पष्ट झाले आहे.

कोरोनामुळे गेल्या दीड वर्षापासून प्रत्यक्ष वर्गात जाऊन शिक्षण घेण्याची वाट पाहणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आता महाविद्यालयात जाऊन शिकण्याची, मित्रांबरोबर मनसोक्त गप्पा मारण्याची संधी मिळणार आहे. पुण्यातील काही महाविद्यालये गेल्या मंगळवारी सुरू झाली. परंतु, उच्च शिक्षण संचालनालयाचा आदेश आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या मार्गदर्शक सूचना नसल्यामुळे महाविद्यालये पुन्हा बंद करण्यात आली होती, तर काही महाविद्यालये सुरू होती.

पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलेल्या सूचनेनंतर गेल्या आठवड्यापासूनच पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील कॉलेज सुरू करण्यात आली. राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मात्र कॉलेज सुरू करण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याचे स्पष्टीकरण दिले. त्यामुळे उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे आदेश नसल्याने शहरातील काही कॉलेज पुन्हा बंद केली गेली. काही कॉलेजमध्ये कोणत्याही पद्धतीची चर्चा न करता वर्ग सुरू करण्यात आले असून, ते अजूनही सुरू आहेत. पुण्यातील कॉलेज सुरू झाल्यानंतर एका आठवड्याने उच्च शिक्षण विभागाचा सूर आळवत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू केली जावीत, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या असून, यापूर्वीच नियमित सुरू झालेल्या महाविद्यालयांना पुन्हा एकदा सूचना मिळत असल्याने विद्यापीठाचे 'वरातीमागून घोडे' अशी परिस्थिती झाल्याची चर्चा रंगू लागली आहे.

### अशा आहेत मार्गदर्शक सूचना

- कॉलेजचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेने सुरू करण्यासाठी स्थानिक प्रशासनाचा सल्ला घ्यावा.
- लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांनाच कॉलेजमध्ये येण्यास परवानगी द्यावी.
- कोरोना प्रतिबंधित क्षेत्रातील कॉलेजसंदर्भात स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा.
- ज्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये यायचे नाही अशांसाठी ऑनलाइन शिक्षणाची व्यवस्था करावी.
- विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करावीत.

Pune Edition
Oct 19, 2021 Page No. 5
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# प्रतिबंधात्मक आदेशांचे पालन करून वर्ग सुरू करा

## विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयांना सूचना

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे :** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांना २० ऑक्टोबरपासून नियमित वर्ग सुरू करण्यासंदर्भात सोमवारी परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या. राज्याचे उच्च शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी २० ऑक ?टोबरपासून राज्यातील महाविद्यालये सुरू करण्याबाबत जाहीर के लेल्या निर्णयाच्या पार्श्वभूमीवर महाविद्यालये सुरू करताना करोना प्रतिबंधात्मक आदेशाची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत विद्यापीठाने स्पष्ट के ले आहे.

राज्यातील इयत्ता आठवी ते बारावीचे वर्ग यापूर्वीच सुरू करण्यात आले. तसेच राज्यातील करोनाबाधित रुग्णांची संख्या आटोक ?यात आल्याने उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या करोना आढावा बैठकीत १२ ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार पुणे, पिंपरी चिंचवड महापालिका आणि जिल्हा प्रशासनाने मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध के ल्या. मात्र उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या सूचना नसल्याने महाविद्यालये सुरू होऊ शकली नव्हती. मात्र त्यानंतर राज्याच्या पातळीवर निर्णय घेऊन २० ऑक्टोबरपासून महाविद्यालये सुरू करण्यास उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी मान्यता दिली.

### महाविद्यालये सुरू करण्यासंदर्भातील सूचना

लशीच्या दोन्ही मात्रा घेतलेल्यांनाच महाविद्यालयात प्रवेश, मुखपट्टीचा पूर्णवेळ वापर बंधनकारक, वर्गातील बैठक क्षमतेच्या ५० टक्के विद्यार्थ्यांचीच उपस्थिती, प्रत्यक्ष वर्गात उपस्थित नसलेल्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाइन शिक्षणाची सुविधा, वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करणे, विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी विशेष मोहीम.

त्यासंदर्भातील शासन निर्णयही प्रसिद्ध करण्यात आला. या पार्श्वभूमीवर, विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांचे प्राचार्य, मान्यताप्राप्त परिसंस्थांच्या संचालकांना करोना प्रतिबंधात्मक उपाययोजना करून नियमित वर्ग सुरू करण्यासंदर्भात परिपत्रकाद्वारे सूचना दिल्या आहेत. विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील पुणे, नाशिक आणि अहमदनगर जिल्ह्यातील सर्व संलग्नित महाविद्यालयांनी स्थानिक प्रशासनाने निर्गमित केलेल्या आदेशानुसार महाविद्यालय सुरू करण्यासंदर्भात कार्यवाही करावी. त्याचप्रमाणे चालू सत्राचा अभ्यासक्रम विहित कालावधीत शिकवून पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित प्राध्यापक, प्राचार्यांची असेल, असे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागाने स्पष्ट केले आहे.

लोकसत्ता Tue, 19 October 2021 https://epaper.loksatta.com/c/63

# 'उच्च शिक्षण'चे वरातीमागून घोडे

## कॉलेज सुरू झाल्यानंतर मार्गदर्शक सूचना जाहीर

म. टा. प्रतिनिधी, पुणे

पुणे, पिंपरी-चिंचवड आणि जिल्ह्यातील बहुतांशी कॉलेज सुरू झाल्यानंतर राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाला जाग आल्याचे दिसून आले आहे. कॉलेज सुरू होऊन जवळपास दोन आठवडे झाल्यानंतर राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने कॉलेज सुरू करण्यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. उच्च शिक्षण विभागाची ही दिरंगाई म्हणजे 'वरातीमागून घोडे' आहे, अशी चर्चा आता पुण्यातील कॉलेजमध्ये रंगू लागली आहे.

पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी केलेल्या सूचनेनंतर गेल्या आठवड्यापासूनच पुणे, पिंपरी-चिंचवड आणि पुणे जिल्ह्यातील कॉलेज सुरू करण्यात आली. राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने मात्र अद्याप कॉलेज सुरू करण्याबाबत कोणताही निर्णय झाला नसल्याचे स्पष्टीकरण दिले. काही कॉलेजमध्ये कोणत्याही पद्धतीची चर्चा न करता वर्ग सुरू करण्यात आले असून ते अजूनही सुरू आहेत. विभागाने दिलेल्या सूचनांमध्ये स्थानिक प्रशासनाकडून महाविद्यालयांनी सूचना घ्याव्यात, असे नमूद करण्यात आले आहे. मग पुण्यातील स्थानिक प्रशासनाने सर्व सूचनांसह कॉलेज सुरू केली होती त्याला विरोध का केला, असाही प्रश्न उभा राहिला आहे.

### विद्यापीठाकडूनही सूचना

पुण्यातील कॉलेज सुरू झाल्यानंतर दोन आठवड्यांनी उच्च शिक्षण विभागाचा सूर आळवत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने मार्गदर्शक सूचना जाहीर केल्या आहेत. विद्यापीठाशी संलग्न असलेली महाविद्यालये २० ऑक्टोबरपासून सुरू केली जावीत, अशा सूचना विद्यापीठाने दिल्या असून यापूर्वीच नियमित सुरू झालेल्या महाविद्यालयांना पुन्हा एकदा सूचना मिळत असल्याने हा प्रकार हास्यास्पद असल्याचे मत अनेकांकडून व्यक्त केले जात आहे.

### अशा आहेत मार्गदर्शक सूचना

- कॉलेजचे वर्ग ५० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेने सुरू करण्यासाठी स्थानिक प्रशासनाचा सल्ला घ्यावा.
- लसीचे दोन्ही डोस घेतलेल्या १८ वर्षांवरील विद्यार्थ्यांनाच कॉलेजमध्ये येण्यास परवानगी द्यावी.
- करोना प्रतिबंधित क्षेत्रातील कॉलेजसंदर्भात स्थानिक प्रशासकीय अधिकाऱ्यांनी आढावा घ्यावा.
- ज्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये यायचे नाही अशांसाठी ऑनलाइन शिक्षणाची व्यवस्था करावी.
- विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करावीत.

Maharashtra Times 19.10.2021

## *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**

# महाविद्यालयांचा परिसर प्रफुल्लित

## दीड वर्षाच्या खंडानंतर आजपासून महाविद्यालयांमध्ये प्रत्यक्ष वर्ग

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**पुणे :** राज्य शासनाने महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता दिल्याने गेल्या दीड वर्षापासून ऑनलाइन पद्धतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आजपासून (२० ऑक्टोबर) प्रत्यक्ष वर्गात बसून शिकता येणार आहे. जवळपास दीड वर्षाच्या खंडानंतर विद्यार्थ्यांसाठी प्रत्यक्ष महाविद्यालये सुरू होणार असल्याने महाविद्यालयांचा परिसर पुन्हा एकदा प्रफुल्लित होणार आहे.

करोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात आल्याने राज्यातील ग्रामीण भागात पाचवी ते बारावीचे आणि शहरी भागात आठवी ते बारावीचे वर्ग सुरू करण्यास मान्यता देण्यात आली. शाळा सुरू झाल्याने महाविद्यालये सुरू करण्याची मागणी जोर धरू लागली. काही दिवसांपूर्वी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत झालेल्या करोना आढावा बैठकीत पुणे जिल्ह्यातील महाविद्यालये १२ ऑक्टोबरपासून सुरू करण्यास परवानगी देण्यात आली होती. मात्र उच्च व तंत्रशिक्षण संचालनालयाच्या मार्गदर्शक सूचना नसल्याने विद्यापीठाने संलग्न महाविद्यालयांसाठीच्या मार्गदर्शक सूचना प्रसिद्ध केल्या नाहीत. परिणामी १२ ऑक्टोबरला महाविद्यालये सुरू होण्याबाबत संभ्रम निर्माण होऊन बहुतांश महाविद्यालये बंदच राहिली. या पार्श्वभूमीवर उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय जाहीर केला. लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश, मुखपट्टीचा वापर पूर्ण वेळ करणे बंधनकारक, वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करणे, सुरक्षित अंतर राखणे आदी सूचना देण्यात आल्या.

ऑनलाइन प्रणालीतील मर्यादांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान न होण्यासाठी महाविद्यालये सुरू होणे आवश्यक होते. त्यामुळे जवळपास दीड वर्षाच्या खंडानंतर विद्यार्थी प्रत्यक्ष महाविद्यालयात येऊन, वर्गात बसून शिकणार असल्याने नक्कीच उत्साह आहे. तसेच सुनासुना असलेला महाविद्यालयाचा परिसर आता पुन्हा एकदा प्रफुल्लित होणार असल्याचा आनंद प्राध्यापक-प्राचार्यांनी सांगितले. महाविद्यालयांकडून करोना प्रादुर्भाव टाळण्याच्या दृष्टीने निर्जंतुकीकरण, स्वच्छतेसाठीच्या सुविधा, जनजागृतीसाठीचे फलक आदी व्यवस्था करण्यात आली आहे.

### शुल्क भरले नाही किंवा अन्य कारणांमुळे प्रवेश नाकारू नये

महाविद्यालये सुरू होत असल्याने अनेक विद्यार्थी बाहेरगावाहून येणार आहेत. सर्वच विद्यार्थ्यांची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने महाविद्यालय, विद्यापीठातील आणि शासकीय वसतिगृहे सुरू करावीत. विद्यार्थ्यांसाठीची कमवा आणि शिका योजनेची प्रभावी अंमलबजावणी करून योजनेच्या मानधनात वाढ करावी. शुल्क भरले नाही किंवा अन्य कारणांमुळे विद्यार्थ्यांना महाविद्यालयात प्रवेश नाकारण्यात येऊ नये. त्या संदर्भातील सूचना द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांचे लसीकरण प्राधान्याने करण्यात यावे, अशा मागण्या युक्रांदचे शहर उपाध्यक्ष कमलाकर शेटे यांनी केल्या.

लोकसत्ता Wed, 20 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63845431

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**

# पहिले सत्र संपताना महाविद्यालये सुरू

## विद्यापीठाकडून स्पष्टता नसल्याबाबत नाराजी

लोकसत्ता प्रतिनिधी

**पुणे** : गेल्या दीड वर्षांपासून ऑनलाइन पद्धतीने शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना आजपासून (२० ऑक्टोबर) प्रत्यक्ष महाविद्यालयात जाता येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने जाहीर केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांतील काही अभ्यासक्रमांचे २०२१-२२ या शैक्षणिक वर्षातील पहिले सत्र संपताना महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू होत असल्याचा विरोधाभास दिसून येत आहे. सत्र संपताना महाविद्यालये सुरू होत असल्याने होणाऱ्या बदलांबाबत विद्यापीठाकडून स्पष्टता नसल्याबाबत प्राचार्यांनी नाराजी व्यक्त केली.

करोनाचा प्रादुर्भाव नियंत्रणात आल्याने राज्य शासनाने महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला. लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश, वर्गात सुरक्षित अंतर राखणे, मुखपट्टीचा वापर बंधनकारक, ५० टक्के क्षमतेने वर्ग सुरू करणे, बाहेरगावाहून येणाऱ्या विद्यार्थ्यांची आरटीपीसीआर चाचणी करणे, वसतिगृहे टप्प्याटप्प्याने सुरू करणे आदी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबवण्याच्या सूचना विद्यापीठे, महाविद्यालयांना देण्यात आल्या आहेत. मात्र विद्यापीठाने मे महिन्यात जाहीर केलेल्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखांतील काही अभ्यासक्रमांचे सत्र २० ऑक्टोबरलाच संपत आहे.

विद्यापीठाने सत्र सुरू होणे आणि सत्र संपण्याबाबत शैक्षणिक वर्षाचे वेळापत्रक परिपत्रकाद्वारे प्रसिद्ध केले होते. त्यानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील काही अभ्यासक्रमांचे पहिले सत्र २ ऑक्टोबरला संपत आहे. आता राज्य शासनाने २० ऑक्टोबरपासू महाविद्यालये सुरू करण्याचा निर्ण घेतल्यानंतर विद्यापीठाने सत्र संप असल्याची बाब लक्षात घेऊन त्य अनुषंगाने बदल करण्याबाबत स्प सूचना महाविद्यालयांना दे आवश्यक होते. मात्र विद्यापीठाकडू या संदर्भात काहीच सूचना देण्या आलेल्या नाहीत, असे का महाविद्यालयातील प्राध्यापक प्राचार्यांनी सांगितले.

### बाहेरगावचे विद्यार्थी दिवाळीनंतर परतण्याची शक्यता

महाविद्यालय सुरू झाल्यानंतर काहीच दिवसात दिवाळीची सुटी सुरू होणार आहे. त्यामुळे जेमतेम आठ दिवसांसाठी गावाहून पुण्यात येऊन महाविद्यालयात उपस्थित राहण्यापेक्षा दिवाळीनंतरच महाविद्यालयात जाणे सोयीचे ठरेल हे लक्षात घेऊन बाहेरगावी असलेले विद्यार्थी बुधवारपासून महाविद्यालयात परतण्याची शक्यता आहे. त्यामुळे दिवाळीनंतरच नियमितपणे वर्ग सुरू होऊ शकतील, असे काही प्राचार्यांचे म्हणणे आहे.

> “कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांतील अभ्यासक्रमांचे सत्र २० ऑक्टोबरला संपणार असले, तरी महाविद्यालये प्रत्यक्ष सुरू होऊन विद्यार्थी महाविद्यालयात येणार असल्याने उपलब्ध वेळात बाकी असलेला अभ्यासक्रम, प्रात्यक्षिके, प्रकल्प पूर्ण करावे. तसेच करोना काळात विद्यार्थ्यांना काही अडचणी निर्माण झाल्या असल्यास त्या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
>
> – डॉ. एन. एस. उमराणी, प्र कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Wed, 20 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63837329

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education



# Colleges reopen today for fully vaccinated students

## Outstation Pupils May Come In After Diwali

TIMES NEWS NETWORK

**RULES FOR INSTITUTIONS TO FOLLOW**

File photo

Universities should decide after consultation with the local authorities about starting classes in universities/colleges with a capacity of 50% or more

Students above 18 years of age who have taken both doses of the Covid 19 vaccine will be able to attend the university and college in person

- All universities and their affiliated colleges in the state need to adhere to all guidelines for the management of CoVID-19 as well as all additional guidelines and standard operating procedures (SOPs) issued by the state, local authority and University Grants Commission from time to time
- **Students who are unable to attend the college physically should be provided with an online facility**
- The Director, Higher Education, State of Maharashtra, Pune and the Director, Technical Education, State of Maharashtra, Mumbai should reopen hostels in a phase-wise manner after reviewing the situation
- **For those students who have not been vaccinated with Covid 19 vaccine, the university should coordinate with the local district administration with the help of the head of the concerned institution/principal of the college and carry out a special vaccination campaign to complete the vaccination on priority**
- University and college teachers and non-teaching staff should also be vaccinated on priority

**Pune:** Teachers are preparing for a hybrid teaching method consisting of online and offline teaching simultaneously at least for the initial period as colleges are set to reopen from Wednesday onwards after state government orders.

The emphasis would be on practical training that students have missed during the last few months and those dependent on theory completely would be conducted blended classes.

Seema Purohit, principal of Brihan Maharashtra College of Commerce,said that around 30% of her students have decided to stay back.

"The students and parents feel that if the cases again start increasing, they would need to go back. Hence, they have requested us to also keep the online teaching as they would like to stay at home and learn. We will continue teaching in a blended mode. The remaining 70% wish to come back to the campus. Those who are fully vaccinated have already taken up lodging in the college hostel. We are putting one student per room in these hostels at the moment as we have the space," Purohit said.

N S Umarani, pro-vice-chancellor of Savitribai Phule Pune University, said that some departments will start offline from tomorrow while some, where admissions are still going on, will continue to be online.

"We are also adopting a blended model of teaching because outstation students would need time to come here and many may come after Diwali. Our hostels have started for students who are completely vaccinated and we are allowing them to stay as per the capacity of the room. We have already appealed to all students to get vaccinated and if they need help, they can always contact the health centre of the university where vaccination can be administered. All the departments are in the process of collating the vaccination data of their own students," Umarani said.

Jaya Rajagopalan, principal of St Mira's College for Girls, said while 90% of her college staff is fully vaccinated the number of students who have taken both doses of vaccine is very less.

"The rest have taken one dose of the vaccine. We have made all the necessary arrangements for reopening the college and all precautionary measures are in place according to the SOP given by SPPU. We have taken a survey of the students and very few of them are fully vaccinated, which is a requisite for attendance," Rajagopal said.

B V Nair, a parent, said that his daughter will attend the classes from Wednesday. "She started college last year but has not yet seen her classmates in person till now. So, she is very excited to go to college. She is fully vaccinated. Moreover, we, as a family, have travelled and we also go out to eat sometimes. Going to college for a few hours will definitely be safer especially when the institutions have taken all precautions. They will always wear a mask and also sanitise our hands using a pocket sanitiser. The sanitisation of hands has become second nature to many of us. I was worried about my daughter not getting enough practical exposure in her course and I am glad that the college is reopening," he said.

Some other colleges are also catering to a mixed format of teaching.

"We will have to go for a blended method of teaching initially as not all students are vaccinated. The video recording and the face-to-face teaching shall continue for the initial few days," VN Jagtap, principal of MCES College of Pharmacy said.

Colleges have also collected vaccination information from their students. "We have collected the vaccination information of all the students and told all heads to plan to conduct practical and theory for eligible students following Covid-19 guidelines in offline mode and for others in online mode. Hardly 35% students have taken both the doses and remaining have taken the first dose. Let's see the response of eligible students. It will take time to smooth out the process. Students from outside the city have to check their accommodation and other arrangements," D S Bormane, principal of AISSMS College of Engineering, said.

Some students are wary about the reopening. "We are hoping that there is no change in the decision now as there have been too many reopenings and shutdowns. We want the college to conduct classes smoothly and we are aware about the precautions that require to be taken. All of us would follow them judiciously as we don't want classes to halt again," Siddhesh Sawant, a student, said.

The Times of India 20.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

लोकमत

लोकमत एज्युकनेक्ट

epaper.lokmat.com

पुणे, गुरुवार, दि. २१ ऑक्टोबर २०२१ ७

## नवे शैक्षणिक धोरण : घोषणा झाली; अंमलबजावणीचे काय ?

नवीन शैक्षणिक धोरणात पदवी अभ्यासक्रमाच्या स्वरुपात बदल करण्यात आला आहे. मात्र, या बदलामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या रोजगाराचा प्रश्न सुटणार आहे का? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो.

नवीन शैक्षणिक धोरणाची घोषणा झाली. मात्र, आता त्याच्या अंमलबजावणीच्या दृष्टीने पावले टाकण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन, विद्यापीठे आणि महाविद्यालयांनी कोणती कामे करायला हवीत याकडे लक्ष देण्याची गरज आहे. आंतरविद्याशाखीय अभ्यासक्रम सर्व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांना कसे उपलब्ध करून दिले जाणार? नवीन अभ्यासक्रमांची निर्मिती केव्हा सुरू होणार? प्राध्यापक भरतीचा प्रश्न किती दिवस प्रलंबित ठेवणार? शैक्षणिक संस्थांना संशोधनासाठी निधी वितरण कसे केले जाणार? आदी गोष्टींबाबत अजून स्पष्टता नाही. त्यामुळे आता या प्रश्नांसह विविध प्रश्नांची उत्तरे देण्याची आणि त्यानुसार धोरणाची अंमलबजावणी करण्याची वेळ आली आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात पदवी अभ्यासक्रमाच्या स्वरूपात बदल करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांनी पदवी अभ्यासक्रम पूर्ण करण्यापूर्वी शिक्षण सोडले तरीही त्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही. मात्र, या बदलामुळे संबंधित विद्यार्थ्यांच्या रोजगाराचा प्रश्न सुटणार आहे का? हा प्रश्न अनुत्तरितच राहतो. शैक्षणिक धोरणात मुख्य विषय आणि पर्यायी विषय असे निवडीचे पर्याय दिले आहेत. त्यात मुख्य व पर्यायी विषयांचे प्रमाण निश्चित केले आहे. परंतु, या सर्व गोष्टींसाठी विद्यापीठांना अभ्यासक्रम तयार करावा लागणार आहे. त्यासाठी विद्यापीठांनी कामाला सुरुवात करणे अपेक्षित आहे. अभ्यासक्रम तयार झाल्याशिवाय महाविद्यालये काहीही करू शकणार नाहीत.

'ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट'चा विचार या शैक्षणिक धोरणात केला आहे. त्यामुळे इंजिनीअरिंगचा विद्यार्थी सोशल सायन्सचे विषय घेऊ शकेल. परंतु विद्यार्थी हे विषय कसे आणि कधी घेणार? याबद्दल स्पष्टता नाही. काही विषयांसाठी 'व्हिजिटिंग फॅकल्टी' उपलब्ध करून द्यावे लागतील. परंतु, हे सर्वच महाविद्यालयांना शक्य होईल का? हे तपासण्याची आवश्यकता आहे. त्याचप्रमाणे ॲकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट घेणारा विद्यार्थी कुठेही जाऊन शिक्षण घेऊ शकतो. परंतु, सद्यस्थितीत एका विद्यापीठातील विद्यार्थी दुसऱ्या विद्यापीठात जाऊ शकत नाही, अशी परिस्थिती आहे. परिणामी याबाबत एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण करावी लागणार आहे. त्यामुळे धोरणातील तरतुदींची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा तत्काळ विचार करणे गरजेचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणात संलग्नीकरणाची यंत्रणा पूर्णपणे काढून टाकण्याचा उल्लेख आहे. तसेच देशात एकाही विद्यापीठाशी ३०० पेक्षा जास्त महाविद्यालये संलग्न असू नयेत, अशी अपेक्षा व्यक्त आहे. परंतु, पुणे, मुंबई, नागपूर यांसारख्या विद्यापीठांना संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या खूप मोठी आहे. अनेक वर्षांपासून सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे विभाजन करून अहमदनगर व नाशिक येथे त्यांची उपकेंद्र झाली आहेत. मात्र, त्यांना विद्यापीठाचा दर्जा देण्याची केवळ चर्चाच सुरू आहे.

सध्या शैक्षणिक यंत्रणा, अभ्यासक्रम, शिक्षक सर्व काही आहे त्याच ठिकाणी आहे; मात्र त्यांच्याकडूनच शैक्षणिक गुणवत्तावाढीची अपेक्षा केली जाते. बदलणाऱ्या शैक्षणिक स्वरूपामुळे प्राध्यापक भरतीची आवश्यकता आहे.



महाराष्ट्रात गेल्या काही कालावधीपासून प्राध्यापक भरतीचा मुद्दा गाजत आहे. उच्च शिक्षण विभागाकडून परवानगी दिली असली तरी वित्त विभागाकडून त्यास परवानगी दिली जात नाही. एकूणच केंद्र सरकार व राज्य सरकारचे पूर्ण सहकार्य असल्याशिवाय नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होणे अवघड आहे. पुढील काळात रिसर्च इंटेन्सिव्ह युनिव्हर्सिटी, टिचिंग इंटेन्सिव्ह युनिव्हर्सिटी आणि 'मल्टिडिसिप्लिनरी इन्स्टिट्यूशन हॅविंग डिग्री अवॉर्डिंग स्टेट्स' अशी यंत्रणा अस्तित्वात येणार आहे. त्यामुळे सर्व महाविद्यालयांना पदवी देण्याचा अधिकार प्राप्त होणार आहे. परंतु, त्यासाठी महाविद्यालयांना प्रथमत: स्वायत्तता देण्याची आवश्यकता आहे. देशात ४२ हजार ३४३ महाविद्यालये असून त्यातील सुमारे ८ हजार ६६० महाविद्यालयांनी नॅककडून मूल्यांकन केले आहे. सर्वांना स्वायत्ततेचा दर्जा द्यायचे ठरवले तर सर्व महाविद्यालयांचे अद्याप नॅककडून मूल्यांकन झालेले नाही. देशातील ८ हजार ६६० महाविद्यालयांपैकी वीस टक्के म्हणजे सुमारे २०० महाविद्यालयांना नॅककडून 'अ' दर्जा मिळालेला आहे. त्यामुळे २.५ सीजीपीए असणाऱ्या महाविद्यालयांनासुद्धा स्वायत्तता देण्याचा विचार करावा लागेल, अशा लहान लहान घटकांचा विचार करून शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीची सुरुवात करणे सर्वांसाठी शैक्षणिकदृष्ट्या हिताचे ठरेल.

**डॉ. आर. एस. माळी**
माजी कुलगुरु

Hello Pune
Page No. 7 Oct 21, 2021
Powered by: erelego.com

# News Paper Clippings During October 2021

## Section: Education

लोकमत



### शैक्षणिक धोरणापुढे शिक्षकांच्या तुटवड्याचे आव्हान

नवीन शैक्षणिक धोरणाच्या घोषणाला एक वर्षापेक्षा अधिक कालावधी होऊन गेला. येत्या २०४० पर्यंत या धोरणाची पूर्ण अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट केंद्र शासनाने समोर ठेवण्यात आले आहे. मात्र, सध्या अंमलबजावणीच्या दृष्टिकोनातून कोणत्याही मोठ्या हालचाली होताना दिसून येत नाही. त्यामुळे धोरणाच्या अंमलबजावणीसाठी लागणाऱ्या यंत्रणा तावडतोब उभ्या करणे गरजेचे आहे. अन्यथा निश्चित केलेल्या उद्दिष्टपूर्तीपर्यंत पोहचणे शक्य होणार नाही. तसेच विविध संघटना, युवाशक्ती, शिक्षण क्षेत्रातील सर्व घटकांना नवीन शैक्षणिक धोरण समजल्याशिवाय अंमलबजावणी करणे शक्य होणार नाही.

स्वातंत्र्यानंतर भारतात शिक्षण विषयक केवळ दोन धोरणांची अंमलबजावणी झाली. पहिले शैक्षणिक धोरण माजी पंतप्रधान इंदिरा गांधी यांच्या काळात १९६४ मध्ये मांडले गेले आणि १९६८ मध्ये त्यास मंजुरी मिळाली. आर्थिक तरतुद अपुरी असल्यामुळे या धोरणाची यशस्वीपणे अंमलबजावणी होऊ शकली नाही. दुसरे शैक्षणिक धोरण माजी पंतप्रधान राजीव गांधी यांच्या कार्यकाळात १९८६ मध्ये आले. त्यात १९९२ मध्ये पी. व्ही. नरसिंह राव यांनी काही सुधारणा केल्या. त्यामुळे आता बरोबर ३४ वर्षांनंतर तिसरे शैक्षणिक धोरण मंजूर करण्यात आले आहे.

नवीन शैक्षणिक धोरणाच्या यशस्वीतेसाठी धोरणात नमूद केलेल्या तरतुदीनुसार आवश्यक मनुष्यबळ लागणार आहे. मनुष्यबळ म्हटले तर आर्थिक तरतूद येतेच. शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व घटकांना त्याचे पूर्णपणे आकलन झाले पाहिजे. त्यामुळे शासनाने योग्य काळातच संस्थाचालक, प्राचार्य, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक आदी सर्व घटकांना धोरणातील तरतुदींची माहिती करून दिली पाहिजे. त्यासाठी कार्यशाळा, चर्चासत्र घेणे गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रातील प्रत्येक घटकाला धोरण राबवताना स्वतःच्या जबाबदाऱ्या आणि कर्तव्य पूर्णपणे समजले पाहिजे. धोरण राबवताना त्यातून कोणी पळवाटा काढण्याचा प्रयत्न केला तर संबंधितांना पायबंद घालण्याच्या स्पष्ट उल्लेख असला पाहिजे.

नवीन शैक्षणिक धोरणात अभ्यासक्रम निर्मिती आणि परीक्षा व मूल्यमापनाकडे विशेष लक्ष देण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी तरतूद केली जाणार आहे. परंतु, हे व्यवहार्य वाटत नाही. तसेच या देशातील शिक्षण सुधारण्यासाठी संस्थाचालक व शिक्षक या दोनच घटकांना प्रशिक्षण देण्याची आवश्यकता आहे. नवीन शैक्षणिक धोरणात त्याचा विचार केला आहे. ही स्वागतार्ह बाब आहे.

नवीन शैक्षणिक धोरणात दूर शिक्षणाला सक्षम करण्यावर भर दिला आहे. त्याचप्रमाणे धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आता सक्षम प्राध्यापकांची नियुक्ती करावी लागणार आहे. प्राथमिक, माध्यमिक शाळांमधील शिक्षकांसाठी डी.एड., बी.एड. बंधनकारक आहे. मात्र, महाविद्यालयीन प्राध्यापकांसाठी याबाबत विचार केला जात नाही. तसेच धोरणात गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक सहकार्याचा विचार केला आहे. परंतु, सद्यस्थितीत प्राध्यापक नियुक्ती करणे शक्य होत नाहीत, त्यामुळे गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देणे शक्य होईल का? याबाबत शंका वाटते.

नवीन शैक्षणिक धोरणात मांडलेल्या संकल्पना चांगल्या आहेत. मात्र, त्याच्या अंमलबजावणीसाठी समाज तेवढा सुज्ञ नाही. तसेच पुढील काळात अपुरे मनुष्यबळ, शिक्षकांचा तुटवडा जाणवणार आहे. या धोरणाच्या अंमलबजावणी मागील नेमका हेतू काय आहे, हे संस्थाचालकांना समजावून सांगावे लागणार आहे. शैक्षणिक धोरण राबविणाऱ्यांना काहीच माहिती नसले तर या धोरणाच्या अंमलबजावणीबाबत बोलणे आता शहाणपणाचे ठरणार नाही.

शिक्षण ही विधायक गुंतवणूक असून त्यादृष्टीने फारसा विचार नवीन शैक्षणिक धोरण तयार करताना झाला नाही. तसेच सध्याची शैक्षणिक यंत्रणा सक्षम आणि पारदर्शक आहे. तसेच संस्थाचालक, प्राचार्य, शिक्षक हे सर्व सक्षम आहेत, असे गृहित धरून नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीचा विचार केला जात आहे. मात्र, सर्वच घटक सक्षम आहेत, असे नाही. त्यातील काही अप्रामाणिकही आहेत. याचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करावी लागेल.

**डॉ. अरुण अडसूळ**
माजी कुलगुरू

शब्दांकन : **राहुल शिंदे**

Hello Pune
Page No. 7 Oct 21, 2021
Powered by: erelego.com

### महाविद्यालये सुरू झाल्याच्या दुसऱ्या दिवशीच दिवाळी सुटी सुरू

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक वेळापत्रकानुसार कला, वाणिज्य, विज्ञान विद्याशाखांतील काही अभ्यासक्रमांचे पहिले सत्र बुधवारी संपले. शैक्षणिक वेळापत्रकात बदल नसल्याचे विद्यापीठ प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आल्याने महाविद्यालये सुरू झाल्याच्या दुसऱ्या दिवशीच दिवाळीची सुटी सुरू झाली आहे.

विद्यापीठाकडून २०२१-२२चे शैक्षणिक वेळापत्रक मेमध्ये जाहीर करण्यात आले होते. त्यानुसार कला, वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेतील काही अभ्यासक्रमांचे शैक्षणिक सत्र २० ऑक्टोबरला संपले. त्यामुळे महाविद्यालये सुरू होण्याच्या दिवशीच शैक्षणिक सत्राचा अखेरचा दिवस असा विरोधाभास निर्माण झाला. शैक्षणिक वेळापत्रकानुसार पहिले सत्र संपल्याने तांत्रिकदृष्ट्या दिवाळीची सुटी सुरू झाली आहे. पदवी आणि पदव्युत्तर पदवीच्या प्रथम वर्षाचे प्रवेशांना उशीर झाल्याने आता या वर्गांचा बाकी असलेला अभ्यासक्रम पूर्ण करण्याला प्राधान्य दिले जाईल. तसेच पदवी आणि पदव्युत्तरच्या द्वितीय व अंतिम वर्षाचा अभ्यासक्रम बाकी असल्यास तो पूर्ण करण्यात येईल. त्यामुळे ऑनलाइन किंवा प्रत्यक्ष वर्गातील अध्यापन, अनुषंगिक कामांसाठी शिक्षकांना महाविद्यालयात बोलावले जाईल. पुढील सत्रात विद्यार्थी प्रत्यक्ष वर्गात येण्यासाठीचे नियोजन या सुटीच्या कालावधीत करण्यात येईल, असे काही महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सांगितले.

**लसीकरणाची महाविद्यालयांकडून व्यवस्था**

राज्य शासनाने महाविद्यालये सुरू करण्यास मान्यता देताना लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांना वर्गात प्रवेश, विद्यार्थ्यांचे लसीकरण करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्यामुळे महाविद्यालयांकडून लशीच्या दोन मात्रा घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्यात येत असून, माहिती संकलित झाल्यावर विद्यार्थ्यांच्या लसीकरणाचे नियोजनही करण्यात येणार आहे.

लोकसत्ता Thu, 21 October 2021
https://epaper.loksatta.com/c/6

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# आता महाविद्यालयांमध्ये लसीकरण मोहीम

### सामंत : दोन डोस झालेल्या विद्यार्थ्यांना ऑफलाइन प्रवेश

**मुंबई, दि. २० -** कोविडच्या पार्श्वभूमीवर मागील अनेक दिवस महाविद्यालये ऑनलाइन पद्धतीने सुरू होती, आता ती ऑफलाइन पद्धतीने महाविद्यालये सुरू करण्यात येत आहेत. कोविड प्रतिबंधक लसीचे दोन डोस झालेले विद्यार्थी ऑफलाइन उपस्थित राहू शकणार आहेत. त्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

मुंबईच्या सिडनॅहम महाविद्यालयात विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी व त्यांच्याशी संवाद साधण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

सामंत म्हणाले, मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली आरोग्य विभागासोबत बैठक घेऊन, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या लसीकरणासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येईल.

या मोहिमेतून प्रत्येक महाविद्यालयात शिकणाऱ्या विद्यार्थ्याला लस उपलब्ध होईल याची काळजी घेतली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

ज्या विद्यार्थ्यांनी कोविड प्रतिबंधक लसीचे दोन डोस घेतले आहेत. त्यांनी ही सामाजिक अंतर राखून, मास्क लावून वर्गात उपस्थिती लावावी. महाविद्यालयांनीही विद्यार्थी-पालक यांच्या मनातील भीती दूर करण्याचा प्रयत्न करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

प्रभात Thu, 21 October 2021
https://epaper.eprabhat.net/c/63869407

# महाविद्यालयीन तरुणांच्या लशीकरणासाठी आता 'मिशन युवा स्वास्थ्य' मोहीम

**पुणे :** कोरोना विषाणूच्या प्रसाराला अटकाव घालण्यासाठी, तसेच तरुणांच्या स्वास्थ्यासाठी 'मिशन युवा स्वास्थ्य' मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेअंतर्गत पहिला आणि दुसरा डोस पूर्ण झालेल्या तरुणांची माहिती एकत्रित करून ज्यांचे लशीकरण अद्याप पूर्ण झालेले नाही, अशा तरुणांना थेट महाविद्यालयात जावून या मोहिमेअंतर्गत लस दिली जाणार आहे. येत्या २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर दरम्यान ही मोहीम जिल्हाधिकारी, उच्च शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाच्या मार्गदर्शनाखाली राबवली जाणार असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. भगवान पवार यांनी दिली.



कोरोनाच्या वाढत्या प्रसाराचा वेग दिवसेंदिवस मंदावला आहे. यामुळे निर्बंध शिथिल करण्यात आले आहेत. शाळा, महाविद्यालये सुरू झाली आहेत. महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढली आहे. यामुळे त्यांना त्यांच्या संपर्कात येणाऱ्यांना कोरोना संसर्ग होण्याची भीती आहे. यामुळे त्यांचे लशीकरण होणे गरजेचे आहे.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात लशीकरण सुरू झाले असले तरी १८ ते ४४ या वयोगटातील अनेक तरुणांचे लशीकरण अद्यापि बाकी आहे. यामुळे त्यांचे प्राधान्याने लशीकरण होणे गरजेचे आहे. या उद्देशाने 'मिशन युवा स्वास्थ्य' ही मोहीम राबविण्यात येणार आहे. किती तरुणांचा पहिला डोस आणि दुसरा डोस पूर्ण झाला आहे, तसेच कोणाचे लशीकरण अद्याप झाले नाही, अशा तरुणांची माहिती २२ ते २५ सप्टेंबर दरम्यान गोळा केली जाणार आहे. यानंतर उपलब्ध आकडेवारीनुसार थेट महाविद्यालयात जावून लशीकरण मोहीम राबवली जाणार आहे. या संदर्भात आरोग्यमंत्री राजेश टोपे, उच्च तंत्रविज्ञान मंत्री उदय सामंत यांची बैठक झाली. या बैठकीत या मोहिमेबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

Kesari 22.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

पुढारी

# दर्जेदार शिक्षणासाठी कटिबद्ध

## नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यात उत्कृष्ट पद्धतीने राबविणार : सामंत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील विद्यार्थी देशातच नव्हे, तर जगात दर्जेदार शिक्षणाने समृद्ध व्हावा, यासाठी नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची (एनईपी) अंमलबजावणी राज्यात उत्कृष्ट पद्धतीने केली जाईल. ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आलेल्या समितीने शिफारशींचा अहवाल दिला आहे. त्याबाबतही सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यकतेप्रमाणे केंद्र शासनाला शिफारशी करण्यात येतील, अशी माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली.

अभियांत्रिकी महाविद्यालय पुणे (सीओईपी) येथे आयोजित कार्यक्रमात विद्यार्थ्यांशी संवाद साधताना ते बोलत होते. या प्रसंगी महाविद्यालयाचे संचालक डॉ. बी. बी. आहुजा, तंत्रशिक्षण विभागाचे सहसंचालक डॉ. दत्तात्रय जाधव आदी उपस्थित होते.

सामंत म्हणाले की, कोरोना महामारीच्या प्रारंभी या विषाणूचे स्वरूप माहीत नसल्याने विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी यांची सुरक्षितता लक्षात घेत परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्य शासनाने देशात उत्कृष्ट अशा ऑनलाइन परीक्षा महाराष्ट्रात घेतल्या. आता कोरोना परिस्थिती आटोक्यात येत असल्याचे दिसल्याने विद्यार्थ्यांचे दैनंदिन जीवन, शिक्षण परत व्यवस्थित सुरू करण्यासाठी महाविद्यालये सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. आता विद्यार्थ्यांनीही यापुढे वर्गात प्रत्यक्षच हजर राहण्यासाठी 'मिशन ऑफलाइन' राबण्याचे ठरवले पाहिजे. कोरोना मार्गदर्शक सूचनांचे मात्र पालन करावे, असे आवाहनही त्यांनी केले.



### 'कोरोनायोद्धा' म्हणून अनेकांचा सत्कार

या वेळी पुणे शहरातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयातील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच कोरोना काळात उत्कृष्ट काम केलेले 'सीईओपी'मधील विद्यार्थी, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारीवर्ग यांचा 'कोरोनायोद्धा' म्हणून सत्कार करण्यात आला.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राज्यामध्ये तीन टप्प्यांत राबवण्यात येणार असून, पहिल्या टप्प्यात शैक्षणिक क्षेत्राच्या विकासासाठी कुठल्याही आर्थिक निधीची आवश्यकता नसलेल्या बाबी, दुसऱ्या टप्प्यात मध्यम स्वरूपाचा निधी आवश्यक असणाऱ्या बाबींचा समावेश असेल. तर तिसऱ्या टप्प्यात दीर्घकालीन पायाभूत सुविधा उभारण्यासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद राज्याच्या अर्थसंकल्पात केली जाणार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरित्राचा अभ्यास केला पाहिजे. त्यांच्यावर आंतरराष्ट्रीय दर्जाचे संशोधन करण्यासाठी रत्नागिरी जिल्ह्यात संशोधन केंद्र, तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाचे ग्रंथालय उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. वाडिया महाविद्यालयातही सामंत यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करुन त्यांच्याशी संवाद साधला.

Pune Edition
Oct 23, 2021 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

सामना

# एकही विद्यार्थी लसीकरणापासून वंचित राहणार नाही

## मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहीम राबविणार

पुणे, दि. २२ (प्रतिनिधी) - राज्यातील महाविद्यालये आणि विद्यापीठे नुकतीच सुरू झाली असली, तरी विद्यार्थ्यांच्या उपस्थितीचे प्रमाण नगण्य आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांचे लसीकरण करून घेण्यासाठी राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण आणि आरोग्य विभागाकडून संयुक्तरीत्या मिशन युवा स्वास्थ्य लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. २५ ऑक्टोबर ते २ नोव्हेंबर या कालावधीत सुमारे ४० लाख विद्यार्थ्यांच्या लसीकरणाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. दिवाळीनंतरही लसीकरण मोहीम सुरू राहणार असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत यांनी पुण्यात पत्रकार परिषदेत दिली.



महाविद्यालये सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यासाठी उदय सामंत यांनी पुण्यातील विविध महाविद्यालयांना भेट दिली. यानंतर शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय (सीओईपी) येथे पत्रकारांशी संवाद साधला.

उदय सामंत म्हणाले, 'नेमके किती विद्यार्थी लसीपासून वंचित आहेत, याची माहिती आरोग्य विभागाला दिली जाणार आहे. महाराष्ट्रामध्ये पाच हजार कॉलेज आहेत. प्रत्येक कॉलेज हे प्रत्येक युनिट याप्रमाणे लसीकरण केलं जाईल. कोणी वंचित राहणार नाही, याचा आढावा घेऊन जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना लसी देणार आहोत. ऑनलाइन शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना ऑफलाइन शिक्षणाची सवय लागली पाहिजे. त्यामुळे महाविद्यालयीन परीक्षा ऑफलाइन पद्धतीने घेण्यात येतील, तसेच ऑनलाइनचा पर्यायदेखील खुला राहील. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उच्च शिक्षण विभागाकडून विविध अभ्यासक्रमांच्या सीईटी परीक्षा घेतली जात आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाणार नाही, यासाठी तज्ज्ञांशी सल्लामसलत करून निर्णय घेतला जाईल.'

'टीचर्स अकॅडमीसाठी सामंजस्य करार केला आहे. शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी २०२१ मध्ये कसं ट्रेनिंग देणं अपेक्षित आहे, याबद्दल करार झाला आहे. पुण्यातील शिक्षक प्रशिक्षण केंद्राच्या वास्तूचे कामकाज पूर्ण झाले आहे. पाचगणी व पुण्यातील एका संस्थेशी नुकताच करार करण्यात आला आहे. या संस्थांकडून शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे. महिन्याभरात या सेंटरचे काम सुरू होईल', असेही सामंत यांनी स्पष्ट केले.

**सीओईपी लवकरच विद्यापीठ**

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयास स्वायत्त विद्यापीठाचा दर्जा मिळावा, ही कॉलेजची बऱ्याच दिवसांपासूनची मागणी आहे. यासाठी पुढील शैक्षणिक वर्षापर्यंत दर्जा मिळेल, अशा पद्धतीने रचना करण्यात येईल, असे सामंत यांनी सांगितले.

### ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेणारं महाराष्ट्र हे पहिलं राज्य

परीक्षा रद्द केली त्याला पालक, विद्यार्थ्यांनी संमती दिली. परीक्षा रद्द केल्यानंतर विद्यार्थ्यांमध्ये आनंद होता; पण आम्ही पॉप्युलर होतोय म्हणून काही लोकांना पोटशूळ उठलं. आयआयटीने परीक्षा रद्द केली. दिल्ली, गोवा, मध्य प्रदेशने परीक्षा रद्द केली; पण महाराष्ट्र राज्याने परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घेतला, तेव्हा राजकारणाचं मोहोळ उठवलं गेलं. विद्यार्थ्यांसाठी सुप्रीम कोर्टाची लढाई लढावी लागली. कोर्टाने आदेश दिले परीक्षा घेण्याचे आणि आम्ही ऑनलाइन परीक्षा घेतल्या. आज मला अभिमान वाटतो, देशात ऑनलाइन पद्धतीने परीक्षा घेणारं पहिलं राज्य हे महाराष्ट्र राज्य ठरलं. आम्ही करून दाखवलं, असेही सामंत यांनी सांगितले.

Pune Edition

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

### प्राध्यापकांच्या दोनशे रिक्त जागा भरण्याची विद्यापीठाची मागणी

#### व्यवस्थापन परिषदेत ठराव मंजूर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे** : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांतील प्राध्यापकांच्या रिक्त असलेल्या दोनशे जागा तातडीने भरण्याची मागणी विद्यापीठाकडून राज्य शासनाकडे करण्यात येणार आहे. त्याबाबत शनिवारी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत ठराव करण्यात आला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे यांनी तातडीने प्राध्यापक भरती करण्याबाबतचा ठराव मांडला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्यासह अन्य सदस्यांनीही या प्रस्तावाला अनुमोदन देत ठराव मंजूर केला. त्यानुसार आता विद्यापीठाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाला प्राध्यापक भरती करण्याबाबतचे पत्र देण्याचा निर्णय घेण्यात आला.

सध्या विद्यापीठाच्या विविध विभागांमध्ये प्राध्यापकांची २०० पदे रिक्त आहेत. राज्य सरकार प्राध्यापक भरतीला परवानगी देत नसल्याने विद्यापीठाला कंत्राटी पद्धतीने प्राध्यापकांची नेमणूक करावी लागते. या प्राध्यापकांच्या वेतनाचा खर्च विद्यापीठ निधीतून करावा लागत आहे. त्यामुळे विद्यापीठ निधीवर ताण येत आहे. प्राध्यापक भरती न झाल्यास विद्यापीठातील शैक्षणिक विभाग बंद करावे लागतील. तसेच प्राध्यापकांअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्याने विद्यापीठाला आवश्यक प्राध्यापकांची पूर्तता करण्याची मागणी विद्यापीठाकडून राज्य शासनाला केली जाईल.

> प्राध्यापक भरतीसंदर्भात मांडलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मंजूर करण्यात आला. विद्यापीठ निधीतून कंत्राटी प्राध्यापक नियुक्त करावे लागत असल्याने विद्यापीठ निधीत घट होत आहे. तसेच विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळण्यासाठी प्राध्यापक भरतीसाठी प्रयत्न करण्यात येणार आहेत.
>
> - राजेश पांडे, सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

लोकसत्ता Sun, 24 October 2021 https://epaper.loksatta.com/c/63927378

### 'सीएचबी' प्राध्यापकांना थोडासा दिलासा

#### २०१८ नंतर प्रथमच मानधनात वाढ करण्याचा निर्णय

**प्रभात वृत्तसेवा**

**पुणे, दि. २३** - राज्यात घड्याळी तासिका तत्त्वावर (सीएचबी) काम करणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. आता सीएचबी प्राध्यापकांना प्रति तास ६२५ आणि ७५० रुपये प्रति तास आणि प्रात्यक्षिकांसाठी २५० रुपये आणि ३०० अशी वाढ करण्यात आली आहे. त्यामुळे सीएचबी प्राध्यापकांना दिलासा मिळाला आहे.

मानधनात वाढ करण्याची मागणी उमेदवारांकडून सातत्याने मागणी केली जात होती. या पार्श्वभूमीवर उच्च शिक्षण विभागाने सीएचबी प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा प्रस्ताव तयार करून उच्च शिक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सादर करण्यात आला होता. राज्यात ५ नोव्हेंबर २००८च्या शासन निर्णयानुसार सीएचबी प्राध्यापकांना प्रति तास ३०० रुपये, प्रात्यक्षिकासाठी १५० रुपये मानधन दिले जात होते. त्यानंतर १४ नोव्हेंबर २०१८ च्या निर्णयानुसार ५०० रुपये आणि ६०० रुपये प्रतितास, २०० रुपये प्रात्यक्षिकासाठी अशी वाढ करण्यात आली होती.

**असे असेल सुधारित मानधन**

| अभ्यासक्रमचा प्रकार | प्रति तास | प्रात्यक्षिक |
|---|---|---|
| कला, वाणिज्य व विज्ञान (पदवी) | ६२५ | २५० |
| कला, वाणिज्य व विज्ञान (पदव्युत्तर) | ७५० | ३०० |
| शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण | ७५० | ३०० |
| विधी (पदवी व पदव्युत्तर) | ७५० | ३०० |

प्रभात Sun, 24 October 2021 https://epaper.eprabhat.net/c/63930686

पुढारी

### प्राध्यापकांची भरती करण्याची मागणी

#### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ करणार २०० जागा भरण्यासाठी पत्रव्यवहार

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या वेगवेगळ्या विभागांमध्ये रिक्त असलेल्या २०० प्राध्यापकांच्या जागा तातडीने भराव्यात, अशी मागणी विद्यापीठाकडून राज्य सरकारकडे केली जाणार आहे. यासंदर्भात व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत मांडण्यात आला प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे.



विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक शनिवारी (दि. २३) पार पडली. या बैठकीत परिषदेचे सदस्य राजेश पांडे यांनी तत्काळ प्राध्यापकभरती केली जावी, असा प्रस्ताव मांडला. विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्यासह सर्व सदस्यांनी त्याला पाठिंबा दिला. आता पुढील कार्यवाही म्हणून विद्यापीठाकडून उच्च व तंत्रशिक्षण विभागाला प्राध्यापकांची भरती करण्याची मागणी करणारे पत्र पाठविण्यात येणार आहे.

राज्य सरकार प्राध्यापक भरतीला परवानगी देत नसल्याने विद्यापीठाला कंत्राटी पद्धतीने प्राध्यापकांची नेमणूक करावी लागते. या प्राध्यापकांच्या वेतनावर होणारा खर्च विद्यापीठाच्या निधीतून करावा लागत आहे. विद्यार्थ्यांचे प्राध्यापकांअभावी होणारे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी सरकारने प्राध्यापकांची भरती सुरू करणे गरजेचे असून, आवश्यक प्राध्यापकांच्या पदांची पूर्तता केली जावी, अशी मागणी विद्यापीठ प्रशासन राज्य सरकारकडे करणार आहे.

**...तर अनेक विभाग बंद पडतील**

राज्य सरकार आर्थिक टंचाई असल्याचे सांगत प्राध्यापकभरतीसाठी टाळाटाळ करीत आहे. ही दिरंगाई अशीच सुरू राहिली, तर अनेक विद्यापीठांच्या निधीवर कंत्राटी प्राध्यापकांच्या वेतनाचा ताण येणार असून, राज्यातील विद्यापीठांचे विभाग बंद पडण्याची शक्यता आहे.

> विद्यापीठ निधीतून प्राध्यापकभरती करावी लागत असल्याने याचा ताण विद्यापीठ निधीवर येत आहे. असेच चालू राहिले, तर विद्यापीठातील अनेक विभाग बंद करण्याची नामुष्की विद्यापीठावर येऊ शकते. त्यामुळे व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत प्राध्यापक भरतीचा प्रस्ताव मांडला. या प्रस्तावाला कुलगुरूंसह सर्व सदस्यांनी मान्यता दिली आहे.
>
> - **राजेश पांडे**
> सदस्य, व्यवस्थापन परिषद, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

My Pune Edition
Oct 25, 2021 Page No. 3
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**

## प्राध्यापकांना मानधन दिलासा

**₹ १५० ते ₹ २०० रुपयांची वाढ**

म. टा. प्रतिनिधी, पुणे

राज्यात तासिका तत्त्वावर महाविद्यालयांमध्ये अध्यापन करणाऱ्या प्राध्यापकांच्या मानधनात वाढ करण्याचा निर्णय राज्याच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने घेतला आहे. यासंदर्भात आदेश जाहीर करून विभागाने सुधारित दरपत्रक जाहीर केले आहे.

राज्यात असंख्य प्राध्यापक तासिका तत्त्वावर अध्यापन करीत आहेत. मानधनामध्ये वाढ करावी, अशी मागणी सातत्याने केली जात होती. काही महिन्यांपूर्वी नवप्राध्यापकांच्या संघटनांनी याबाबत आंदोलनही



केले होते. त्याची दखल घेऊन उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून तासिका तत्त्वावरील प्राध्यापकांच्या मानधनात प्रति तासिका सुमारे १५० ते २०० रुपयांची वाढ केली आहे. विभागाने जाहीर केलेल्या सुधारित दरपत्रकानुसार कला, वाणिज्य, विज्ञान या पदवी अभ्यासक्रमांना शिकवणाऱ्या प्राध्यापकांना प्रति तासिका ६२५ रुपये आणि प्रात्यक्षिकांसाठी २५० रुपये मानधन मिळणार आहे. पदव्युत्तरसाठी ७५० रुपये आणि प्रात्यक्षिकांसाठी ३०० रुपये मानधन असेल. शिक्षणशास्त्र आणि शारीरिक शिक्षण पदवी-पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी ७५० रुपये आणि प्रात्यक्षिकांसाठी ३०० रुपये मानधन मिळणार आहे. विधी शाखेच्या दोन्ही अभ्यासक्रमांसाठी हेच मानधन निश्चित करण्यात आले आहे.

विभागाअंतर्गत कनिष्ठ महाविद्यालयात काम करणाऱ्या अधिव्याख्यातांच्या मानधनातही सुधारणा करण्यात आली आहे. तेथील प्रशिक्षित अधिव्याख्यात्याला आता प्रतितास ७२ रुपयांऐवजी १५० रुपये मानधन मिळणार आहे. अप्रशिक्षित अधिव्याख्यात्याला ५४ रुपयांऐवजी १२० रुपये मानधन मिळेल. एक ऑक्टोबरपासून सुधारित मानधन लागू राहील, असे आदेशामध्ये नमूद करण्यात आले आहे.

Maharashtra Times 25.10.2021

## देशातील उद्योगांच्या सहाय्याने शिक्षणावरील खर्च वाढवण्याचा प्रयत्न

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : नव्या शिक्षण धोरणात शिक्षणावरील खर्च वाढवण्यासंदर्भात फारशी चर्चा केलेली नाही. मात्र भविष्यात देशातील उद्योग क्षेत्रांच्या सहाय्याने शिक्षण क्षेत्रावरील खर्च वाढवण्याबाबत चर्चा सुरू आहे. तसेच उद्योग आणि शिक्षण संस्थांमधील संवाद वाढवण्याचा प्रयत्न असल्याची माहिती खासदार आणि केंद्रीय संसदीय समितीचे (शिक्षण) अध्यक्ष विनय सहस्रबुद्धे यांनी सोमवारी दिली.

नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील विविध मुद्द्यांवर सहस्रबुद्धे यांनी पुण्यातील माध्यमांशी संवाद साधला. त्या वेळी ते बोलत होते. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे आदी या वेळी उपस्थित होते.

गेल्या अनेक वर्षांपासून देशातील शिक्षणावर सकल राष्ट्रीय उत्पन्नाच्या (जीडीपी) सहा टक्के खर्च करण्यासंदर्भात चर्चा सुरू आहे. केंद्रात आलेल्या प्रत्येक सरकारने याबद्दल आश्वासने देऊनही शिक्षणावर जीडीपीच्या तीन टक्केच खर्च केला जात असल्याचे दिसून आले आहे. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामध्येही याबद्दल फारशी चर्चा करण्यात आलेली नाही. या पार्श्वभूमीवर डॉ. सहस्रबुद्धे म्हणाले, की संसदीय शिक्षण समितीमध्ये शिक्षणावरील खर्चाच्या विषयाबाबत पुरेसा ऊहापोह झाला आहे. उद्योग क्षेत्रांना शैक्षणिक संस्थांशी जोडल्यास त्या द्वारे निधी प्राप्त करून शिक्षणाचा दर्जा उंचावणे शक्य आहे. देशाच्या वेगवेगळ्या भागातील उद्योग क्षेत्र शैक्षणिक संस्थांशी जोडण्याबाबत केंद्रीय पातळीवर चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

देशाच्या विविध भागांतील प्रादेशिक इतिहास विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमात आणण्याचा प्रयत्न आहे. पाठ्यपुस्तकांद्वारे भारतीय इतिहासाच्या वेगवेगळ्या टप्प्यांना न्याय देऊन विद्यार्थ्यांसमोर खरा इतिहास येणे गरजेचे आहे. प्रादेशिक इतिहासातील दुर्लक्षित महापुरूष विद्यार्थ्यांसमोर आणण्याचा उद्देश असल्याचे डॉ. सहस्रबुद्धे यांनी नमूद केले.

### अफगाणी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती

भारतात शिकत असलेल्य अफगाणी विद्यार्थ्यांना आयसीसीआरकडून शिष्यवृत्ती देण्यात आली आहे. तसे नव्याने शिक्षणासाठी भारतात येणाऱ्या अफगाणी विद्यार्थ्यांनाही शिष्यवृत्ती दिली जाईल, असे सहस्रबुद्धे यांनी सांगितले.

लोकसत्ता Tue, 26 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63968337

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

# अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत शेवटची विशेष एफसीएफएस फेरी

### प्रवेशासाठी ३१ ऑक्टोबरची मुदत

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर आणि अमरावती महापालिका क्षेत्रात सुरू असलेल्या अकरावीच्या प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी शेवटची संधी म्हणून विशेष फेरी घेण्यात येणार आहे. त्या अंतर्गत ३१ ऑक्टोबर ही प्रवेशासाठीची अंतिम मुदत देण्यात आली आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेअंतर्गत आतापर्यंत तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) या फेऱ्या झाल्या आहेत. बहुतांश विद्यार्थ्यांनी प्रवेश घेऊन महाविद्यालयात प्रत्यक्ष वर्गही सुरू झाले आहेत. मात्र काही विद्यार्थ्यांनी अद्यापही प्रवेश अर्ज भरला नसल्याचे निदर्शनास आले आहे. तसेच राज्य मंडळाने २० ऑक्टोबरला पुरवणी परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. त्यामुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहू नयेत यासाठी प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य (एफसीएफएस) ही विशेष फेरी राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ही फेरी ३१ ऑक्टोबरअखेर पूर्ण होईल, अशी माहिती माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक दत्तात्रय जगताप यांनी परिपत्रकाद्वारे दिली.

विशेष प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरीत दहावी उत्तीर्ण सर्व विद्यार्थी, एटीकेटी सवलत प्राप्त सहभागी होऊ शकतात. अकरावीला प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाइन अर्ज भरणे, पडताळणी करणे, प्रवेश जाहीर झाल्यावर प्रवेश निश्चित करणे आदी प्रक्रिया वेळेत पूर्ण होईल याची दक्षता शाळा-कनिष्ठ महाविद्यालयांनी घ्यावी, असे स्पष्ट करण्यात आले आहे.

लोकसत्ता Mon, 25 October 2021 https://epaper.loksatta.com/c/6

लोकमत

अकरावीच्या ४० हजार जागा रिक्त; ७२ हजार विद्यार्थ्यांनीच घेतला प्रवेश

# ...तर कनिष्ठ महाविद्यालयांना लावावे लागणार टाळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** अकरावी प्रवेशासाठी राबविण्यात आलेल्या ऑनलाईन प्रवेश फेरीतून आतापर्यंत ७२ हजार ७१० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला असून, तब्बल ४० हजार जागा रिक्त राहिल्या आहेत. त्यामुळे नव्याने सुरू झालेल्या आणि विद्यार्थ्यांनी नापसंती दर्शविलेल्या काही कनिष्ठ महाविद्यालयांना टाळे लागण्याची शक्यता आहे.

राज्याच्या शालेय शिक्षण विभागातर्फे पुणे व पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रातील कनिष्ठ महाविद्यालयातील अकरावी प्रवेशासाठी ऑनलाईन प्रवेश प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आली. प्रवेशासाठी तीन नियमित फेऱ्या, एक विशेष फेरी घेण्यात आली. तसेच प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य फेरी घेऊन या फेरीस दोन दिवस मुदतवाढ देण्यात आली होती.त्यानुसार विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने प्रवेश घेण्यास २१ ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली होती. मात्र, उपलब्ध जागांपैकी केवळ ७२ हजार ७१० जागांवरच विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. इयत्ता दहावीचा निकाल ९९ टक्क्यांपेक्षा जास्त लागल्याने यंदा अकरावी प्रवेशाचा कट ऑफ वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात होती. तसेच प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची चढाओढ होईल, अशी चर्चा होती. मात्र, कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पुणे जिल्ह्याबाहेरील विद्यार्थ्यांनी पुणे शहरातील महाविद्यालयांत प्रवेश घेण्याऐवजी आपल्याच घराजवळील महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यामुळे पुणे व पिंपरी चिंचवड परिसरातील ४० हजारांहून अधिक जागा रिक्त राहिल्या.

### पुणे-पिंपरी चिंचवड परिसरातील अकरावी प्रवेशाची आकडेवारी




३१७ महाविद्यालयांची संख्या

| | |
|---|---|
| एकूण प्रवेश क्षमता | १,१३,३२५ |
| नोंदणी करणारे विद्यार्थी | ८९,९८९ |
| अर्ज लॉक करणारे विद्यार्थी | ८२,९५६ |
| व्हेरिफाय केलेल्या अर्जांची संख्या | ८२,७७७ |
| प्रत्यक्ष झालेले प्रवेश | ७२,७१० |
| एकूण रिक्त जागा | ४०,६१५ |

Hello Pune
Page No. 1 Oct 25, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Education

**लोकमत**



# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतील शिक्षणावर भर

## विनय सहस्रबुद्धे : शैक्षणिक धोरणावर चर्चा

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** भाषेचा आपल्या भावविश्वाशी आणि चिंतानाशी थेट संबंध असतो. त्यामुळेच नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात मातृभाषेतील शिक्षणावर भर देण्यात आला आहे. तसेच स्वदेशी, स्वभाषा, स्वभाव व स्वधर्म यांचा अंतर्भाव करून हे धोरण तयार करण्यात आले आहे, असे खासदार व भारतीय सांस्कृतिक संबंध परिषदेचे अध्यक्ष विनय सहस्रबुद्धे यांनी सांगितले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ नवे शैक्षणिक धोरण २०२० अंमलबजावणी समिती', विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्यावतीने आयोजित विद्यापीठस्तरीय खुल्या निबंध स्पर्धेच्या उद्‌घाटन प्रसंगी सहस्त्रबुद्धे बोलत होते. यावेळी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, अधिष्ठाता डॉ. मनोहर चासकर, डॉ. पराग काळकर, डॉ. संजीव सोनवणे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेश पांडे, डॉ. संजय चाकणे, डॉ. सुधाकर जाधवर, अधिसभा सदस्य राजीव साबडे, राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. संतोष परचुरे, आदी उपस्थित होते.

### नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न

डॉ. करमळकर यांनी राष्ट्रीय शिक्षणाविषयी संकल्पना मांडली. तसेच पुण्यात राष्ट्रीय शिक्षणाची मुहूर्तमेढ दीडशे-दोनशे वर्षांपूर्वी मांडली गेली. या भारतीय ठेव्याची नव्याने मांडणी करण्याचा प्रयत्न आम्ही युनिर्व्हसलायझेशन ऑफ ट्रॅडिशनल इंडियन नॉलेज सिस्टीम (युटिक्स) या प्रकल्पाच्या माध्यमातून करत असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

राजेश पांडे म्हणाले, शैक्षणिक धोरणाच्या प्रक्रियेत लोकसहभाग वाढवा यासाठी अनेक वेगवेगळे प्रयोग करण्यात आले. निबंध स्पर्धेच्या माध्यमातून तीन ते चार हजार नागरिक यामध्ये सहभागी झाले आहेत.

विनय सहस्त्रबुद्धे म्हणाले, शिक्षणाच्या बाबतीत देशाला वसाहतवादी मानसिकतेतून बाहेर आणून देशाचा मातीचा सुगंध असणाऱ्या नव्या धोरणाची आवश्यकता होती. हा मूलभूत बदल नव्या शैक्षणिक धोरणात स्वीकारण्यात आला आहे. मातृभाषेतील शिक्षणावर यामध्ये भर देण्यात आला आहे.

Hello Pune
Page No. 8 Oct 27, 2021
Powered by: erelego.com

**लोकमत**

# सर्वस्पर्शी शैक्षणिक धोरण




नवीन शैक्षणिक धोरण अत्यंत आव्हानात्मक, आश्वासक व तेवढेच लवचिक असून शिक्षणाचे भारतीयीकरण आणि मातृभाषेतून शिक्षण हा त्याचा गाभा आहे. इंग्रज आल्यानंतर एकूणच शिक्षणाचे कारकून तयार करण्याचे 'मॅकॉले काकां'चे नोकरशाहीचे धोरण कारणीभूत ठरले. त्यामुळे आपण आजही नोकरशाहीच्या मानसिकतेतून बाहेर आलेलो नाही. मात्र, पुढील दोन वर्षांत देशभर या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होईल. तत्पूर्वी अंमलबजावणीचे टप्पे, येणाऱ्या संभाव्य अडचणी आणि संस्था, शाळा, महाविद्यालये, विद्यार्थ्यांनी करावयाच्या गोष्टी आणि शासनाचा त्यातील सहभाग या तपशिलाचा विचार करायला हवा.

शिक्षण हा केंद्र व राज्य या दोन्हींचा संयुक्त विषय आहे. त्यामुळे केवळ केंद्राने धोरण घोषित करून त्याची अंमलबजावणी होणार नाही. प्रत्येक राज्य शासनाने आपल्या राज्यात शैक्षणिक धोरण लागू करण्यासाठी योग्य ते कायदे पास केले पाहिजे. तसेच शिक्षण खात्यामध्ये आवश्यक ते बदल केले पाहिजेत. उदाहरणदाखल सांगायचे झाले तर नवीन शैक्षणिक धोरणानुसार दहावी व बारावीच्या बोर्ड परीक्षा आता होणार नाहीत. त्याचे स्वरूप खूप बदललेले असेल. त्यानुसार बोर्डाची पुनर्रचना करावी लागेल. प्राथमिक शिक्षण हे मातृभाषेतच दिले पाहिजे, असे नवीन धोरणात स्पष्ट केले आहे. मात्र, सद्य:स्थितीत देशभरात मोठ्या संख्येने इंग्रजी माध्यमांच्या पूर्व प्राथमिक व प्राथमिक शाळा सुरू आहेत. निश्चितच इंग्रजी ही सर्व मुलांची मातृभाषा नाही. त्यामुळे या शाळाचे भवितव्य काय असेल? आज मराठी शाळेत शिकणाऱ्या एखाद्या मुलाची मातृभाषा कन्नड, गुजराती, तमिळ असेल तर त्याच्या शिक्षणाची पर्यायी व्यवस्था काय करता येईल? याचे स्पष्ट निर्देश नवीन शैक्षणिक धोरणात नाहीत. मात्र, कला, क्रीडा व विविध सांस्कृतिक उपक्रमांना स्वतंत्र सन्मानाचे मोठे स्थान दिले आहे. ही या धोरणातील एक चांगली गोष्ट आहे. परंतु, त्यामुळे सर्व शाळांना संबंधित विषयांचे शिक्षक उपलब्ध होतील, अशी व्यवस्था केली पाहिजे.

नवीन शैक्षणिक धोरणानुसार उच्च शिक्षणात अनेक मोठे बदल सुचविलेले आहेत. संपूर्ण देशातील सुमारे ४० हजार महाविद्यालये बंद करून सक्षम अशी केवळ पंधरा हजार महाविद्यालये उच्च शिक्षणासाठी चालू ठेवण्याचा केंद्र शासनाचा विचार आहे. या महाविद्यालयांची निवड करणे, त्याचबरोबर या महाविद्यालयांना प्रभावी संशोधन प्रकल्प करता यावेत यासाठी सुविधा उपलब्ध करून देणे, ही फार मोठी जबाबदारी शासनावर असणार आहे. विद्यापीठ व महाविद्यालये यांच्यातील सीमारेषा पुसून टाकण्यात येणार आहेत. प्रत्येक महाविद्यालय एक तर केवळ उच्च शिक्षण देण्याचे काम करणार आहे किंवा उच्च शिक्षण व संशोधन अशी दोन्ही कामे करू शकेल; अन्यथा केवळ संशोधनावर लक्ष केंद्रित करणार आहे. त्यातूनच महाविद्यालयात शिकविणाऱ्या प्राध्यापकांची क्षमता निश्चितच वाढेल व संशोधनाचीही गुणवत्ता वाढेल, यात शंका नाही.

राज्य सरकारने धोरण अजून निश्चित केलेले नाहीत. तसेच यासंबंधातील कायदे केलेले नाहीत. शिक्षण विभागात आवश्यक ते बदल केलेले नाहीत. त्यामुळे एकाएकी नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी होऊ शकणार नाही. त्यामुळे प्रथम संस्थाचालक, शाळा-महाविद्यालयाचे प्रमुख पदाधिकारी यांच्या माध्यमातून शैक्षणिक धोरण खालपर्यंत झिरपणार आहे हे शासनाला समजावून सांगावे लागेल.

भारतील भाषा साहित्याच्या दृष्टीने समृद्ध आहेत. संस्कृत वाङ्मयात काव्य, कादंबऱ्या, विज्ञान, नाटके व भारताच्या संस्कृतीचे जीवनाचे दर्शन घडविणारे रामायण, महाभारतासारखे ग्रंथ, वेद, उपनिषद, गीता यांसारखे प्रगत तत्त्वज्ञान सामावलेले आहे. भारतीय कला, भारतीय साहित्यावर संस्कृत भाषेचा मोठा प्रभाव आहे. संस्कृत ही भारतातील ज्ञानभाषा आहे. आयुर्वेद ही पूर्वीची चिकित्सा पद्धती, योग ही शारीरिक व मानसिक आरोग्य टिकवून ठेवण्याची पद्धती यांचा समावेश नव्या धोरणात असावा, अशी शिफारस करण्यात आलेली आहे.

शिक्षण संकुल ही अत्यंत महत्त्वाची संकल्पना नवीन शैक्षणिक धोरणात आहे. या शिक्षक संकुलाच्या केंद्रस्थानी सक्षम शाळा अथवा महाविद्यालये असतील. या संस्थेभोवती असलेल्या दहा ते पंधरा शाळांना किंवा महाविद्यालयांना सक्षम बनवणे, त्यांना आवश्यक त्या तांत्रिक सुविधा उपलब्ध करून देणे, तज्ज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन उपलब्ध करून देणे, ही संकुलातील प्रमुख शाळा, महाविद्यालयांची जबाबदारी असणार आहे.

**डॉ. संजय चाकणे,** व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ.

Hello Pune
Page No. 7 Oct 28, 2021
Powered by: erelego.com

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Education**

पुढारी

# परीक्षेचे धोरण ठरविताना विद्यार्थ्यांनाही सोबत घ्यावे

## 'नव्या शैक्षणिक धोरणातील परीक्षा व मूल्यमापन सुधारणा'वरील चर्चासत्रात डॉ. संजय धांडे यांचे मत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

**आयआयटीसारख्या संस्थांमध्ये प्रत्येक समितीमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असतो. त्यांचे मत, सूचना ऐकल्या जातात. त्याचप्रमाणे सर्व विद्यापीठांनी विद्यार्थ्यांना सहभागी करावे, असे मत विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी सदस्य व आयआयटी कानपूरचे माजी संचालक डॉ. संजय धांडे यांनी व्यक्त केले.**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मूल्यमापन पद्धतीबद्दल आयोजित चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. महेश काकडे, परीक्षा सुधार समितीचे अध्यक्ष राजेश पांडे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी उपाध्यक्ष डॉ. भूषण पटवर्धन यांनीही व्हिडीओच्या माध्यमातून आपले विचार व्यक्त केले.

डॉ. उमराणी म्हणाले, "परीक्षेत प्रश्न कसे विचारावेत हे शास्त्र असते. आपण परीक्षेची आवड निर्माण करण्यात कमी पडलो आहोत. या नव्या शैक्षणिक धोरणाच्यानिमित्ताने ही कमतरता आपण भरून काढू शकू." यावेळी डॉ. प्रफुल्ल पवार आणि डॉ. महेश काकडे यांनीही विचार व्यक्त केले.

परीक्षा घेण्याबरोबरच विद्यार्थ्यांचे मूल्यांकन ही खरोखरच महत्त्वाची बाब असून, यावर विचारमंथन करण्याची व गंभीर चर्चा करण्याची गरज आहे. या चर्चासत्रातून एक चांगली मूल्यमापन पद्धती समोर येईल, अशी आशा आहे.
- प्रा. डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### चर्चासत्रातील ठळक बाबी

- जे शिक्षक शिकवतात विद्यार्थ्यांचे मूल्यमापनही त्यांनीच करावे
- सार्वजनिक विद्यापीठांनी प्रश्न विचारण्याचे कौशल्य असणारे हजार तज्ज्ञ तयार करावेत.
- शिक्षण जशी निरंतर प्रक्रिया आहे, तसेच मूल्यमापनही निरंतर असावे
- एकाच वेळी लाखो विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याऐवजी टप्प्याटप्प्याने समान काठिण्यपातळीची परीक्षा असावी.
- शैक्षणिक संस्थांचे विकेंद्रीकरण व्हावे
- शिक्षणात ओपन बुक एक्झाम, ॲडॉप्टिव्ह एक्झाम, टेक होम एक्झाम यांसारख्या परीक्षा व मूल्यमापनाचे प्रयोग व्हावेत.



नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातील मूल्यमापन पद्धतीबद्दल आयोजित चर्चासत्रावेळी डॉ. संजय धांडे यांचा सन्मान करताना कुलगुरू डॉ. नितीन करमळकर व उपस्थित मान्यवर.

### संवादयात्रेच्या माध्यमातून परीक्षा सुधार : राजेश पांडे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा सुधार समितीच्या वतीने पुढील तीन महिन्यांत १०० महाविद्यालयांच्या प्राचार्यांना भेटी देऊन एक संवादयात्रा काढण्यात येणार आहे. या चर्चेच्या माध्यमातून पुढे आलेल्या मुद्द्यावर एक अहवालही सादर करण्यात येणार असल्याचे परीक्षा सुधारणा समितीचे अध्यक्ष राजेश पांडे यांनी सांगितले.

My Pune Edition
Oct 28, 2021 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# News Paper Clippings During October 2021

## Section: Education



# परीक्षा 'ऑफलाइन'?

## लशीचे डोस पूर्ण झाल्याने विद्यापीठ घेणार निर्णय

म. टा. प्रतिनिधी, पुणे

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या आगामी सत्र परीक्षा 'ऑफलाइन' पद्धतीने होण्याची शक्यता असून, येत्या काही दिवसांत त्यावर शिक्कामोर्तब होणार आहे. त्यामुळे 'ऑनलाइन' परीक्षेत उत्तीर्ण होऊन भरमसाठ गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना लेखी परीक्षेसाठी चांगला अभ्यास करावा लागणार आहे. दिवाळीनंतर सुरक्षित नियमांचे पालन करून पूर्ण क्षमतेने महाविद्यालयांमध्ये ऑफलाइन वर्ग सुरू करण्यात येणार असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाच्या सूत्रांनी दिली आहे.

राज्यात गेल्या दीड वर्षापासून करोनाचा प्रादुर्भाव असल्याने, विद्यापीठे आणि महाविद्यालये ऑफलाइन शिक्षणासाठी बंद होती. या काळात विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये ऑनलाइन पद्धतीने शिक्षण सुरू होते. त्यामुळे या कालावधीत परीक्षादेखील ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आल्या. मात्र, गेल्या काही दिवसांत राज्यात करोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्याने, विद्यापीठे आणि महाविद्यालये ऑफलाइन पद्धतीने सुरू झाली आहेत. या पार्श्वभूमीवर राज्यातील विद्यापीठांनी ऑफलाइन परीक्षा घेण्याबाबत चाचपणी सुरू केली आहे. पुणे विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनीही सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्याबाबत बैठकीत नुकतीच चर्चा केली. त्यानुसार विद्यापीठाच्या सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्यावर भर देण्याबाबत एकमत झाले आहे. दिवाळीनंतर परीक्षा मंडळाची बैठक होणार असून, त्यामध्ये ऑफलाइन परीक्षेवर शिक्कामोर्तब होणार आहे.

> "पुणे विद्यापीठाशी संलग्न महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या ८५ टक्क्यांपेक्षा अधिक विद्यार्थ्यांना लशीचे दोन्ही डोस देण्यात आले आहेत. साधारण ३५ हजार विद्यार्थ्यांना लशीचा एक डोस झाला आहे. या विद्यार्थ्यांना येत्या काही दिवसांत दुसरा डोस पूर्ण होईल. त्यामुळे दिवाळीनंतर सुरक्षित वावराचे नियम पाळून महाविद्यालये पूर्ण क्षमतेने सुरू करता येऊ शकतात. त्याचप्रमाणे 'ऑफलाइन' परीक्षाही होतील. त्याचा अंतिम निर्णय करोनास्थितीचा विचार करून, परीक्षा मंडळाच्या बैठकीत होईल.
>
> - डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

### उदय सामंत यांचेही सूतोवाच

राज्याचे उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत काही दिवसांपूर्वी पुणे दौऱ्यावर आले होते. त्या वेळी सामंत यांनी विद्यापीठांनी ऑफलाइन परीक्षा घेण्यावर अधिकाधिक भर द्यावा, असे सूतोवाच केले होते. त्यानुसार पुणे विद्यापीठाने सत्र परीक्षांचे नियोजन करण्याची तयारी सुरू केली आहे. दरम्यान, सत्र परीक्षा ऑफलाइन घेण्याबाबत उच्च व तंत्रशिक्षणमंत्री उदय सामंत आणि पुणे विद्यापीठाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांचे एकमत होताना दिसत आहे.

### मटा भूमिका

### विद्यार्थीहितासाठी तातडीने निर्णय घ्या

करोनाकाळात सगळे शिक्षणच ऑनलाइन झाले. गेल्या वर्षी तर सर्व परीक्षा 'ऑनलाइन' स्वरूपातच झाल्या आणि एकूण सर्वांनाच पुढील वर्षात प्रवेश द्या, अशाच सरकारच्या सूचना असल्याने गुणांची खैरात वाटली गेली. करोनाचा संसर्ग कमी होत असल्याने आता सर्व व्यवहार सुरळीत सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांच्या परीक्षा पुन्हा पूर्वीप्रमाणे 'ऑफलाइन' पद्धतीने घेण्याबाबत सर्वसहमती होताना दिसत आहे. दिवाळीनंतर याचा सर्वंकष विचार करून विद्यार्थी हितासाठी या निर्णयावर शिक्कामोर्तब करावे आणि विद्यार्थ्यांचे मूल्यमापन ऑफलाइन परीक्षांद्वारेच केले जावे.

Maharashtra Times 29.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Research**

लोकमत

मुंबईवरून ईलचे नामकरण 'रक्थमिच्तिस मुंबा'

## तेजस ठाकरे यांनी शोधला मत्स्य प्रजातीतील ईल

**मुंबई** : गोड्या पाण्याच्या तळाशी, भूगर्भात अधिवास असणाऱ्या मत्स्य कुळातील 'ईल' या प्रजातीतील नवीन माशाचा शोध मुंबईतून लावण्यात आला आहे. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे धाकटे सुपुत्र तेजस आणि त्यांच्या सहकारी मित्रांनी ही प्रजाती प्रकाशात आणली आहे. ग्रामदेवता मुंबादेवी आणि मुंबईवरून या ईलचे नामकरण 'रक्थमिच्तिस मुंबा' असे करण्यात आले आहे.

तेजस ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांना २०१९ साली जोगेश्वरीच्या अंध शाळेतील एका छोट्या विहिरीत ही प्रजाती सापडली होती. त्यानंतर याबाबत संशोधन करण्यात आले. 'अ‍ॅक्वा इंटरनॅशनल जर्नल ऑफ इचिथोलॉजी' या संशोधनपत्रिकेमध्ये २१ सप्टेंबर रोजी या शोधाचे वृत्त प्रकाशित झाले.



मी शोधलेल्या प्रजातींपैकी 'रक्थमिच्तिस मुंबा' ही माझ्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. भूगर्भातील अशा प्रजाती आणि त्यांच्या अधिवासावर फार कमी अभ्यास झाला आहे.

**- तेजस ठाकरे**

प्रवीणराज जयसिम्हा, तेजस ठाकरे, अनिल मोहोपात्रा आणि अन्नम पवनकुमार यांनी या प्रजातीचा शोध लावला आहे. 'रक्थमिच्तिस मुंबा' ही भारतात आढळणाऱ्या 'रक्थमिच्तिस' कुळातील पाचवी प्रजाती आहे. मुंबईची मूळ देवता मुंबादेवीवरून या शहराला मुंबई हे नाव पडल्याची पार्श्वभूमी लक्षात घेऊनच या ईलचे नामकरण मुंबा असे करण्यात आले.

### ईलची वैशिष्ट्ये

- भूगर्भात अधिवास असलेली ही प्रजाती अंध आहे. उत्तर पश्चिम घाट परिसरातून शोधण्यात आलेली ही पहिली पूर्णपणे अंध अशी भूगर्भातील गोड्या पाण्यातील मत्स्यप्रजात आहे.
- या नव्या प्रजातीची निश्चिती आकारशास्त्र, गुणसूत्रांच्या तपासणीनंतर करण्यात आली.
- अंधत्व, पुढच्या दिशेला असलेल्या जबड्यांमधील समानता, श्वसनेंद्रियांचा अर्धचंद्राकार आकार यामुळे हा मासा 'रक्थमिच्तिस' कुळात सापडणाऱ्या इतर प्रजातींपेक्षा वेगळा असल्याचे लक्षात आले.
- 'रक्थमिच्तिस मुंबा' ही प्रजात अंध असल्याने ती श्वास आणि शरीरातील संवेदनांच्या आधारे आपले भक्ष्य शोधून जिवंत राहते.
- तिचा आकार ३२ सें.मीटर असून ती गुलाबी रंगाची आहे.



Pune Main
Page No. 5 Oct 01, 2021
Powered by: erelego.com

---

तापमान आणि स्पर्शातून निर्माण होणाऱ्या संवेदकांवर संशोधन

## अमेरिकी वैज्ञानिकांना वैद्यकशास्त्राचे नोबेल

वृत्तसंस्था, स्टॉकहोम

**अमेरिकेचे वैज्ञानिक** डेव्हिड ज्युलियस आणि अर्डेम पॅटापॉशियन यांना २०२१चा नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. यंदाचा नोबेल पुरस्कार करोना लस शोधणाऱ्या वैज्ञानिकांना दिला जाईल, असे अंदाज वर्तवले गेले होते.

ज्युलियस आणि पॅटापॉशियन यांनी तापमान, स्पर्श यांच्या संवेदना मेंदूत कशा निर्माण होतात याचा शोध संवेदक संकल्पनेच्या माध्यमातून घेतला आहे. त्यातून नवी वेदनाशामके तयार करण्यासाठी मदत होणार आहे, असे नोबेल पुरस्कार निवड समितीने म्हटले आहे. रॉयल स्वीडिश विज्ञान अकादमीच्या वतीने १.१५ दशलक्ष डॉलर्सचे नोबेल पुरस्कार दरवर्षी दिले जातात. उष्णता, थंडी किंवा यांत्रिक बल यांच्यातून मेंदूपर्यंत संवेदना कशा जातात आणि त्यांचे विश्लेषण कसे केले जाते यावर त्यांनी संशोधन केले. त्याचा फायदा वेदनांपासून मुक्ती देणारी औषधे तयार करण्यासाठी होणार आहे. आपली चेतासंस्था ही उष्णता, थंडी आणि यांत्रिक बलास कसा प्रतिसाद देते याचे स्पष्टीकरण ज्युलियस आणि पॅटापॉशियन यांनी केले आहे.

यंदा करोना विषाणूची साथ असल्याने त्यावर लस विकसित करणाऱ्या वैज्ञानिकांना नोबेल मिळेल अशी अटकळ होती. यापुढील काही वर्षांत कदाचित या लशीसाठी दिले जाऊ शकेल. गेल्या वर्षी *(पान २ वर)*

### वैज्ञानिकांचा परिचय



**अर्डेम पॅटापॉशियन** : जन्म १९६७, आईवडील आर्मेनियन (जन्म-लेबनॉन) नंतर लॉस एंजलिसला आले. कॅलिफोर्नियात ला जोला येथे स्क्रीप्स रीसर्च इन्स्टिट्यूटमध्ये प्राध्यापक, त्याआधी कॅलिफोर्निया विद्यापीठात सॅनफ्रान्सिस्को येथे व पॅसाडेनातील कॅलिफोर्निया ऑफ टेक्नॉलॉजी संस्थेत संशोधन.



**डेव्हिड ज्युलियस** : जन्म न्यूयॉर्क, वय ६५. सॅनफ्रान्सिस्कोतील कॅलिफोर्निया विद्यापीठात प्राध्यापक, त्याआधी न्यूयॉर्कच्या कोलंबिया विद्यापीठात संशोधन.

**उपयोग काय?** आपली चेतासंस्था उष्णता, थंडी आणि यांत्रिक बलास कसा प्रतिसाद देते याचे स्पष्टीकरण ज्युलियस आणि पॅटापॉशियन यांनी केले आहे. त्याचा उपयोग वेदनांपासून मुक्ती देणारी नवी औषधे तयार करण्यासाठी होणार आहे.

epaper.loksatta.com

लोकसत्ता Tue, 05 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63542212

---

## अमेरिकी वैज्ञानिकांना वैद्यकशास्त्राचे नोबेल

*(पान १ वरून)*

अमेरिकेचे हार्वे अल्टर आणि चार्ल्स राइस तसेच ब्रिटनचे मायकेल हॉटन यांना हेपॅटाटिस सी विषाणूच्या शोधासाठी वैद्यकशास्त्रातील नोबेल देण्यात आले होते.

**संशोधन काय?**

आपले शरीर उष्णता, थंडी आणि स्पर्श यांना कसा प्रतिसाद देते यावर आपले प्रतिकूल परिस्थितीत टिकून राहणे अवलंबून असते. आपल्या दैनंदिन आयुष्यात आपल्याला या संवेदना जाणवत असतात, पण त्याकडे आपण कधी लक्ष देत नाही, कारण ते आपोआप घडत असते. पण आता चेतापेशींना तापमान आणि दाब यांचे ज्ञान कशा, कोणत्या प्रक्रियेतून होते हे उलगडण्यात या दोन वैज्ञानिकांना यश आले आहे. डेव्हिड ज्युलियस यांनी तिखटातील कॅपसायसिन या घटकाचा वापर करून चेतातंतूतील उष्णतेला प्रतिसाद देणारा संवेदक शोधून काढला. अर्डेम पॅटापॉशियन यांनी दाब संवेदक पेशींचा वापर करून त्वचा व अंतर्गत अवयव बाह्य यांत्रिक बलास किंवा उत्तेजनेस कसा प्रतिसाद देतात ते शोधून काढले.

लोकसत्ता Tue, 05 October 2021
https://epaper.loksatta.com/c/6

## *News Paper Clippings During October 2021*

**Section: Research**

# हवामानाच्या प्रारूपीकरणासाठी तिघांना भौतिकशास्त्राचे नोबेल

## जपान, जर्मनी, इटलीच्या वैज्ञानिकांचा समावेश

**वृत्तसंस्था, स्टॉकहोम**

**जागतिक तापमानवाढीतील** बदलांचा अंदाज वर्तवण्यासाठी पृथ्वीच्या हवामानाचे प्रारूपीकरण करण्याच्या कामगिरीसाठी यंदा जपान, जर्मनी व इटली या देशांच्या तीन वैज्ञानिकांना भौतिकशास्त्राचे नोबेल जाहीर करण्यात आले आहे. स्युकुरो मनाबे (वय ९०), क्लॉस हॅझलम्न (वय ८९) यांनी जागतिक तपमानवाढीच्या प्रारूपीकरणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्याचबरोबर गिओरगिओ पारिसी (वय ७३) यांनी भौतिक प्रणालींमधील आंतरिक बदल हे आण्विक पातळीपासून ग्रहीय पातळीपर्यंत ओळखण्यासाठी संशोधन केले आहे.

नोबेल समितीने म्हटले आहे की, मनाबे व हॅझलम्न यांनी पृथ्वीच्या हवामानविषयक ज्ञानाचा पाया घातला व त्याचा मानवावर कसा परिणाम होत आहे, याचा अभ्यास केला. १९६० मध्ये मनाबे यांनी असे दाखवून दिले की, वातावरणात वाढणारे कार्बन डायॉक्साइडचे प्रमाण हे जागतिक तापमानवाढीस कारणीभूत आहे. त्यातून सध्याच्या हवामान व तापमान प्रारूपांचा जन्म झाला. त्यानंतर दशकभराने हॅझलम्न यांनी हवामान व वातावरण यांची सांगड घालणारे प्रारूप तयार केले त्यातून हवामान प्रारूपांच्या मदतीने वातावरणीय बदलांचे स्वरूप व त्याचा अंदाज करणे शक्य झाले. मानवी कृतींचा हवामानावर होणारा परिणाम व त्याची चिन्हे काय आहेत, याचा शोध त्यांनी घेतला. पारिसी यांनी गणित, जीवशास्त्र, मेंदूशास्त्र, मशीन लर्निंग यांसारख्या गुंतागुंतीच्या प्रणालीतील आंतरसंबंध स्पष्ट करणारी गणिती व भौतिकी प्रारूपे निश्चित केली.

पुरस्काराच्या घोषणेनंतर पारिसी यांनी सांगितले की, हवामान बदल व तपमानवाढीचा धोका कायम असून आपण ते रोखण्यासाठी ठोस निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. आगामी पिढ्यांचे भवितव्य सुरक्षित करण्यासाठी आपण आजच हे केले पाहिजे.



सुकुरो मनाबे – जन्म १९३१, शिंगू, जपान. पीएडी टोक्यो विद्यापीठ (१९५७), अमेरिकेतील प्रिन्स्टन विद्यापीठात वरिष्ठ हवामान तज्ज्ञ

क्लॉस हॅझलमन – जन्म १९३१ हॅम्बर्ग, जर्मनी, पीएचडी, गोटिंगेन विद्यापीठ (जर्मनी– १९५७), मॅक्स प्लांक हवामानशास्त्र संस्थेत प्राध्यापक.

गिओरगिओ पारिसी – जन्म १९४८, रोम, इटली. पीएचडी सॅपिएन्झा विद्यापीठ ( रोम – इटली, १९७०), इटलीतील रोम येथे सॅपिएन्झा विद्यापीठात प्राध्यापक

लोकसत्ता Wed, 06 October 2021
https://epaper.loksatta.com/c/63576244

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Research**

# शास्त्रज्ञांनी शोधली कापसाची नवी जात

**नवी दिल्ली, दि. ५ -** इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीच्या गुवाहाटी शाखेने एका वेगळ्या प्रकारच्या कापसाच्या जातीचा शोध लावला आहे. हा पाण्याचे शोषण न करता तेलाचे शोषण करणारा आहे. त्यामुळे समुद्रात जेव्हा तेल सांडते तेव्हा हा कापूस उपयुक्त ठरणार आहे.




समुद्रात किंवा नद्यांमध्ये होणारी कोणत्याही प्रकारची तेलगळती हानिकारक असते. मिसळलेले तेल बाजूला करणे अतिशय कष्टाचे काम असते. पण आता आयआयटी गुवाहाटीच्या संशोधकांनी दिलेल्या माहितीप्रमाणे या कापसाच्या नवीन जातीमध्ये फक्त तेलच शोषले जात असल्यामुळे पाण्यात मिसळले तेल बाजूला करणे शक्य होणार आहे. साक्षी ही नवीन जात विकसित करणे अतिशय स्वस्त असून ते रिसायकल करणेही शक्य आहे. अतिशय पातळ किंवा जाडसर तेल शोधण्याचे कामही हा कापूस करू शकतो.

चुकीच्या कालावधीमध्ये जर चुकून तेलगळती झाली तर या कापसाचा वापर करून पाण्यापासून तेल वेगळे करणे शक्य होणार आहे. आयटी गुवाहाटीचे प्रोफेसर शाम विश्वास यांनी दिलेल्या माहितीप्रमाणे भारतासारख्या मोठ्या देशामध्ये नेहमीच समुद्रमार्गे तेलाची वाहतूक केली जाते आणि या कालावधीमध्ये तेलगळती होण्याचे प्रमाण नेहमीच जास्त असते. त्याचा मोठा फटका समुद्रातील जीवां बसतो.

समुद्राच्या आसपास असणाऱ्य पक्ष्यांना जर या तेलाचा त्रास झाला त त्यांना उडता येणेही शक्य होत नाही. त्य शिवाय मासे आणि इतर जीवांनाही य तेलाचा त्रास होतो आणि समुद्राच्या किंवा नदीच्या पाण्यात पसरलेले तेल सहस व्यवस्थितपणे बाजूला करणे शक्य नसते पण आता या कापसाचा वापर करून ही प्रक्रिया प्रकारे एक शक्य होणार आहे.

प्रभात
Wed, 06 October 2021
https://epaper.eprabhat.net/c/63579099

पुढारी

# टांझानियाचे अब्दुल रज्ञाक यांना साहित्याचे नोबेल

## वसाहतवादाविरुद्ध झिजविली लेखणी; महाखंडांतील दरी मिटविण्याचा सातत्याने प्रयत्न

**स्टॉकहोम : वृत्तसंस्था**

अत्युच्च व मानवतेच्या कल्याणाला पूरक, उपयुक्त ठरलेल्या साहित्याच्या क्षेत्रातील आपल्या योगदानासाठी टांझानिया येथील लेखक, कादंबरीकार अब्दुल रज्जाक गुर्नाह यांना यंदाचा (२०२१) नोबेल पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.

नोबेल निवड समितीने याबाबत जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, वसाहतवादाविरुद्ध अब्दुल रज्जाक यांनी कुठलीही तडजोड आपल्या लिखाणातून केली नाही.



मानवतेच्या विरोधातील या मानवी वृत्तीच्या मुळावरच अब्दुल रज्जाक यांनी प्रहार केले. वसाहतवादाविरुद्ध प्रहार करत असताना विविध महाखंडांमध्ये असलेले सांस्कृतिक अंतर कसे कमी करत नेता येईल व कमी करत करत कसे संपवता येईल, त्याचे उपायही आपल्या लिखाणातून सुचविले व लेखक म्हणून स्वत: अमलात आणले. महाखंडांमधील सांस्कृतिक अंतर कमी करून जागतिक स्वरूपाचे सांस्कृतिक ऐक्य प्रस्थापित करण्यात लेखणी मोलाची भूमिका बजावू शकते, हे त्यांनी आपल्या प्रयत्नांतून, कृतीतून सिद्ध केले.

अब्दुल रज्जाक हे सांस्कृतिक विस्तार आणि सांस्कृतिक विकासाची बाजू लावून धरतात. बालपणापासूनच ते लिहित आले आहेत आणि तेव्हापासूनच साहित्याच्या क्षेत्रात वेगळे प्रयोग करण्याचा तसेच वेगळे काहीतरी करून दाखविण्याचा त्यांचा ध्यास आजतागायत कायम राहिलेला आहे, यांचा गौरवही समितीने केला आहे.

**शरणार्थी म्हणून इंग्लंडला**

अब्दुल रज्जाक यांचा जन्म १९४८ मध्ये झाला होता. झांझीबार बेटावर ते लहानचे मोठे झाले, पण १९६० च्या दशकाअखेरीस त्यांना शरणार्थी म्हणून ब्रिटनमध्ये यावे लागले. इथेच त्यांचे पुढील शिक्षण झाले. कारकीर्दही घडली. निवृत्तीच्या वेळी ते कँटरबरीतील केंट विद्यापीठात इंग्रजीचे प्राध्यापक होते.

**उत्कृष्ट कादंबरीकार**

अब्दुल रज्जाक यांच्या एकूण १० कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या आहेत. १९९४ मध्ये प्रकाशित 'पॅरेडाईज' या कादंबरीने ते प्रकाशझोतात आले. २००५ मध्ये आलेल्या 'डिसर्शन' या कादंबरीची जगभरातील साहित्य वर्तुळात चर्चा झाली होती. द लास्ट गिफ्ट, बाय द सी, डमारिंग सायलेन्स या त्यांच्या रचनांचीही भरपूर चर्चा झाली. त्यांना बुकर पुरस्कारही प्राप्त झाला आहे.

Pune Edition
Oct 8, 2021 Page No. 2
newspaper.pudhari.co.in

# *News Paper Clippings During October 2021*

**Section: Miscellaneous**

लोकमत

## 'ऑनलाइन' झालेले दिवाळी अंक पुन्हा होणार 'ऑफलाइन' उपलब्ध

### ७५ टक्क्यांपर्यंत प्रती काढण्याची संपादकांची तयारी

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे** : वाचनसंस्कृती बळकट करण्यासाठी मोलाची भूमिका बजावणाऱ्या दिवाळी अंकांना कोरोनाचा फटका बसण्याची शक्यता गृहीत धरून गतवर्षी अंकाच्या प्रती मर्यादित काढण्याबरोबरच पानांची संख्या कमी करण्याचा निर्णय काही संपादक आणि प्रकाशकांनी घेतला खरा; परंतु वाचकांनी त्यांचा समज पूर्णत: खोटा ठरवित दिवाळी अंकांना उत्तम प्रतिसाद दिला. तो अनुभव पाहता त्यांनी यंदा दिवाळी अंकांच्या ७५ टक्क्यांपर्यंत प्रती काढण्याची तयारी झाली आहे. कोरोनामुळे 'ऑनलाईन' झालेले दिवाळी अंक पुन्हा 'ऑफलाईन' होणार आहेत. गेल्या वर्षी अंक काढू न शकणारेदेखील यंदा जोमाने अंक काढण्यास सज्ज झाले आहेत.

वाचकांना खमंग, रुचकर वाचनीय मेजवानी देणाऱ्या दिवाळी अंकांना शतकोत्तर वर्षांची परंपरा आहे. सध्या महाराष्ट्रात ग्रामीण आणि शहरी मिळून जवळपास सोळाशे दिवाळी अंकांची शासनाच्या माहिती व जनसंपर्क संचालनालयाकडे अधिकृत नोंद आहे. यात तीनशे व्यावसायिक दिवाळी अंकांचा समावेश आहे.

#### गेल्या २५ वर्षांमधील 'निवडक अंतर्नाद' भेटीला येणार...

अंतर्नाद'ने रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्त गतवर्षी शेवटचा दिवाळी अंक काढला. परंतु आमची इच्छा आहे की गेल्या २५ वर्षात जे जे चांगले साहित्य वाचकांना दिले. त्याची जुन्या वाचकांना आठवण राहावी म्हणून त्याचे संकलन 'निवडक अंतर्नाद' द्वारे आम्ही प्रकाशित करीत आहोत. १९९५ साली जसा 'निवडक माणूस' केला तसेच त्याचे स्वरूप असणार आहे. पुस्तकाचा मजकूर ५०० पानांपेक्षा अधिक असणार आहे. या पुस्तकाचे प्रकाशन महिनाअखेर केले जाईल, अशी माहिती 'अंतर्नाद'चे संपादक भानू काळे यांनी दिली.

"गतवर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर 'डिजिटल' अंक काढला होता. परंतु, आमचा ऑनलाईन अंक काढण्याचा अनुभव फार चांगला नव्हता. आर्थिक उत्पन्न फार मिळू शकले नाही. त्यामुळे यंदा 'डिजिटल' आणि 'प्रिंट' या दोन्ही माध्यमात अंक काढत आहोत. दोन हजार प्रती काढण्याचा विचार आहे."

**- महेंद्र मुंजाळ, संपादक, अक्षरलिपी**

"गेल्या वर्षी बहुतांश संपादकांचा अंदाज चुकला. म्हणजे दरवर्षी १० हजार अंक छापत असतील तर अनेकांनी अडीच हजारच छापले. पण सर्वांचे अंक संपले. त्यामुळे यंदा गतवर्षीपेक्षा अधिक अंक काढले जाणार आहे. पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर येथे दिवाळी अंकांची चांगली विक्री होते. गेल्या वर्षीपेक्षा यंदा अधिक विक्री होईल असा सर्वांचा विश्वास आहे.

**- चंद्रकांत शेवाळे, उपाध्यक्ष दिवा प्रतिष्ठान**

Hello Pune
Page No. 8 Oct 05, 2021
Powered by: erelego.com

## मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या अध्यक्षपदी शरद पवार

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

मुंबईच्या वाचनसंस्कृतीमध्ये महत्त्वाचा वाटा असलेल्या मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या अध्यक्षपदी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांची निवड झाली आहे. रविवारी पार पडलेल्या निवडणुकीत पवार यांच्याविरोधात ग्रंथालय बचाव समितीचे धनंजय शिंदे यांनी निवडणूक लढवली. या निवडणुकीत ३४ पैकी ३१ जणांनी मतदान केले त्यापैकी २९ मते पवार यांना तर शिंदे यांना २ मते मिळाली आहेत.

उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या विद्या चव्हाण, वास्तुविशारद शशी प्रभू, उच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश अरविंद सावंत, माजी खासदार भालचंद्र मुणगेकर तसेच प्रदीप कर्णिक, प्रभाकर नारकर, अमला नेवाळकर हे सात जण निवडून आले आहेत. उपाध्यक्षपदाच्या सात जागांसाठी १४ उमेदवार होते. संतोष कदम, डॉ. रजनी जाधव, आनंद प्रभू, प्रमोद खानोलकर, झुंजार पाटील, डॉ. संजय भिडे, सुधीर सावंत हे अन्य उमेदवार उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीत होते.

विजयी उमेदवार विद्या चव्हाण, प्रभाकर नारकर, शशी प्रभू, अरविंद सावंत यांना प्रत्येकी २९ तर प्रदीप कर्णिक, अमला नेवाळकर आणि डॉ. भालचंद्र मुणगेकर यांना प्रत्येकी २८ मते मिळाली. तर संतोष कदम यांना चार, डॉ. रजनी जाधव, आनंद प्रभु यांना प्रत्येकी तीन तर प्रमोद खानोलकर, झुंजार पाटील, डॉ. संजय भिडे आणि सुधीर सावंत यांना प्रत्येकी दोन मते मिळाली.

या निवडणुकीत १५ कार्यकारिणी सदस्यांची निवड बिनविरोध झाली, अशी माहिती निवडणूक अधिकारी किरण सोनवणे यांनी परिपत्रकाद्वारे दिली.

मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या मुख्य निवडणुकीबद्दल आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण रंगले होते. तसेच अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाच्या निवडणुकीवरूनही वातावरण तापले होते. ही निवडणूक मुख्य निवडणुकांच्या वेळेला होऊन सर्वच मतदारांना अध्यक्ष, उपाध्यक्षपदासाठी मतदान करण्याची संधी मिळायला हवी होती, अशी भूमिका ग्रंथालय बचाव समितीच्या माध्यमातून घेण्यात आली होती.

#### त्रुटींविरोधात न्यायालयात जाणार



शरद पवार यांच्या विजयानंतर धनंजय शिंदे यांनी घटनेत तरतूद असतानाही सन १९९३मध्ये पवार यांनी अध्यक्षपदाचा कारभार स्वीकारल्यापासून निवडणूक झालीच नव्हती, असे सांगत या निवडणुकीच्या निमित्ताने पुन्हा लोकशाही प्रथा सुरू झाल्याचे सांगितले. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या निधनानंतर हे पद तेव्हा उपाध्यक्ष असलेल्या पवारांकडे आले. त्यावेळी कोणतीही निवडणूक झाली नव्हती. ग्रंथालय बचाव समितीने सातत्याने प्रश्न उपस्थित केल्याने अखेर ही अध्यक्ष आणि उपाध्यक्ष पदाची निवडणूक पार पडली. या निवडणुकीमध्येही काही त्रुटी असून याविरोधात न्यायालयात जाण्याची तयारी सुरू असल्याची प्रतिक्रिया शिंदे यांनी दिली.

Maharashtra Times 25.10.2021

# *News Paper Clippings During October 2021*

## Section: Miscellaneous

लोकमत

वाचकांना अंक मिळणार कसा? : कारवाईने प्रकाशकांमध्ये नाराजी

# नियतकालिकांचे टपाल परवाने केले रद्द

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** नियतकालिकांच्या दिवाळी अंकांची अंतिम धावपळ सुरू असतानाच वृत्तपत्र नोंदणी निबंधक (नवी दिल्ली) यांच्याकडून अद्ययावत प्रमाणपत्र उपलब्ध होत नसल्याच्या कारणावरून अनेक नियतकालिकांना सवलतीच्या दराने पोस्टिंग करण्यास टपाल खात्याने अटकाव केला आहे. नियतकालिकांचा सवलतीचा परवाना रद्द करीत असल्याच्या नोटिसा प्रकाशकांना दिल्यामुळे नाराजी पसरली आहे.

नियतकालिकांना वृत्तपत्रांचे निबंधक म्हणजेच रजिस्ट्रार फॉर न्यूजपेपर्स ऑफ इंडिया, नवी दिल्ली यांचेकडे नोंदणी केल्यानंतरच सवलतीच्या दराने टपाल खाते परवाना देते, मात्र त्या प्रमाणपत्रात झालेले बदल अद्ययावत झाले नसल्याचे कारण देऊन टपाल खात्याने थेट परवाना रद्द करीत असल्याच्या कारवाईच्या नोटिसा दिल्या. नियतकालिकांची सध्याची परिस्थिती लक्षात घेऊन हा अन्याय दूर व्हावा, अशी मागणी मराठी नियतकालिक परिषदेतर्फे अध्यक्ष डॉ. सागर देशपांडे व सरचिटणीस भालचंद्र कुलकर्णी यांनी पुण्याच्या पोस्ट मास्तर जनरल जी. मधुमिता दास यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

परिषदचे अध्यक्ष डॉ. सागर देशपांडे व सरचिटणीस भालचंद्र कुलकर्णी यांनी अशा प्रकारे महाराष्ट्रात तरी कुठेही अशी कारवाई होत नसताना फक्त पुण्यातच अशी कारवाई का केली जात आहे, असा सवालही उपस्थित केला आहे. गेली दोन वर्षे वृत्तपत्रांच्या निबंधक यांच्या कार्यालयात अनेक प्रकरणे पडून असल्याने अनेक नियतकालिकांना प्रमाणपत्रे मिळाली नाहीत. ही वस्तुस्थिती असल्याचे देखील मधुमिता दास यांच्या निदर्शनास या वेळी आणून दिली आहे. टपाल खाते व वृत्तपत्र नोंदणी हे दोन्ही विभाग केंद्र सरकारचे असल्याने त्यांच्यामध्ये समन्वय नसल्यानेच असे प्रसंग वारंवार घडत असल्याचे देखील दिसून येते.



### ...या नियतकालिकांना नोटिसा

- राज्य शासनाची नियतकालिके असलेल्या शेतकरी, किशोर, कृषी पणन मित्र, जीवन शिक्षण यांनादेखील अशा नोटिसा आल्या आहेत, ज्यांचा खप सुमारे ३ लाखांच्या आसपास आहे.
- याबरोबरच साधना, वनराई, निरोप्या, कॉर्पोरेट सिटीझन, दिलीपराज वृत्त, हिंदूबोध, मधुमित्र, याज्ञवल्क्य परिवार, योगेश्वर वार्ता, निर्मळ रानवारा, चाणक्य मंडल परिवार, सुगावा अशा अनेकांना नोटिसा आल्या आहेत.
- दिल्लीच्या टपाल खात्याने काढलेले आदेश त्वरित रद्द केले जावेत, अशी जोरदार मागणी होत आहे.

Hello Pune
Page No. 4 Oct 26, 2021
Powered by: erelego.com

# Upcoming Events

## November 2021

| Sun | Mon | Tue | Wed | Thu | Fri | Sat |
|---|---|---|---|---|---|---|
| | 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| 14 ***Pandit Nehru Jayanti***  | 15 ***Birsa Munda Jayanti***  | 16 | 17 | 18 | 19 ***Indira Gandhi Jayanti va Rashtriya Ekatmata Din***  | 20 |
| 21 | 22 | 23 | 24 | 25 | 26 ***Samvidhan Diwas***   | 27 |
| 28 | 29 | 30 | | | | |




*Other than the Photos of Modern College Pune-5, Event Photos, Newspaper clipping images, all other images in this Bulletin Issue are downloaded from Google Images., Pinterest, Freepik.Com.*